साल अखेर " ७ " १ ०८
किरकोळ अंकास.......................०४

नोटिशिचरल.
१० ओळीचे आंत रु. १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस-..........०१

Per annum in arrears 7 "1R. 8 as.
Six monthly..........3 " 8 as.
Single copy..........4 as.


# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.


VOL XXII AKOLA MONDAY 4 JUNE 1888 NO. 22
वर्ष २२ अकोला सोमवार तारीख ४ माहे जून सन १८८८ इ० अंक २२

vertisements.
Below 10 lines...2 Rs
Per line over 10...4 as
Repetition perline...3



## जाहिरात.

पुणें "ज्ञानचक्षु" छापखान्यांत विकीस तयार असलेल्या पुस्तकांची यादी.

| मराठी आक्ट. | किंमत | रु. | ह. |
|---|---|---|---|
| क्रिमिनल प्रोसिजर सटिक | १ | ०८ | |
| सिव्हिल प्रोसिजर सटीक | १ | ०८ | |
| पिनलकोड सटीक.......... | ७ | ०८ | |
| न्यायरत्न.......... | १ | ०८ | ०२ |
| रेव्हिन्यु कोड.......... | | ०८ | ०१ |
| सदरची रुळी.......... | | ०८ | ०१ |
| स्टांप आक्ट.......... | | ०६ | ०१ |
| कोर्ट फी आक्ट.......... | | ०६ | ०१ |
| कराराचा आक्ट.......... | | ०११ | ०२ |
| पुराव्याचा आक्ट.......... | | ०८ | ०१ |
| रजिस्टर आक्ट.......... | | ०६ | ०१ |
| मुदतीचा आक्ट.......... | | ०६ | ०१ |
| आबकारी आक्ट.......... | | ०७ | ०१ |
| जंगलसंबंधी आक्ट.......... | | ०८ | ०१ |
| विशेष न्यायाचा आक्ट.......... | | ०८ | ०१ |
| वतनदार आक्ट.......... | | ०६ | ०१ |
| लोकलबोर्ड आक्ट.......... | | ०६ | ०१ |
| मनोरंजक पुस्तकें. | किंमत | रु. | ह |
| श्री भावार्थरामायण.... | २० | २ | |
| विचित्रपुरी.......... | १ | ०२ | |
| मदनमंजरी.......... | २ | ०२ | |
| कामकंदला नाटक.... | १ | ०२ | |
| उपयुक्त चमत्कार सं. भा. १ ते १० दर भागास किं दह ही भा. बेत. ट. ह्या. माफ. | | ०१ | ०१ |
| अलखनेपलखव पलखनें वर्यांव | | ०४ | ०१ |
| सतारीचें १लें पुस्तक.... | १ | ०४ | ०२ |
| संगीत राधाविलास नाटक | | ०६ | ०१ |
| मदनजन्म नाटक.......... | | ०१२ | ०२ |
| चमत्कारचिंतामणि.... | | ०१३ | ०२ |
| महाविद्याप्रकाश.......... | १ | | ०२ |
| रणसंहार.......... | | ०४ | ०१ |
| मराठी हाणीं.......... | | ०७ | ०१ |
| गोपीचंद नाटक ( हिं. ) | | ०११ | ०२ |
| पाटी रबूशर्ग दर भा | | ०१० | ०१ |

माऊ गोविंद सापकर, ज्ञानचक्षुचे मालक.



## जाहिरात.

मेजर जानस्टन साहेब बहादूर कम्यांडिंग आफिसर नंबर २ पलटन इंगोली यांस एक आरमर मिस्तरी व असिस्टंट आरमर मिस्तरी या जागे करितां शिकून तयार करण्याकरितां उंच जातीचीं मनुष्यें पाहिजे आहेत मिस्तरीचा पगार रुपये ३० व असिस्टंटचा पगार १० शिवाय शिपायाचा पगार व भत्ता मिळेल.

ह्या जागेच्या शर्ती अशा आहेत कीं:—

१ अर्जदाराचें वय २५ वर्षांचें आंत असावें.

२ डाक्टर यानीं त्यास पसंत केलें पाहिजे त्याची उंची छातीची रुंदी वगैरे शिपाई लोकांस जेवढी रुंदी व उंची पाहिजे तेवढी असावी.

३ त्यांनीं दहा वर्षांचा करारनामा लिहून दिला पाहिजे.

४ आरसनल मध्यें शिकत असतांना व पास होई पर्यंत $\frac{3}{4}$ पगार मिळेल परीक्षा पास केल्यावर कायम केलें जाईल.

२ सदरहु साहेब बहादूर यांस एक तरुण मनुष्य शिपायांत भरती होण्या सारखा व रायटरचें कामा करितां पाहिजे आहे त्यास इंग्रजी येत असलें पाहिजे व हिशोबाचे कामाची माहिती असावी. पगार शिपाई याचे पगारा खेरीज लायकी प्रमाणें १० पासून ३० मिळतील.

३ त्यास एक पलटणी करितां स्कूल मास्तर पाहिजे त्यास इंग्रजी येत असलें पाहिजे. पगार रुपये २० मिळेल.

ज्या कोणास अर्ज करणें असेल त्यानें मेजर जानस्टन साहेब याज कडेस अर्ज करावा मुक्काम चिखलदरा तारीख ९ माहे मे सन १८८८

( सही ) कर्नल मेकेंजी साहेब बहादूर
डेपुटी कमिशनर जिल्हा एलिचपूर.


## पत्रव्यवहार.

ह्या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असेल असें समजूं नये.

मुक्काम वाशीम ता० २४।५।८८

रा. रा. वऱ्हाड समाचार कर्ते यांसः—

कृतानेक साष्टांग नमस्कार वि० वि० उष्णता आतां फारच फार झाली आहे. भरदोन प्रहरीं त्राही भगवान् असें होऊन जातें. शरीरांतुन घर्माच्या धारा चालतात. सायंकाळ कांहीं बरा जातो. पांच वाजण्याच्या सुमारास गार वाऱ्याच्या झुळका येऊं लागतात. अलीकडे जिकडे पहावें तिकडे बहुधा मुसलमान आंब्यांच्या टोपल्या घेऊन बसलेले असतात. आंबे फारसे स्वस्त दिसत नाहींत. घेणारे लोक फार आहेत. व आब्यांचें उत्पन्न इकडे फारसें नाहीं. या मुळेंच फार नाहींत वाटतें.

ता० २४।५।८८ इ० रोजीं येथील चिमुकल्या क्लबचा ( आराम गृहाचा ) जन्म दिवस होता. ह्या गृहाची भरभराट व्हावी असें पुढाऱ्यांस वाटत असतें. व त्या प्रमाणें ते आपल्या कडून होईल तितकी खटपट करून त्याची अभिवृद्धि व्हावी या विषयीं झटतात. परंतु हितेच्छु मंडळींची संख्या फारच थोडी स्वेच्छाचाऱ्यांची संख्या अधिक. या मुळें आराम गृहाची भरभराट होत नाहीं याबद्दल कळकळ बाळगणाऱ्यांना फार वाईट वाटतें. पहिल्या प्रथम येथें कशा गृहाची स्थापना झाली त्या वेळीं त्याच्या जन्म दिवसा निमित्य थाटमाट झाला. व मंडळी मध्यें ऐक्यभाव होता. परंतु आह्मी नेटाव पडलों आरंभशूर. तेव्हां आह्मां मध्यें ऐक्य कोठचें. आह्मां मध्यें ऐक्याभाव हेंच आमच्य फजितीचें कारण. कांहीं दिवस आरंभीं बरें चाललें. व मध्येंच कांहीं मंडळी मध्यें वितुष्ट पडून दुफळी झाली. दुसरें क्लब ह्या क्लबास मागें हटविण्याच्या हेतूनें स्थापन झालें. परंतु बिचाऱ्याचें तीन तेरा झालें. व सामानही विकलें गेलें व आमचें जुनें तें जुनेंच. कांहीं झालें तरी अजून टिकाव धरून चाललें आहेच. त्याचा आज जन्म दिवसा निमित्त उत्साह व्हावयाचा होता. परंतु आमचे कमिशनर साहेबांना एकाएकीं मृत्यूनें गांठलेल्याची काल तार आली या मुळें मंडळीला फार दुःख होऊन फारसें मन उत्साहांत न गेल्यामुळें पानसुपारी वगैरे थोडक्यांत करून टाकिली. ह्या क्लबांत ( मित्र समाज ) पाठीवर कागदाची अक्षरें कातून लाविलीं आहेत. हीं किती सुंदर आहेत. ही कारागिरी करणारे आमचे परम मित्र रा. रा. भाऊराव यादव दे डा. इन्स्पेक्टरचे क्लार्क हे होत. आज एक वर्ष झालें बिचारे रजेवर गेले आहेत. त्यांची रजा आतां लवकरच संपणार आहे. ते बहुधा आल्पावर आमच्या परम स्नेह्याचें आह्मास पुनर्दर्शन होईल. हा एक मित्र मोठा समाजिष्ट होता. सर्व आराम गृहाच्या मोकत्यांनो. क्लबाला नकार बाबानो झुगारून देऊ. आपल्या लहरी गुंडाळून ठेवा. यांत कां तुमचा मोठेपणा कीं बिचाऱ्या भाऊला वर्गणी मागावयास गेला असतां आपण आपल्या लहरीनें त्याला माराल अशी भिती पडावीना. असा मनुष्य जर क्लबांत असेल तर बिचाऱ्या क्लबाची जोपासना तरी त्याच्या हातून कसची होते. मग त्याला त्यांत ठेवावा तरी कशाला. परंतु असा कोणी असेल असें वाटत नाहीं. क्लबाच्या नियंत्यांनो एकदाची सर्व वर्गणी जमा करा. व नित्य क्लबांत येत जा. केवळ निशीक भक्त बनुन नाती खेळ पण नाहीं. त्यांना नाखूष करूं नका. आपले निक्षिकांचे घोडे पुढें ढकलूं नका. कांहीं तरी जान निक्षिकवाल्यांची माहीबत धरा. ऐक्य रहावें, क्लब चालावे, समाजसौख्य परस्पर प्राप्त व्हावें अशी इच्छा असेल तर ह्या कान चा सल्लोषाला, नाहीं तर ढकलाच आपला स्वेच्छाचारी वारु पुढें ! ! इतर लोक वर्गणी देतात तो त्यांची फुकटची कां आली आहे आपल्या वरून जगाची पारख करावी. इतकें कां तुह्मां निक्षिकवाल्यांना समजूं नये. पत्रकर्तेराव कराच कृपा व देवूंद्याच निक्षिकवाल्यांना आत्मबोध.

प्रेमेच्छूचा धाकटा बंधु.

"श"

वऱ्हाडसमाचार.

मिती वैशाख वद्य १० शके १८१०.

## मुनसिपाल नियम

( मागील अंका वरून पुढें चालूं )

११ ज्या गृहस्थाचें नांव मत देण्यास लायक ठरलेल्या लोकांच्या यादींत आहे त्यांसच इलेक्शनचे वेळीं आपापल्या महल्यांत मत देतां येईल. असा अधिकार पोंचण्यास मत देणाऱ्यास लागू असणारे नियम त्यानें पाळलेले पाहिजेत.

१२ मुनसिपाल कमिशनरांची निवड करण्याची तारीख डेपुटी कमिशनर इंग्रजी सालच्या आरंभीच्या पहिल्या दोन जानेवारी आणि फेब्रुवारी महिन्यांत कायम करतील आणि त्या दिवशीची वेळ व स्थळ हीं ही एक पंधरवडा पूर्वीं चालूं देशी भाषेंत जाहिरातीनें सर्व लोकांस कळवितील.

१३ मुनासिपालीटीचे सभासद होण्याची इच्छा असेल अशा उमेदवाराचें नांव प्रथम एका मत देण्याचा अधिकार असेलेल्या गृहस्थानें सुचविलें पाहिजे आणि त्या सुचनेस दुसऱ्या एखाद्या मत देण्याऱ्या गृहस्थाचें अनुमोदन असावें. शिवाय अशा सुचनेच्या अर्जी बरोबर नियुक्त झाल्यास मुनसिपालटीचें काम करण्यास खुषी असल्या बद्दल उमेदवाराचा लेखी दाखला ही असला पाहिजे. हे अर्ज डेपुटी कमिशनरांनीं नेमलेले आफिसर इलेक्शनच्या तारखे पूर्वीं सात दिवस पर्यंत घेतील आणि घेतल्या नंतर दोन दिवसांत उमेदवारांची नामावळी प्रसिद्ध प्रसिद्ध ठिकाणीं लोकांच्या माहितीसाठीं लाविली जाईल ह्मणजे निदान पांच दिवसपर्यंत ही नांवाची मालिका लोकांच्या नजरे पुढें राहील. दोन किंवा दोहोंहून अधिक महल्यांत एकवेळीं इलक्शन होणार असेल तर एकाच गृहस्थास प्रत्येक महल्यांत किंवा एका महल्यांत उमेदवार होतां येईल.

१४ मतें गोळा करण्या करितां डेपुटी कमिशनर प्रत्येक इलेक्शनच्या ठिकाणीं एकेक पोलींग आफिसर नेमतील आणि हे अधिकारी साधेल त्या मानानें आपापल्या इलाख्यांतलि लोकांस ओळखणारे असावे.

१५ इलेक्शनच्या दिवशीं मत देण्याचा एक छापील नमुना प्रत्येक मत देणाऱ्यास दिला जाईल ह्या नमुन्यांत तीन कोष्टकें आहेत त्यांतील दुसऱ्या कोठकाच्या माथळ्यावर 'मत देणाऱ्याची सही किंवा निशाणी (अथवा मत देणाऱ्याचें नांव आणि त्याचा प्रतिनिधी असल्यास त्याची सही किंवा निशाणी)' हा लेख आहे ह्या शिरोलेखा वरून हें स्पष्ट दिसून येतें कीं मत देणाऱ्या गृहस्थांस आपापला प्रतिनिधी म्हणून प्रसंग विशेषीं दुसरे गृहस्थ नेमतां येतील.

१६ प्रत्येक मत देणाऱ्यास त्याच्या त्याच्या इलाख्यास नियमित केलेल्या मुनसिपाल कमिशनरांच्या संख्ये इतक्या उमेदवारासाठीं

मत देतां येईल. मुनसिपालिटीचे सभासद होऊं इच्छिणाऱ्या उमेदवारांच्या यार्दीत दाखल नसलेल्या गृहस्थाच्या नांवानें मत दिलें असल्यास तें निरर्थक समजलें जाईल.

१७ हरएक मत देणाऱ्यांनीं स्वतां येऊन मत दिलें पाहिजे. ह्या नियमावरून पंधरावें नियमांतील दुसऱ्या कोष्टकांतल्या कौन्सांत प्रतिनिधीची सही चालेल अशी सवड दिली आहे तिची जरूरी राहिली आसल्याचें कांहीं कळून येत नाहीं. मत देणाऱ्या गृहस्थांस प्रत्यक्ष स्वतां हजर राहणें सतराव्या नियमावरून अ.वश्यक आहे मग पंधरावें नियमांतील प्रतिनिधींचें पालोपद जोडण्यांत काय मातबरी आहे ह्याचा निर्णय टीप देऊन स्पष्टीकरण केल्यास नीट दिसेल.

१८ मत देण्याचा नमुना भरून देण्याच्या संबंधानें असा नियम आहे कीं, मत देणाऱ्यास लिहितां वांचतां येत असेल तर त्यानें ' पोलिंग आफिसरा ' समक्ष ज्या उमेदवारा करितां मत द्यावयाचें असेल त्याच्या नांवापुढें आपली सही करून बाकी राहिलेल्या उमेदवारांच्या नांवांवरून रेघ ओढून तीं रद करावीं. लिहितां वांचतां येत नसल्यास पोलींग आफिसरानें मत देणाऱ्याच्या सांगण्या प्रमाणें तो नमुना भरावा आणि त्या कागदावर आपली निशाणी करावी.

ह्या नियमाचा पंधराव्या नियमांतील दुसऱ्या कोष्ठकाशी पडताळा पहातां कांहीं कांहीं बाबदींत ' पोलींग आफिसर ' तोच प्रतिनिधी असावा असा अंदाज होतो. एके पक्षीं त्या नमुन्यांतील दुसऱ्या कोष्ठकाच्या कौन्साचा कांहीं उपयोग असावा किंवा थोडाबहुत असल्यास अठराव्या नियमांत पोलिंग आफिसरास तो नमुना भरण्याचा अधिकार दिला आहे त्याच्या पुष्टीकरणा साठीं हा कौन्स टांचला असावा. या वरून त्या कौन्साचा उपयोग असो किंवा नसो दोन्हीही बाबदींत सतरावा नियम कायम ठेवल्यास विशेष हांशील नाहीं.

१९ अकराव्या नियमाच्या स्पष्टीकरणार्थ आणखी दुसरा एक नियम जोडला आहे कीं इलेक्शनच्या पूर्वीं शेवटीं जाहिर केलेल्या यादींत नांव नाहीं अशा गृहस्थाचें मत किंवा त्या यादींत नसलेल्या गृहस्था तर्फे दुसऱ्या मनुष्याचें मत पोलिंग आफिसर कबूल करणार नाहींत.

२० मत देणारा गृहस्थ भलता नसून त्याचा तोच आहे अशा बद्दल पोलिंग आफिसर खात्री करून घेतील, आणि खात्री होण्या साठीं केलेल्या प्रश्नांचीं उत्तरें मत देणाऱ्या कडून समाधानकारक मिळालीं नाहींत तर त्यांचें मत त्यांस नाकारतां येईल.

२१ मुनसिपालीटीच्या अध्यक्षांनीं अथवा उपाध्यक्षांनीं मोहरबंद केलेल्या पेटींत पोलिंग आफिसरा समक्ष त्यांनीं मान्य केलेल्या गृहस्थांचीं मतें टाकिली जातील.

२२ इलेक्शन निमित्त जमलेल्या सभेंत मुनसिपाल कमिशनरांच्या समक्ष ती पेटी उघडून त्यांतील मतें गोळा करून जो निर्णय ठरेल तो चेअरमन सांगतील आणि सभेच्या प्रोसीडिंगांतही नमूद केला जाईल.

२३ एकाच कमिशनरेचे जागे करितां दोन किंवा दोहोंहून अधिक उमेदवारांस सारखीं मतें पडलीं असल्यास त्या उमेदवारांपैकीं एका मनुष्याची चेअरमन चिठ्या टाकून निवड करतील. एकच गृहस्थ दोन किंवा दोहोंहून अधिक विभागा करितां निवडला गेला असेल तर कोणताही एक विभाग कायम करण्याची त्यांस मोकळीक आहे. आणि नंतर शिल्लक राहिलेल्या विभागांत त्यांच्या साठीं मतें गोळा केलीं नाहींत असें समजावें.

२४–२७ इलेक्शनचा निकाल लागल्या नंतर पंधरा दिवस पर्यंत मतांचे गोळा केलेले कागद पूर्ववत् पेटीमध्यें ठेविले पाहिजे. मत देण्यास लायक अथवा सभासद होण्यास लायक अशा गृहस्थानें इलेक्शनच्या संबंधानें शंका घेतल्यास अपिल करावें आणि डेपुटी कमिशनर चौकशी करून योग्य वाटेल त्या प्रमाणें पूर्वीचें इलेक्शन कायम करतील, त्यांत फेरफार करतील किंवा तें रदही करतील. डेपुटी कमिशनरांच्या निकाला पुढें अपिल नाहीं डेपुटी कमिशनरांनीं पहिलें इलेक्शन नामंजूर केल्यास पूर्ववत् आणखी एक वेळ इलेक्शन होईल. पंधरा दिवसा नंतर पेटींतील मतांचे कागद मुनसिपाल आफिसरा समोर नाहींसे केले जातील. इलेक्शनचा निकाल अध्यक्षा कडून डेपुटी कमिशनराकडे जाईल आणि नंतर ते ' रेसिडेन्सी आरडर ' मध्यें जाहिर करतील. मग त्या प्रमाणें प्रसिद्ध झाल्यावर नवीन निवडलेले मुनसि०सभासद आपापलें काम पाहूं लागतील.

२८–२९ मुनसिपल कमिटीच्या रेझोल्युशनाची प्रत प्रसिद्ध ठिकाणीं लाविली जाईल. आणि मुनसिपालिटीच्या शहरीं वर्तमानपत्र असल्यास त्यांत रेझोल्युशन जाहिर करावा. चौतीस कलमान्वयें केलेला प्रत्येक नियम रेसिडेन्सी आरडरमध्यें व मुनसिपालिटीच्या ठिकाणी वर्तमानपत्रें असतील त्यापैकीं एका वर्तमानपत्रांत छापून प्रसिद्ध करावा आणि मुख्य मुख्य ठिकाणीं त्या नियमाचे जाहिर नामे लावावे.

लोकापयुक्ततेचा नियम एकाच वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध करणें जितकें महत्वाचें आहे तितकेंच महत्व दुसऱ्या बाकी राहिलेल्या वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध करण्यांत असतें इतकेंच नव्हे तर सर्व लोकांस कळविण्याचा नियम एकाच वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाल्यानें त्या नियमाची पूर्णपणें अंमलवारी होणार नाहीं. कारण असे सार्वजनिक सौख्याचे नियम ह्मणजे प्रत्येक मुनसिपालटीच्या हद्दींतील व्यक्तीस नोटीस देऊन रजिष्टरनें कळविले पाहिजेत पण त्या प्रमाणें व्यवस्था करण्यास साधनें नाहींत ह्मणून अनुकूल असतील तितके उपाय योजण्याचा मार्ग आपल्या हातीं राहिला, आणि त्या थोड्या बहुत योजनेंत सुद्धां काटकसर केली तर प्रसिद्ध करण्याचा मूळ हेतु सिद्धीस जात आहे असें म्हणतां येणार नाहीं. शिवाय दुसरा एक प्रश्न उत्पन्न होतो तो असा कीं एका एका शहरीं अनेक वर्तमानपत्रें असल्यास त्यांत एका विशिष्ट वर्तमानपत्राची निवड करण्या साठीं न्याय मतानें कांहीं साधारण नियम केला पाहिजे. इतका घोटाळा करण्यापेक्षां समतोल न्याय दृष्टीनें त्या त्या शहरच्या सर्व पत्रास मुनसिपालीटीचे रेझोल्युशन किंवा नियम यांच्या अलाहिदा प्रती पोंचव्यात आणि विषयाच्या महत्वाच्या मानानें त्या जाहिरातिच्या रूपानें प्रसंग विशेषीं प्रसिद्धही करण्यांत याव्यात. ह्मणजे खर्च वेंचाच्या संबंधानें भानगड न पडतां सर्व काम सुयंत्र चालून लोकांस मुनसिपालीटीच्या कायदे कानूची माहिती होऊन बाह्य प्रदेशींही त्या मुनसिपालीटीच्या कामधामाचा मासला वेळोवेळ लोकांच्या नजरे पुढें येत जाईल.

३० पहिल्या नियमांत मुनसिपालीटीच्या सभासदांच्या संख्येच्या एक चतुर्थांश संख्ये इतके सभासद रेसिडेन्ट नेमतील असें निर्दिष्ट केलें आहे त्यांत या नियमानें थोडी जास्त सवड करून घेतली आहे कीं सरकारांतून नेमले जाणारे सभासद प्रत्यक्ष रेसिडेंटांनीं न नेमितां डेपुटी कमिशनरांस नेमता येतील फक्त अशा नेमणुकीस रेसिडेंट साहेबांची मंजुरात घेतली पाहिजे.

३१–३२एकवेळ निवडलेले आणि नेमलेले सभासद तीन वर्षे पर्यंत कामावर राहतील. निवडलेल्या सभासदा पैकीं एक तृतियांश सभासद आळीपाळीनें प्रत्येक वर्षीं काम सोडून जातील. तीन वर्षांच्या मुदतीनें जरी सभासद निवडले जातात तरी आळीपाळीनें एक तृतियांश सभासद काम सोडतील असा पोट नियम आहे ह्मणून कोणी कामावरून दूर व्हावे असा प्रश्न इलेक्शन सुरू झाल्या पासून पहिल्या व दुसऱ्या वर्षाच्या संबंधानें उत्पन्न होतो ह्मणून आरंभीच्या दोन्ही वर्षां करितां चिठ्या टाकून ज्या सभासदांचीं नांवें निघतील त्यांनीं आपलें काम सोडून जावें असें ठरविलें आहे. पहिलीं दोन वर्षे संपल्या नंतर पुढें आळीपाळीचा नियम लागूं करितां येईल.

३३ कारणा निमित्त रिकाम्या होणाऱ्या सभासदांच्या जागा प्रथमतः भरतांना जी व्यवस्था केली होती त्या प्रमाणें पुन्हां भरल्या जातील ह्मणजे निवडलेल्या सभासदांच्या जागा पूर्ववत् निवडणुकीनें भरल्या जातील आणि सरकारांतून नेमलेल्या सभासदांच्या रिकाम्या पडलेल्या जागा सरकारी नेमणुकीनें भरल्या जातील.

३४ जो मुनसिपालीटीचा अध्यक्ष आपल्या निवडणुकेच्या किंवा नेमणुकीच्या वेळीं मुनसिपालीटीचा सभासद नसेल त्यानें अध्यक्षाचें काम एक वर्ष करावें असें सूचविलें आहे. पण या नियमावरून दुसरी एक गोष्ट व्यक्त होणें इष्ट होतें कीं मुनसिपालीटीचा सभासद असून अध्यक्ष होतो त्यानें किती मुदत पर्यंत काम पहावें. तर या दुसऱ्या आक्षेपाचा स्पष्टपणें उलगडा झाल्यास नीट पडेल.

३५–४८ पसतीसाव्या नियमा पासून अठ्ठेचाळीसाव्या नियमा पर्यंत मुनसिपालीटीचें काम चालविण्या बद्दल पूर्वीं पासून चालत आलेल्या वहिवाटींत थोडा बहुत फेरबदल करून ठराव बंद मसुदा तयार केला आहे त्यांत विशेष लक्षांत ठेवण्या सारखे नियम सांगून हा लेख पुरा करीत आहों:—

३८ मुनिसीपाल कमिटीची प्रत्येक स्थावर जिन्नगी कमिशनरांच्या परवानगी शिवाय विकतां येणार नाहीं, गहाण देतां येणार नाहीं तिची अदला बदल करितां येणार नाहीं किंवा कोणत्या ही अन्य रितीनें विल्हेवाट करितां येणार नाहीं. फक्त वीस वर्षांच्या मुदतीनें स्थावर जिन्नगी किरयानें देण्याचा मुनसिपालीटीस अधिकार दिला आहे. जंगम मालाची व्यवस्था करण्याचा जनरल कमिटीस हक आहे.

४२ कमिटीनें प्रथम कोणतीं कामें करावीं याचा निर्णय लावितांना असें ठरविलें आहे कीं सार्वजनिक आरोग्य, सुरक्षितपणा आणि शहरच्या राहिवाशांच्या सोयी या तिन्ही संबंधाचीं, कामें प्रथम झालीं पाहिजेत. हा नियम असून नसून सारखा आहे असें ह्मणण्यास विशेष बाध येईल असें कांहीं एक दिसून येत नाहीं. कारण मुनसिपालीटीचें हरएक लहान मोठें काम वर संकेतिकरीत्या दर्शविलेल्या तीन प्रकारांत येण्या सारखें आहे.

४४ या नियमा वरून मुनसिपालिटीच्या अध्यक्षाची परवानगी घेऊन कर देणाऱ्यांस पाहिजे तेव्हां मुनसिपाल आफिस मध्यें मुनसिपालीटीचे कागदपत्र पाहण्यास मिळतील.

४८ कलमें १०, ११६ आणि १४९ या वरून होणारे नियम रेसीडेंन्सी आरडर मध्यें प्रसिद्ध होतील आणि ११६वे कलमा प्रमाणें होणारे नियम वऱ्हाडांतील वर्तमानपत्रांतून ही प्रसिद्ध होतील.

वर लिहिलेली हकीकत नियमांच्या संबंधानें झाली. या मसूद्याच्या अखेरीस पुरवणी जोडून वऱ्हाडांतील साती मुनसिपालीट्यांच्या हद्दीचे इलेक्शन करितां निरनिराळे महाले करून दिले आहेत आणि त्या प्रत्येक महाल्यांतून निवडले जाणाऱ्या सभासदांची संख्या दिली आहे.

---

वऱ्हाडांतील खालच्या प्रतीच्या मेडिकल खात्यांत हास्पिटल असिस्टंट लागतात त्यांस त्यांचें काम शिकविण्याकरितां चंद्रघाट येथें मेडिकल स्कूलमध्यें वर्ग काढिलेला आहे त्या वर्गांत उमेदवारांची भरती करण्याकरितां उमेदवार ची कांहीं नियमित विषयांत परीक्षा घेत असतात. ही परीक्षा सालाबाद प्रमाणें यंदा पुढील सोमवारीं चंद्रघाट आणि उमरावती या दोन ठिकाणीं होणार आहे. परीक्षेची तारीख उशीरानें नेमिली जाऊन अगदीं जवळची असल्यामुळें तेवीस मे तारखेचें निराळें पत्रक रेसीडेंन्सीमधून प्रसिद्ध झालें आहे. चंद्रघाट आणि उमरावती या दोन्ही ठिकाणीं मिळून पसार होतील त्या उमेदवारांपैकीं पहिले दहाजण ह्या वर्गाला लायक ठरले जातील. विषयाच्या मानानें ही परीक्षा वऱ्हांडांतील आठव्या इयत्तेच्या परीक्षेप्रमाणें आहे. ह्या वर्गाचा अभ्यास चार वर्षे चालत असून अकरा रुपयापासून चौदा रुपयापर्यंत स्कालरशिप ह्मणून पगार मिळतो ह्मणजे तो दरवर्षीं एक रुपयानें वाढतो. ह्या वर्गांतलि विद्यार्थ्यांनीं सात वर्षे पुढें नोकरी करूं असें स्वतास बांधून घेतलें पाहिजे. हे चार वर्षांचें अध्ययन पुरें झालें ह्मणजे पहिल्या सात वर्षांच्या नोकरींत १६ रुपयापासून २५ रुपया पर्यंत पगार मिळत जाईल. सात वर्षे भरल्या नंतर २५ रुपयापासून ३५ रुपयेपर्यंत व चौदा वर्षे नोकरी झाल्यावर ३५ पासून ५५ रुपये पर्यंत पगार मिळेल. ही हास्पिटल असिस्टंटची नोकरी लष्करी खात्यांत पत्करल्यास पहिल्या सात वर्षांत १६ पासून २४ रुपये पर्यंतच पगार मिळेल पण पुढें ४० पासून ६० पर्यंत वाढत जाईल.

---

# The Berar Samachar

MONDAY JUNE 4, 1888.

## ADMINISTRATION-REPORT FOR 1886-87.

(Continued from our 19th number).

The conduct and discipline of the

Police Department is generally satisfactory and a large falling off in crime is the right index of its efficient administration. The sanctioned strength of the Police is 2762 but the actual one on roll is 2728. The attempt to explain why the Police force was so short is a little refined and ingenious. It is stated that with a steady demand for labour and fairly prosperous times appointments in the Berar Police are not readily sought after. The question why service in the Police Department is not attractive to an honest worker in the field of life still remains undecided. The explanation neither reveals nor implies the latent cause at the bottom. It is not that the Police Department is poorly maintained by the Government; but it is the nature of the duty that a policeman has to perform.

The basal objects of the Police-duty are for the good of the people but there goes a strange notion that the policy of the Police officer knows not to flatter but to insult. It is often a popular remark that lawful violence is the secret of success in the Police-life. We do not mean to apply this charge to some honourable exceptions in the department, but it must be admitted that the remark is not without some grounds for its proof. The department lacks in its composition the proper proportion of educated persons as it is found in other branches of Government service. Out of 2728 the Mahomedan officers and men in the lower service are 1101. That the Mahomedans are backward in the matter of education is admitted on all hands and that they form a grand majority of the Police force is no mean indication of the unattractive nature of the Police service.

The decrease in crime was also followed by a decrease in the number of jail admissions. At the close of the year 1886 the number of prisoners was 1143. The net cash earnings of prisoners employed on manufactures, which are mainly confined to the two central jails in the province, were Rs. 11,395. The total expenditure of the Jails rose from Rs. 63,535 in 1885 to Rs 65,143 in the year under report, but the average cost per head fell from Rs. 60-12-5 to Rs. 59-15-1. The health of the convicts was generally satisfactory. The special feature of the administration of civil justice was that the average duration of contested and non contested cases was somewhat higher than in 1885 being 78 2 and 36. 7 days respectively as compared with 65.5 and 34 4 days. Registration was as a rule effected with commendable celerity. The income of the year under report was Rs. 55,952-7-0 as compared with Rs.29,838-6-3 in 1885-86, and the expenditure Rs. 36,318-8-7 as compared with Rs. 46,788-15-3. The net surplus amounted to Rs.19,633-14-5

In consequence of the discovery and rectification of certain errors the total area of the province showed a net decrease of 595 acres for the year under report. The area under crops fell off by 103,100 acres which is attributable to the unfavourable conditions of the season's rainfall. The percentage of acreage under the two most valuable staples of Berar-wheat and cotton-rose and compensated for the badness of the year in other respects. An experiment was made with English wheat seed, but the results were not successful; the seeds had lost their germinating powers before they were sown.

The following is the account of the establishment of a Civil Veterinary Department which was first founded in this province in the year of this report.—Although progress was at first necessarily slow, the operations undertaken have been satisfactory, and give every hope for the future. Mr. Cooper, the Veterinary Officer in charge, did great work in visiting the villages and explaining orally the more common diseases and the remedies to be adopted. Mr. Cooper's visits brought to light the fact that rinderpest and foot-and mouth disease are but too common in almost every district. The transfer of two donkey stallions from the department of horse breeding operations was sanctioned by the Government of India, but the animals had not arrived when the year closed.

( to be continued ).

## DESULTORY READING

(continued from our last issue).

Mr. Samuel Pepys seems to be wholly wanting in all sense of the ridiculous and to be equally devoid of any spark of fancy. Here is his estimate of this highest, gayest, loveliest, piece of fancy in the world. "To the King's Theatre where we saw Midsummer Night's Dream, which I had never seen before nor shall ever again, for it is the most insipid, ridiculous play that ever I saw in my life." We must, however, confine our attention to works of humour and fancy alone. They are, indeed, most valuable in the development, perhaps even in the formation of character, and we cannot but admire and feel grateful for the lessons which they teach us. But they would fall upon us if we sought to make them our sole companions. As Mr. Lawell says of new books, "For, reading new books is like eating new bread. One can bear it at first, but by gradual steps is brought to death's door by a mental dyspepsy." So it may be said of books of the latter class that they would not furnish the mind with the food it requires if our reading were confined to them alone. What, then, ought the young to read? It is, indeed, a grave and serious question but we are not going to answer it by describing a detailed regimen or course of study. That we must leave to be decided upon according to the circumstances of the student, the profession which he is about to follow, and the advice which his professors or tutors may give him. If his training is to be mainly scientific, then we should say that it is peculiarly desirable that his reading should be mixed and miscellaneous, so that while he is investigating the secrets of nature he should not neglect to acquaint himself also with the secrets of the human heart If on the other hand, his line is to be literary, we would keep the light literature somewhat down, less by its fascination it should draw away the mind from the more serious studies. It is sure to be taken up later, and with all the more pleasure and profit if a good foundation has first been laid by steady literary work. We should look some day, if we are not already acquainted with them, at Sir W. Scott's remarks upon desultory reading in the early chapters of 'Waverley,' and take his warning against the dissipation of mind to which natures at all events, it is likely to lead. We content ourselves with saying it is one of the great advantages of such places of learning as our Universities that every student has the means of readily obtaining advice, guidance, and assistance in laying out and pursuing a course of serious study. We shall here be introduced to great minds of the past, to the historians, the philosophers, the orators, the poets, whose works have charmed and have instructed generation after generation, and he will be shown how best to employ his time in turning his acquaintance with them to profit. It is to make a point of mastering at least a subject of study by sheer hard work without the aid of any of the ingenious inventions for saving time and trouble which are so dangerously tempting. We should set our faces alike against the use of cribs and translations, and against skipping of difficult passages. We should not try to turn the flank of a difficulty but brace up our minds to overcome it. By doing thus with one or more branches of our work we will strengthen our mental powers and gain a vantage ground from which we shall be able with ease to invade and conquer fruitful plains of knowledge which we shall perceive lying open before us. As a wit once said, easy writing is confoundedly hard reading; so we may say of easy study that it means terribly barren knowledge. We may, indeed, apply to true knowledge the noble lines in which Wordsworth addressed to the Grecian crowd who shouted when they heard the proclamation of their country's freedom at the hands of their master.

( to be continued. )

We acknowledge with thanks the receipt of the Report of the Third Indian National Congress held at Madras in 1887 and also that of 'A speech on the Indian National Congress' by Allan O. Hume.

## वऱ्हाड.

सन १८७६ च्या अकराव्या प्रेसीडेन्सी ब्यांक अक्टांतील ४२ वे कलमांत असलेल्या अधिकारा प्रमाणें गव्हरनर जनरल साहेब यांनीं मुंबई ब्यांकच्या डायरेक्टर्स मंडळीस मुलुख अमानी हैदराबाद मधील आमच्या अकोले शहरीं त्यांच्या ब्यांकेची शाखा काढण्यास परवानगी दिली आहे.

मि. एच. एफ्. व्हाइट आफिशिएटींग सुपरिंटेंडींग इंजिनिअर आणि रेसिडेंट साहेबांचे सेक्रेटरी यांची बदली ब्रह्मदेशांत होऊन त्यांस तिकडे सुपरीनटेंडींग इंजिनिअर नेमिलें आहे.

आम्हास लिहिण्यास फार दुःख वाटतें कीं तेल्हारे कोर्टांतील प्रसिद्ध वकील आपाजी शामराव यांस बऱ्हाणपूर येथें गेल्याचे मागील आठवड्यांत देवाज्ञा झाली. सुमारें २ महिन्या पासून त्यांची प्रकृति बिघडलेली होती. हे बऱ्हाडातील जुन्या वकीला पैकीं एक असून हुशार, हिम्मतदार मनमिळाऊ व उदार अंतःकरणाचे असत. त्यांच्या मृत्यूचें वर्तमान ऐकून त्यांचे वऱ्हाडांतील मोठ्या मित्र समूहास अनिवार दुःख होत आहे. परंतु ईश्वर सत्तेपुढें इलाज काय!

ह्या अंकाच्या पहिल्या पृष्ठावर मेजर जॉनस्टन साहेब पळटण दुसरी इंगोरी यांस कांहीं कामदार मंडळी पाहिजे आहेत अशा बद्दल जाहिरात छापिली आहे. तिकडे लोकांनीं अवश्य लक्ष पुरवावें. वर्तमानपत्रांतून अशा जाहिराती प्रसिद्ध झाल्यानें हुशार हुशार मंडळी सरकारास नेमण्यास सांपडेल आणि दुसऱ्या पक्षी लोकांचेंही कल्याण आहे.

नथू नांवाचा एक स्टांप वेंडर कचेरींत जात असतां वाटेंत विषप्रयोग होऊन मरण पावला असावा अशा अर्थाचा मजकूर आम्ही मागें प्रसिद्ध केला आहे. पण चौकशी पुरी झाल्यावर आतां असें निष्पन्न होतें कीं नथूस विषप्रयोग झालेला नसून तो उन्हाच्या तिरपेनें मरण पावला असावा.

अकोट शाळेतील पहिले आसिस्टंट मास्तर रा. रा. केळकर यांनीं सहा महिन्याची रजा घेतल्यामुळें त्यांचे जागीं रा. रा. सखाराम रामचंद्र सुकलीकर यांस आक्टिंग नेमिलें आहे. शेवटले गृहस्थ तरुण असून मुंबई युनिव्हर्सिटीच्या म्याट्रीक्युलेशन परीक्षेंत पसार झाले आहेत. आणि यांचा एक वर्षभर कालेजांत ही अभ्यास झाला आहे तेव्हां हे आपल्या गुणांनीं आपल्या वरिष्ट अधिकाऱ्यांच्या पसंतीस उतरतील अशी आम्ही उमेद बाळगतों.

मि. अबदुल हक कर्नाळकर यांनीं डेकन मायनिंग कंपनीचे कांहीं शेअर निजाम सरकार करितां ह्मणून काढून स्वताची भर केली होती त्या शेअरची किंमत आठ आणें मित्ती प्रमाणें २३७०४४३ रुपये होत आहे. मि० अबदुल हक्कांनीं गेल्या २८ वे तारखेस निजाम सरकारास कांहीं लाख रुपयांची रोख रकम व वाडे बंगले वगैरे देऊन या मोठ्या रकमेची फेड केल्याचें समजतें.

मे. सांडर्स साहेब निवर्तल्या मुळें कर्नल स्पांर्स्की साहेब कमिशनरचें आणि कर्नल मेकंजी साहेब जुडिशीयल कमिशनरचें काम सध्यां पाहूं लागले आहेत.

गेल्या अंकीं लिहिल्याप्रमाणें भोलवी निजामुद्दीन स्पेशल आसिस्टंट कमिशनर नेमले गेल्यामुळें त्यांच्या स्मालकाज कोडताचे जज्जाच्या जागीं रा. रा. गणेश श्रीकृष्ण खापरडे यांची नेमणूक झाल्याचें कळतें.

'आर्यावर्तोत्कर्षेच्छु आर्यांचें सत्यस्थितिदर्शक पत्र'--या नांवाचें एक छोटेखानी पत्र त्याच्या कर्त्याकडून आम्हाकडे आलें आहे त्याचा आम्ही आभार पूर्वक स्वीकार करितों.

'फिरस्ता' पत्र पावलें. 'शुद्धवऱ्हाडी कां अशुद्धवऱ्हाडी' हा निर्णय आपण 'वऱ्हाडी' कडे जाऊन केल्यास नीट दिसेल.

'झोंपेतून उठलेला' आणि 'त्रस्त' आपलीं पत्रें पोचलीं. स्थळ संकोचास्तव पुढील अंकीं पाहूं.

'Justice' Received too late.

मागाहून आलेली नोटीस.

मि. तयब अली दाऊदभाई दुकान ताजनापेठ व नंनी कचरीण दुकान आकोलें शहर यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं, तुम्ही आमच्या घरांस कुलूप लावून निघून गेला आहां तर आठ दिवसांच्या आंत घरें खुलीं करून द्यावीं. आणि भाड्याचा हिशेब चुकता करावा. ता. २ जुन १८८८ इ०

( सही. )

अबदुल हशीन आलबकस

तर्फे मुखत्यार सिताराम भिकाजी,

## वर्तमानसार.

हिंदुस्थानांत जे इंग्रजांचे मांडलीक राजे रजवाडे व संस्थानिक वगैरे आहेत, त्यांचे राज्यांत जो मुलूख आहे त्याचें क्षेत्र सुमारें ६ लक्ष चौरस मैल आहे. त्यांत ५ कोट प्रजा राहते. तिजपासून त्यानला दरसाल २० कोटी रुपये वसूल येतो. त्या लोक संख्येवर कर व धान्याचे रुपये सारखे वाटले असता दरसाल दरमाणशीं ४ रुपये प्रमाणें आकार बसतो. त्या लोक संख्ये पैकीं बायका मुलें मिळून दोन तृतीयांश कमी करून फक्त काम करणाऱ्या पुरुष संख्येवर कराची रकम सारखी वाटली असतां दरसाल दरमाणशीं १२ रुपये कर बसतो.

चमत्कारिक अट—विड्येनाचा एक धनवान इसम मरण पावला. त्याणें आपल्या पुतण्यास आपली सर्व दौलत देण्याचें लिहून ठेविलें आहे. परंतु त्याचा अट आहे ती अशी कीं त्यानें वर्तमानपत्र वाचण्याची आपली खोड अगदीं टाकून दिली पाहिजे. धा० वृ०

पुण्याच्या नाटक गृहां करितां हाय कोर्ट कडून कांहीं नियम लागूं केले आहेत त्यांतीक खालील सहा विशेष मुद्याचे आहेतः—

१ नाटक गृहांत प्रत्येक मनुष्यास बसण्यास ६ फूट जाग्यापेक्षा कमी जागा असूं नये.

२ नाटक गृहांत राकेल तेलाचा उपयोग केव्हां ही करूं नये.

३ सभा, नाटक किंवा तमाशा नाटक गृहांत व्हावयाचे असल्यास तो रात्री १ वाजल्या पुढें होऊं नये.

४ नाटक व तमाशा वगैरे करितां पोलीसाची परवानगी मागितली पाहिजे

५ आगीच्या इतर बंदोबस्ता करितां ६ पोलिस नाटक गृहांत, नाटक वाल्यांनीं फुकट घेतले पाहिजेत.

६ मातीनें भरलेल्या खेपल्या व पाण्यानें भरलेली भांडी प्रत्येक वेळीं अगदीं तयार करून ठेवली पाहिजेत.

कलकत्त्याच्या ब्रह्मसमाजानें मूर्तिपूजा वेदप्रणित आहे असें सिद्ध करून देणारास ५००० रुपये बक्षीस देण्याचें ठरविलें आहे. आमच्या इकडील वैदिक व शास्त्री मंडळी तयारी करून हें बक्षीस वाया जाऊं देणार नाहींत अशी आम्हास मोठी आशा आहे. म० मि०

उत्तरोत्तर जसा मराठे शाईचा किंवा पेशवाईचा ऱ्हास झाला तसा आपला होणार नाहीं म्हणून करा यत्न; हल्लीं आपल्या मध्यें सर्व अज्ञान बाजार माजला आहे "कोणी कोणाचा धनी न कोणाचा चाकर" जो येतो तो अरेराव- पण त्याचा तो अरे रावीपणा नुसता व्यास पिठावर किंवहुना व्याख्यान मंदिरांत. या पलीकडे आमची विद्वत्ता मुळींच धांव नाहीं; आणि त्यांतच शतकृत्य मानून आम्हीं दुधाचे लाडू यथेच्छ खात बसतो मग कमी काय! "मति मांडे लक्षितां, मग कोरडे कां भक्षितां" दुधसाखर कां ज्याना!! असे आपले वरकांती गोड गोड उपचार काय कामाचे, कारण "बोलाचीच कढी बोलाचा भात! जेऊनिया तृप्त कोण झाला?" या साधु वाक्याकडे कांहीं नजर फेका त्यांतील अर्थ गांभीर्य लक्षांत आणा सर्वांच्या कल्याणा करितां "राष्ट्रीय सभा देवीनें अवतार घेऊन आज तीन वर्षे झालीं तरी देखील आमची स्थिती "सरड्याची धांव कुंपणापर्यंत" या म्हणीसच अनुसरून आहे. तसेंच या अर्वाचीन विद्वान समाजांत देशोन्नतीचा डांडोरा पिटत असून त्या पासून सुखाच्या वाऱ्याची झुळूक देखील आम्हास लागत नाहीं. स० मि०

थिबाचें रत्नखाणीचें उत्पन्न—थिबाचे स्वराज्यातील रत्नाच्या खाणीचें त्यास १,१०,००० रुपये उत्पन्न मिळत असे. व०

सरकारच्या कल्याणार्थ आपली अमोल्य काया अर्पण करण्यास तयार झालेल्या शिपाई गड्यांची राखवेल वितकी तबियत राखणें सरकारचें प्रथम कर्तव्य आहे व तें बजावणें यांत सरकारचें हित आहे हें खरें, पण तें आपल्या हाताखाली असलेल्या दीन, अनाथ व भोळ्या प्रजेंतील सुंदर व तरुण स्त्रियांना दुराचारास प्रवृत्त करण्यांत नाहीं. या देशाच्या सरक्षणार्थ प्राण खर्ची घालण्यास तयार झालेल्या गोरे सोल्जरांना काम शांतीकरितां आमच्या देशांतील दुबळ्या प्रजेपैकीं पुष्कळ रांडा खरेदी करून देण्याचा प्रघात लष्करी अमल दारांनीं राजरोस रीतीनें सुरू केला आहे. हा सारा प्रकार कोठून कसा व कधीं सुरू झाला हें खालील हकीकतीवरून कळेलः—

क्वार्टर मास्तर जनरलच्या १८८६ सालांतील सर्क्युलरअन्वयें कम्यांडिंग आफिसरानें अंबाल्याच्या माजिस्ट्रेटास लेखी हुकमानें असें कळविलें कीं "आमच्या पलटणीच्या दिमतीस असलेल्या रांडा बस्स नाहींत. सबब तुह्मी आणखी सहा अतिरूपवान व तरुण मोहक स्त्रिया देखत हुकूम, पाठवाव्यात." लोकांच्या न्यायान्यायाचा निवाडा करणाऱ्या माजिस्ट्रेटासारख्या बड्या व थोर अधिकाऱ्यांला हे किती महत्वाचें आणि संभावितपणाचें काम बजावण्यास फर्माविण्यांत आलें बरें! आपल्या हुकमाप्रमाणें माजिस्ट्रेटांकडून पाठव्यात तशा विश्वयोषिता येत नाहींत ह्मणून साहेबांची मर्जी खफा झाली, व त्या हलकट्यासरशी त्यांनीं आपल्या वरिष्ठाकडे रिपोर्ट केला कीं "हवा तितका पैसा खर्च करण्यास तयार असूनही रांडा मिळत नाहींत. तर तो या माजिस्ट्रेट लोकांचा कसूर असावा. यास्तव अशा कामदारांच्या नेमणुका करतांनाच ह्या गोष्टीचा विचार व्हावा" विचार कसला! माजिस्ट्रेटची जागा देतांना आगोदर हव्या तितक्या रांडा पुरविण्या बद्दलची कबुली लिहून घेण्याचा.

रशियाची हालचाल आज इतके दिवस पर्यंत चालली असतांही लढाईची तयारीची गडबड कांहींच दिसत नाहीं म्हणून राज्यशकट हाकणाऱ्या मंडळीची फार नाचक्की झाली व कित्येक अधिकाऱ्यांवर हयगयीचा आरोप आणण्याचाही प्रयत्न झाला. पण परवां लार्ड सालिसबरी यांनीं पार्लिमेंटमध्यें असें साफ बोलून दाखविलें कीं 'आह्मी कांहीं झोपीं गेलों नाहीं, मूर्खपणानें हे लोक आमच्यावर दोषारोप करतात. लढाईची तयारी फार जारीनें आह्मीं चालूं ठेविली आहे. ती लोकांस व वर्तमानपत्रकर्त्यांस कळूं नये अशी आमची इच्छा होती, पण नाइलाजास्तव ती बातमी आतां बाहेर आणावी लागली. क०

शाहाजादे प्रिन्स आफ वेल्स हे राजपुत्र हेनरी यांच्या विवाहा प्रीत्यर्थ बर्लिन येथें जाण्यासाठीं निघाले असें लंडनच्या ता. २० मेच्या तारेवरून कळतें.

शतायुषि वैद्य— फ्रान्स देशांतील प्रसिद्ध वैद्य एम. चेवरूइल यांचें वय १०२ वर्षांचें होण्याला ४ महिने कमी आहेत. तरी त्यांची प्रकृती निरोगी असून दिवसांतून दोन वेळ जेवतात. हवा स्वच्छ असली तर फिरावयास जातात. घरी असतांना आपला वेळ वाचन व पत्रांची व्यवस्था यांत घालवितात त्यांचें असें ह्मणणें आहे कीं, कामाच्या नियमितपणानें आयुष्य वृद्धि होते. ते शास्त्रीय विषयांचा विचार करणाऱ्या सभेस दर आठवड्यास जात असतात तेव्हां बरोबर आपल्या ८० वर्षांच्या पुत्रास घेत असतात. सु० प०

समाजशास्त्र हे स्वतंत्र शास्त्र नसून उत्क्रांति शास्त्र ह्मणून जें दुसरें शास्त्र आहे त्याचा भाग आहे. उत्क्रांतीचें तत्व असें आहे कीं जगांतील प्रत्येक गोष्ट आरंभी क्षुल्लक होऊन तिच्यांत सुधारणा होत होत प्रत्येक गोष्ट तयार झाली आहे. हल्लीं जगांतल्या सर्व उत्तमावस्थेस पोंचलेल्या गोष्टि या प्रमाणें उत्क्रांतिनियमानें वाढत चालल्या आहेत असें या शास्त्रांत सांगितलें आहे. हें शास्त्र फारच उपयुक्त आहे. उत्क्रांतिशास्त्राचा मूळ संस्थापक थामस डारवीन या नावाचा मोठा तत्ववेत्ता होऊन गेला. हा हरबर्ट स्पेन्सर याचा आजा होता. प्रत्येक पदार्थ मूळच्या क्षुल्लक तत्वापासून वाढत वाढत सध्याचे उच्च स्थितीस येऊन पोंचतो, असा शोध प्रथमतः याच तत्वज्ञान्यानें लाविला. मानवी प्राणी हा अशाच रीतीनें सध्याचे मानवी शरीराप्रत पोंचला आहे. त्याची या स्थितीच्या पूर्वीची स्थिति वानर हा होय. हा थामस डारवीनचा विचार सांप्रत पुष्कळ विद्वान लोकांस मान्य आहे. समाजशास्त्रकार हरबर्ट स्पेंन्सर यानें आपलें शास्त्र याच उत्क्रांतीच्या पायावर रचिलें. मनुष्याचें मन हें सृष्टीतील द्रव्याचीच उत्क्रांति आहे. के०

पावसाविषयीं आर्कातः— चालू सालचा पावसाळा मुंबई व दखन या प्रांतांस धोका देईल असें अनुमान सरकारचे वेधशाळेचे अधिकाऱ्यांकडून काढण्यांत आलें आहे. पाऊस न पडल्यानें देशांत दुष्काळ पडावयाचाच. आणि दुष्काळा पासून लोकांस किती संकटें व दुःखें सोसावीं लागतात हें आतां सर्वांचे अनुभवास आलें आहेच. गरीब लोकांस, हा दुष्काळरूपी राक्षस लाखोंच्या संख्येनें आपल्या जबड्यांत टाकीत असतो. आमचे सरकारास मागील दुष्काळामुळें चांगलें समजून आल्यामुळें या अरिष्टापासून गरीब रयतेस सोडविण्याकरितां एक कायमचा फन्ड राहाण्या करितां पूर्वी लायसेन्स ट्याक्स व हल्लीं इनकम ट्याक्स हा कर जरी ठेविला आहे परंतु सरकारचा जो जमा खर्चाचा खर्डा दर साल बाहेर पडत आहे त्यावरून दुष्काळांत उपयोगी पडणाऱ्या फन्डाची दुसऱ्या कामींच आहुती पडत आहे म्हणजे सरकाराचा उत्पन्नापेक्षां खर्च जास्त होतो असें दिसून येते. दी० ब०

मासिक पुस्तकावली— देशाभिमानाच्या असह्य ज्वालेनें होरपळून गेलेले एक एडिटर आपल्या एका भोळ्या मित्रापाशीं ह्मणतात काय करावें हो! आमच्या देशांत अगोदर 'विविध ज्ञानविस्तार' झाला पाहिजे. 'कला कौशल्य विज्ञान' लहानापासून थोरापर्यंत आणि श्रीमंतापासून गरीबापर्यंत सर्वांस सारखें अवगत असणें अगदीं जरूर आहे. 'बृहत्कला कौशल्य कोश' आपल्यांत कांहीं लहानसहान नाहीं. पण काय करावें, ज्यांचें लक्ष 'शेतकरी' होण्याकडे किंवा 'काव्यार्थ प्रदिपांतच' निमग्न होऊन 'आर्यमित्र' या खऱ्या नांवाला न शोभण्याजोगें वर्तन करण्याकडेसच लागलें हें आमच्या देशाचें मोठें दुर्भाग्य होय. स्वतः 'ज्ञानसंग्रह' करून आपल्या बंधूस 'सुज्ञानामृत' पाजण्याचा प्रयत्न करावा हें योग्य नाहीं तर बसले शुष्क 'वेदार्थयत्न' करीत किंवा 'षड्दर्शन चिंतनिके'चें चिंतन करीत अहो. हल्लीं लोकांत नाहीं ते दंभ शिरूं लागले आहेत. याजकरितां 'दंभहारक' मंडळीची जरूरी फार आहे. पण काय करावें! स्वच्छ चंद्रिकेच्या प्रकाशांत 'निबंधमाला' वाचून 'मनोरंजन' करून घेण्यातच सदा मंडळी गुंग असते. आपल्या बालबोध वर्तनानें लोकांस किंत्ता घेण्यास लावणें हें आपलें अवश्य कर्तव्य असें सर्वांस वाटावें. तेव्हांच आमच्यांत कांहीं सद्गुणी पुरुष निपजतील अशी आशा आहे. आमच्या 'गृहिणी'च्या उन्नत्यर्थ थोडे परिश्रम करावयास पाहिजेत असें नाहीं. 'विविधकथासंग्रह' करण्या इतकें तरी निदान त्यांना ज्ञान अवश्य हवें आहे. त्यांच्यांतले अज्ञानतिमिर घालविण्याकरितां 'ज्ञानदीपा'ची अवश्य तजवीज झाली पाहिजे. ठिकाठिकाणीं होत असणारा 'कोकिळ' रव ऐकण्यांतच आमच्या मंडळीनें गुंग न होतां हातांत 'सत्यदीपिका' घेऊन ज्ञानविस्ताराचें व देशहिताचें काम केलें तरच त्यांत त्यांचा थोरपणा व्यक्त होईल. नुसत्या 'अर्णवा'चें मंथन करून त्यांतील नास्त्र कथेचा आस्वाद लोकांस दिल्यानें 'लोकहितवर्धन' होत येतें असें नाहीं. शिवाय 'सद्धर्मदीप' दिवसें दिवस जितका प्रकाशित होईल तितका करणें हें प्रत्येक दीनमित्र ह्मणविणाऱ्याचें काम आहे. हें मात्र आमच्या लोकांना विसरतां कामा नये. असो अशा प्रकारच्या आमच्यांत उणीवा आहेत त्या सर्व तो रामचंद्र पूर्ण करो ह्मणजे झालें. आणि आमच्या जनबोधकासारखी मंडळी निरानिराळ्या जातींत उत्पन्न होऊन पःकाश्रित जातींत देखील 'न्यायाश्रय' करण्याची उत्कट इच्छा प्रबळ होत चालली ती नाहींशीं व्हावी. आणि तिच्या ऐवजीं ज्योतिषादि अनेक शास्त्रांचा प्रकाश पाडून काव्येतिहास 'संग्रह' करण्याची सवय आह्मांस लावणारा कोण धन्वंतरी भेटेल तो भेटो! न्या. सिं.

भयंकर वादळ डिस्लोस नुकें नें वादळ झालें, त्याच्या योगानें पांच च्यार मनुष्यें ठार मेलीं, आणि दोनशांवर मनुष्यें जाया झालीं. या खेरीज जनावरांचा आणि मालमत्तेचा किती नाश झाला आहे याचा अद्याप ठिकाण नाहीं. पण बहुत नुकसान झालें आहे ह्मणतात. ज्ञे. मि.

---

☞ हें पत्र आकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साल अखेर ″ ७ ″ १ ०८
किरकोळ अंकास......................०४
नोटिशीबद्दल.
१० ओळींचे आंत रु. १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस-........०१

Single copy..............................1 as.

Advertisements.
Below 10 lines...2 Rs
Per line over 10...4as
Repetition perline...3

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR.

VOLXXII — AKOLA MONDAY 11 JUNE 1888 — NO. 23

वर्ष२२ — अकोला सोमवार तारीख ११ माहे जून सन १८८८ इ० — अंक २३

## जाहिरात.

पुणें "ज्ञानचक्षु" छापखान्यांत विक्रीस तयार असलेल्या पुस्तकांची यादी.

| | | |
|---|---|---|
| मराठी आक्ट. | किंमत | ट. ह. |
| क्रिमिनल प्रोसिजर सटिक | ५ | ०८ |
| सिव्हिल प्रोसिजर सटीक | ५ | ०८ |
| पिनलकोड सटीक....... | ७ | ०८ |
| न्यायरत्न......... | २ ०८ | ०२ |
| रेव्हिन्यु कोड........... | ०८ | ०१ |
| सदरची रुळी........... | ०८ | ०१ |
| स्टांप आक्ट......... | ०६ | ०१ |
| कोर्ट फी आक्ट....... | ०६ | ०१ |
| कराराचा आक्ट....... | ०१३ | ०२ |
| पुराव्याचा आक्ट....... | ०८ | ०१ |
| रजिस्टर आक्ट....... | ०६ | ०१ |
| मुदतीचा आक्ट....... | ०६ | ०१ |
| आबकारी आक्ट....... | ०७ | ०१ |
| जंगलसंबंधीं आक्ट........ | ०८ | ०१ |
| विशेष न्यायाचा आक्ट ... | ०८ | ०१ |
| वतनदार आक्ट ... ....... | ०६ | ०१ |
| लोकलबोर्ड आक्ट....... | ०६ | ०१ |
| मनोरंजक पुस्तकें. | किंमत | ट.ह |
| श्री भावार्थरामायण.... | २० | २ |
| विचित्रपुरी.......... | १ | ०२ |
| मदनमंजरी .......... | २ | ०२ |
| कामकंदला नाटक.... | १ | ०२ |
| उपयुक्त चमत्कार सं. भा. १ तें १० दर भागास किं दहही भा.घेत.ट.हा.माफ. | ०५ | ०१ |
| अलखमेपलख पलखंभ दर्यांव | ०४ | ०१ |
| सतारीचें १लें पुस्तक.... | १०४ | ०२ |
| संगीत रावाविलास नाटक | ०६ | ०१ |
| मदनजन्म नाटक...... | ०१२ | ०२ |
| चमत्कारचिंतामणि .... | ०१३ | ०२ |
| मल्लविद्याप्रकाश........... | १ | ०२ |
| ऋणसंहार............... | ०४ | ०१ |
| मराठी म्हणी.......... | ०७ | ०१ |
| गोपीचंद नाटक ( हीं. ) . | ०१५ | ०२ |
| मराठी रबुसर्ग दर भा. | ०१० | ०१ |

भाऊ गोविंद सापकर, ज्ञानचक्षूचे मालक

## नोटिस.

विठोबा वल्लद रामा पाटील काळे रहाणार गउरखेड तालुके मलकापूर जिल्हा बुलडाणा यास नोटीस देणार गुणाई मर्द विठोबा पाटील काळे रहाणार हल्लीं तिगरें तालुके मलकापूर जिल्हा बुलडाणा यांस नोटीसानें असें कळविलें जातें कीं तुमच्याशीं माझें लग्न होऊन अदमासे दहावर्षें झालीं अलीकडे अदमासे चार वर्षांत तुह्मी मजला घरीं घेऊन जात नाहीं. तुमचे पासून मजला एक मुलगा जाहला आहे. त्यास ही अदमासे चार वर्षें होत आलीं मी ह्या चार वर्षांत माझा भवणाई नांमे मारुती वल्लद देवाजी हागे याच्या घरीं मी व लाहान मूल मिळून आज चार वर्षें या गृहस्थापासून कर्ज काढून मी निरवाह करीत आहे. आतां मजला कर्ज मिळत नाहीं. याजकरितां नोटीसीनें असे कळवितें कीं नोटीस पावल्यापासून एक महिन्याचे आंत सदरील चार वर्षांची मुलाची व माझी खावटी वगैरे मिळून रुपये २५० आणून द्यावेत व मजला पुढें चार जातभाई प्रमाणें घरीं नेऊन घरसंसार करावा व असे करण्या बद्दल चार पंचाची खातरी करून द्यावी. असें न केल्यास मी हीच तुमची सोडचिठ्ठी समजून दुसरा घरठाव करीन. व खावटीचे रुपये २५० बद्दल रीतिप्रमाणें काम चालवून अखेर निकाल होईपर्यंत जें नुकसान वगैरे होईल तें सर्व भरून घेतलें जाईल. मग कोणच्याही प्रकारचा हक्क मजवर तुमचा नाहीं. ह्मणून दिली नोटीस सही तारीख ६ माहे जून सन १८८८ इसवी.

सही
गुणाई मर्द विठोबा पाटील
काळे इच्या हातची बांगडी

## पत्रव्यवहार.

ह्या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असेल असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस.

वि. वि मास्तर लोक शाळाखात्यांतून दुसरे खात्यांत कमी पगारावर जाण्यास कां उत्सुक असतात ह्याचीं अनेक कारणें आहेत त्यांपैकीं कांहीं सांगतो. मास्तर लोकांचे हातीं अधिकार मुळींच नसतो. कमिटीची मदत केवळ धर्माची. तिचे हातून मास्तराचें बरें तर व्हावयाचें नाहीं. परंतु प्रसंगोपात, मास्तरचा व तिचा बेबनाव झाल्यास नुकसान होण्यास वेळ नाहीं, खेड्यांतील अडाणी लोकांनीं, मुलांस थोडी शिक्षा मास्तरांनीं दिली असतां शाळेंत जाऊन मास्तरांस गालिप्रदान करणें. फीचे नवीन दर सुरू झाल्यापासून तर मास्तर लोकांस फारच सुख झालें आहे. अधिकाऱ्यांचें हुकुमाप्रमाणें वीस तारखेचे आंत फी वसूल न झाल्यास भरणा कोणते प्रकारें होत असेल हे मास्तर लोक जाणतच आहेत. शिक्षकसमाज स्थापन झाल्यापासून मोठ्या शाळांना फायदा झाला असेल तर कोण जाणें परंतु खेड्यांतील शाळांना यत्किंचित ही झाला नाहीं. शाळा बिघडली असतां अधिकाऱ्यांचे सक्त हुकुम कीं, तुमचे अंगीं लोकप्रियता हा गुण नाहीं. शाळा न सुधारल्यास नुकसानीस पात्र व्हाल. कित्येक अधिकारी तर असें आहेत कीं, कमिटीचें केवळ दासच. तिचें मास्तर वाईट आहे असें ह्मटलें कीं नुकसान करण्यास वेळ नको. आणखी ही पुष्कळ कारणें आहेत तीं सवडीनुसार कळवीन. पत्रविस्तार फार झाला म्हणून पुरें करितों. कळावे लोभ असावा ही विनंति.

आपला एक
(त्रस्त.)

रा. रा. वऱ्हाडसमाचारपत्रकर्ते यांस

वि. वि. रात्रीं मी निजलो असतां मला पुढील स्वप्न पडलें तें मला हो जरा चमत्कारीक वाटल्यावरून आपल्या वाचकाकरितां पुढें सादर करितो:—एकगाय मोठ्या वेगानें धावत येतांना माझ्या नजरेस पडली; तिचे कान टवकारलेले असें होते. तिच्या गळ्यांत एक तुटका दोर होता; व ती तिच्या पायांत येऊन त्या गाईची व जमिनीची एकदम भेट करावयास पहात होता परंतु त्याला न जुमानतां व जमिनीला जणूकाय पाय न लावतां वायु वेगानें पळत होती. मला तर कांहीं वेळ वाटलें कीं दुष्यंतराजा पाठीमागें लागलेलें असें हें हरणच आहे कीं काय? मागील पायाच्या माऱ्यानें त्रासलेलें असें तिचें शेंपूट तिच्या पार्श्वभागावर उभें राहिलेलें असें होतें. पृथ्वीला पाद टणत्काराचा राग येऊं नये ह्मणून जणूकाय ती फेसरूपी मौक्तिकमाला अर्पण करित आहे व मला कोणी सोडवा ह्मणून हंबरडा फोडून सांगत आहे असें दिसेल. तिच्या उष्णश्वासोश्वासा वरून व तिच्या नेत्रांतील अश्रूवरून मला असें वाटलें कीं हिच्या मागें कोणी काळ दूत लागलेला आहे व त्यालाही टाळून सैरावैरा धांवत आहे. ह्या प्रमाणें ती धांवत धांवत मजपुढें येऊन उभी राहिली; व तिला वाचा फुटून ती पुढें लिहिल्या प्रमाणें बोलूं लागली:—मी एक निरुपद्रवी प्राणी आहे. मी फार गरीब म्हणून माझ्या गरीबपणाचें उदाहरण सर्वांना देतां मी तुमच्या वर्गांत पूज्य मानली आहे; मी म्हणजे केवळ तुमची दुसरी आईच आहे. मी सर्व तऱ्हेनें तुमच्या उपयोगाला पडतें. माझीं मुलेंही तुमचीं पोटें चालवीत आहेत. त्यांनीं आपला देह तुमच्या अगदीं स्वाधीन करून टाकला आहे. माझें दूध लहान तान्ह्या अर्भकांना पोषतें आहे. माझें शेण सारवावयाच्या व जाळावयाच्या उपयोगीं पडत आहे. ह्या प्रमाणें मी तुमच्या उपयोगीं पडत असतां तुम्हाला माझा उपयोग कांहींच कां कळूं नये. तुमच्या डोळ्यावर एवढी धुंदी कशाची आलेली आहे. आज तुमच्या आयांच्या माना कापल्या जाऊन त्या कित्येकांच्या घशांतून उतरत आहेत. दुष्टांनो! माझ्या मांसा पेक्षां वर सांगितलेले दुसरे उपयोग थोडे कां आहेत. आज आमची प्रजा कमी कमी होत गेली तर उद्यां पासून नांगराचें जूं तुम्हालाच खांद्यावर घ्यावें लागेल हें कसें तुम्हाला कळत नाहीं माझ्या मुलांच्या कोवळ्या मानेला, दुष्टांनो! केवढाले घट्टे पडले आहेत तुम्हाला कसें दिसत नाहीं. मूर्खांनो! मी जो पर्यंत तमच्या उपयोगाला पडतें तों पर्यंत तुम्ही माझी पूजा करितां व मला 'गाई मातें' असें म्हणतां व तो प्रसंग गेल्यावर माझी मान दुसऱ्याच्या ताब्यांत देऊन 'कापा' असे शद्ब कसे तुमच्या तोंडांतून निघतात! हर! हर! मेल्यानों! कायही तुमची स्थिती! आईबापाच्या पोटीं उत्पन्न होऊन व माझे दुधानें पुष्ट होऊन लहानाचे मोठे झालात व त्याच मला मारावयास नेतांना आपल्या डोळ्यांनीं पहातां! माझे खरे वीर पुत्र गेले! शिवाजी बाळ तोही गेला, ह्या प्रमाणें माझी स्थिती असतां त्यानें माझी सुटका करण्या सार्ठी कित्येकदां जीवही धोक्यांत घातला! शाबास! शाबास! तूं माझ्या व आपल्या आईच्या दुधाचा खरा उपयोग केलास. तूं तर मराठाच आहेस परंतु बाजीरावा सारख्या ब्राम्हणांनीं ही माझें पुढें रक्षण केलें. नाहीं तर आतांची शिकलेली व सुधारलेली मंडळी. आग लागो तुमच्या शिक्षणाला व सुधारणेला! ज्यामध्यें तुमचें होत आहे तें न करितां भरवा गणपतीच्या देवळांत सभा! द्या व्याख्यानें! करा सब्बा ! आणि नंतर विसराही ! आणि करा तंटे ! वाहवारे सुधारक ! भर देवाच्या पुढें आणि तोहि नुसती वाचा नाहीं. तर प्रत्यक्ष सही ! आणि मग सांगा सब्बी कीं मला अजून चाळीसावें वर्ष लागावयास एक दिवसाचा अवकाश आहे ! तुमच्या आया, बायका, जर लोकांनीं नेल्या तर तुम्हाला कसें वाटेल! व आमचा दरोज इतका चुराडा होत असून तुह्माला ह्याबद्दल कांहींच का वाटूं नये. तुह्मी कोणत्या सुधारणा करितां! नळ बांधावयाच्या! सडका करावयाच्या! दुसऱ्याचीं घरें पाडावयाचीं! सडकावरून पाणी शिंपावयाचें! परंतु ज्या मध्यें तुमचें ह्या सर्वां पेक्षां जास्त हीत तें सोडून ह्या भलत्याच गोष्टी काय लागलात! देशांत, खेड्यांत, गांवांत व बहुत करून प्रत्येक घरांत मी व माझीं पोरें ह्या पैकी कोणी तरी सांपडतीलच सांपडतील! माझ्या मांसा प्रमाणें माझ्या दुधाच्याही अंगीं गूण आहेत. जर तितकाच फायदा मिळून आह्मी जिवंत राहिलों तर त्यांत तुमचें काय वाईट झालें? जर आह्मी जिवंत राहिलों तर आमच्या जिवांत जीव आहे तों पर्यंत तरी निदान आह्मी तुह्माला कधींही तूट येऊं देणार नाहीं. आपल्या बायकांना शिक्षण द्या, शिक्षण द्या; ह्मणून जी ओरड चालविली आहे ती कशा करितां! तुह्मी शिकून काय दिवे लाविले आहेत तें तर सांगा. त्यांना शिक्षण एवढ्याच करितां द्यावयाचें कीं नाहीं. त्यांच्या मनांत आमच्या विषयीं सध्या जी पूज्यबुद्धि [illegible] तीही तुमच्या प्रमाणें घालवून टाकावयाची [illegible]! वाहवा! प्रत्यक्ष आज तुमच्या पुढें [illegible]रणा करण्यास केवढा मोठा विषय पडला आहे तिकडे कसें तुमचे डोळे झाकले आहेत. व जें नाहीं नाहींत ते विषय काढून उगीच कुटीत बसला आहांत. जी गोष्ट प्रत्यक्ष फायद्याची

असतां तुझाला दिसत नाहीं व दिसली तरी त्या बद्दल तुम्हाला कांहीं करतां येत नाहीं तेव्हां तुम्हाला म्हणावें तरी काय! पुरुष किंवा स्त्रिया! खरोखर बांगड्या लुगडि व केसच काय ते कमी! बाकी सर्व बरोबर. तर कांहीं तरी युक्ति काढा व आमचें संरक्षण करा. आमच्या करितां खर्च केलेला पैसा व्यर्थ गेला असें कदापि समजूं नका. वर्गणी करून पैसे जमवा, व त्यांतून आमच्या पोटाला थोडें थोडें देत जा. व जर कोणी आह्मास विकतील तर त्यांना उपदेश करा. कोणत्याही उपायानें आमचें संरक्षण करा. ह्या प्रमाण स्वप्न पडल्यावर मी जागा झालों व पाहूं लागलों तों गाय वगैरे कोठें कांहीं नाहीं. हें पाहून मला फार आश्चर्य वाटलें व म्हणून तुमच्या वाचकांना सांगतों कीं पुन्हां वाचा, अवश्य वाचा, व दुसऱ्यांना वाचावया विषयीं उपदेश करा.

आपला
झोंपेंतून उठलेला

वऱ्हाडसमाचार.

मिती ज्येष्ठ शुद्ध २ शके १८१०.

सालाबाद प्रमाणें चक्रवर्तिनी महाराणी व्हिक्टोरिआ सरकारच्या वाढदिवसाच्या उत्सवा निमित्त हिंदुस्थानांतील थोरथोर संस्थानिक, सरकारी मोठमोठे हुद्देवाले, सरदार मंडळी, जहागीरदार, श्रीमान सुखवस्तु लोक इत्यादिकांस त्याच्या त्यांच्या मानपानाप्रमाणें व सरकारास संतुष्ट राखण्याची ऐपत व हिंमत दाखविली असेल त्या प्रमाणानें 'इंडियाचें तारे, राजे, खानबहादुर, दिवाणबहादुर रावबहादूर, राव साहेब, सरदार' इत्यादि उच्चनीच पदव्या देण्यात आल्या आहेत. ह्या पदव्या देण्याचे कायदेकानू आह्मांस माहीत नाहींत पण हिंदुस्थानांतील या पदवींच्या मानास पात्र असे गृहस्थ पदवीवाले निवडले जात असतील असें ह्मणणें भाग आहे. वर सांगितलेल्या पदव्या व त्या सारख्या आणखी अन्य पदव्या ज्यांस मिळतात त्यांचा वर्तनक्रम सरकारास पसंत पडावा लागतो त्या प्रमाण यंदाच्या यादींतल्या पदवीवाल्या मंडळीस ही हा नियम लागूं असावा. ह्या पदव्या दिल्या ह्मणजे वाढ दिवसाचा सण साजरा होतो आणि सरकारच्या मान्यतेस उतरलेले नेटिव लोक आणि गोरे लोक ह्या पदव्यामुळें सहजरीत्या लोकमान्य होतात. ह्या दोन्ही गोष्टीवरून सरकारचा व्हावा तितका किंबहुना जास्त फायदा होतो. एकेरसीं सरकारनीं शावून काढलेल्या पदव्यांची सरकारच्या समजा प्रमाणें उत्तमरीतीनें सार्थकिता होते आणि दुसऱ्यापक्षीं लोकप्रिय राजनिष्ठ गृहस्थांस [illegible] होऊन त्याचा योग्य सन्मान होतो. हिंदुस्थान सरकार आपल्या गोऱ्या व नेटिव मंडळीचा प्रेमपूर्वक ह्या थोरवीच्या पदव्या देऊन आदर सत्कार करितें हें सरकारच्या थोर मनाचें व गुणग्राही राजनीतीचें दर्शक होय. हें मोठें श्रेय सरकारास नुसत्या सोन्या रुप्याच्या पदकांवर आणि कागदांच्या बिल्ल्यावर मिळतें आणि अर्थात् तिजोरीस कांहीं एक धक्का न लागता सरकारचा इष्ट हेतु एवढ्या साध्यां व सोप्या उपायांनीं सफल होतो हें पाहून आम्हास मोठा संतोष वाटतो.

आमच्या पूर्वकालीन बादशाही राजदरबारची पद्धत अगदीं निराळी असे. पूर्वी कोणा थोर गृहस्थास कांहीं पदवी द्यावयाची असली अथवा त्यांचा मानसन्मान करणें असला तर त्याच्या त्यांच्या लहान मोठ्या अधिकारा प्रमाणें जवाहीर, रत्नें वगैरे बहुमोलाचे पदार्थ किंवा जरतारी शेला पागोट्या सारखे पोषाख थाटमाटाच्या समारंभानें देण्याचा संप्रदाय चालत आला आहे तो आमच्या व्यवहार कुशल इंग्रज राज्यकर्त्यांनीं मोडून टाकिला आणि त्या ऐवजीं ह्या थोरवीच्या साध्या पदव्या देण्याचा प्रघात घातला ही गोष्ट सरकारच्या शहाणपणाची होय. बड्या बड्या राजमान्य मंडळीच्या बहुमान राखण्याचा हा सरकारनें कित्ता घालून दिला आहे तो सर्वांनीं लक्ष्य लावून वळवावा अशी आमची सविनय प्रार्थना आहे. सरकारा प्रमाणें आमच्या राजे रजवाड्यांस खर्च वेचाच्या पेंचांत न येतां सर्वांस राजीखुषी ठेवतां आलें म्हणजे त्यांनीं दुनियेंतली एक अजब चीज संपादली असें आम्ही समजतों. ही गुरुकिल्ली आमच्या संस्थानिकांस मिळाली ह्मणजे कोट्यावधि रुपयांचा दरसाल अपव्यय होत आहे तो होणार नाहीं. निजामासारख्या बलिष्ट मांडलिक राजा पासून तहत अल्पस्वल्प जहागीरदारा पर्यंत गोऱ्या अधिकाऱ्यांची मनधरणी करण्या साठीं किती पैशाचा फन्ना पडतो याची कल्पना केली ह्मणजे मन अगदीं थक्क होऊन जातें. साहेब बहादुरांच्या सरबराई व मानपान राखतां राखतां आमच्या नेटिव राजपुरुषांची किती त्रेधा उडते हें सर्वांस विश्रुत आहे. एखाद्या विशिष्ट व्यक्तीस उपरोधून हा विषय प्रतिपादण्याचा आमचा बिलकूल इरादा नाहीं किंवा राजद्रोह केल्याचें पातक आमच्या मस्तकीं आह्मी घेऊं इच्छित नाहीं. हा लेख लिहिण्याचा आमचा मूळ उद्देश असा आहे कीं आह्मी वर निर्दिष्ट केलेल्या सूचना प्रस्तुत कालास लागू होण्या सारख्या असतील त्या घडवून आणण्या साठीं लोकांकडून अनमान होऊं नये.

हल्लींचे व्हाइसराय आणि गव्हरनर जनरल लार्ड डफरीन साहेब हे इंडिया सोडून चालूं साल अखेर स्वदेशीं परत जाणार आहेत तेव्हां प्रयाणाच्या वेळीं लाट साहेबांच्या सन्मानार्थ लक्षावधि रुपयांचा चुराडा उडेल आणि ही गोष्ट लाट साहेबांस आवडेल किंवा नाहीं अशा विषयीं भ्रांती आहे. हिंदुस्थानची खरी कळकळ बाळगण्याचा साहेब बहादूरांचा बाणा आहे तेव्हां लोकांस स्वतां करितां त्रास सोसावा लागेल अशीं कामें त्यांच्या युक्तीस संमत ही नसतील. आमचे चार वर्षांचे बडे पाहुणे इंडियांत आहेत तोपर्यंत मोकळ्या मनानें व प्रेमळ अंतःकरणानें आमचा शोध समाचार घेत आहेत याबद्दल आम्ही सर्व हिंदुस्थानचे रहिवाशी लार्ड डफरीन साहेबांचे फार फार आभारी आहों आणि राणीसरकारच्या वतीनें लाट साहेबांनीं केलेल्या अत्युत्तम देशसेवेबद्दल त्यांस 'लार्ड डफरिन इंडियाचे परम मित्र (Lord Dufferin - the great Friend of India) हा किताब प्रेमपुरस्सर देऊं इच्छितों तर त्यांनीं ही आमची सप्रेम व निष्कपट सलामी उदार मनानें स्वीकारावी आणि आह्मी त्यांच्या नांवास जोडलेल्या पदवीप्रमाणें आपला वर्तनक्रम ठेवून आपल्या नांवापुढें लिहिलेली पदवी सार्थ आहे ह्मणजे खरोखरच आपण इंडियाचे परम मित्र आहोंत असें आपल्या कर्तबगारीनें सर्व जगास महशूर करावें अशा पर्यायाची लाट साहेबांस सर्व लोकांनीं हात जोडून विनंती करावी आणि सरकारी कागदोंपत्रीं आह्मी अर्पण केलेला किताब लार्ड डफरिन साहेबांच्या नांवापुढें जोडला जावा ह्मणून हिंदुस्थान सरकार मार्फत थेट विलायत सरकारचें अभिवचन घ्यावें आणि थोडक्यांत आह्मास सोडून घरीं जाणाऱ्या आमच्या पाहुण्याची आदरसत्कारपूर्वक रवानगी व्हावी व आजपर्यंत चालत आलेलें प्रेम दिवसेंदिवस वाढावें अशी आमची मनापासून इच्छा आहे.

---

यंदा महाराणी सरकारच्या वाढदिवस निमित्त पुष्कळ गृहस्थांस सन्मानार्थ निरनिराळ्या पदव्या मिळाल्या आहेत त्यामध्यें अनेक वर्षें लोटल्यानंतर वऱ्हाडची ही वरणी लागली आहे आणि खालील सहा गृहस्थ निवडले आहेत हे कळविण्यास आह्मांस आनंद वाटतो. रा. रा. श्रीराम भिकाजी जटार वऱ्हाड शाळा खात्याचे डायरेक्टर आणि रा. रा. पुरुषोत्तम नारायण भट एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर उमरावती या उभयतांस 'राव बहादूर' किताब देण्यांत आला आहे रा. रा. देवराव विनायक अकोला मुनसिपालीटीचे व्हाइस प्रेसिडेंट आणि रा. रा. राम विलास पोकरमल उमरावती मुनसिपालिटीचे सभासद यांस 'राव साहेब' केलें आहे. देऊळघाटचे महंमद सलामुल्लाखान आनररी माजिस्ट्रेट बुलढाणा आणि खामगांव मुनसिपालिटीचे सभासद भोतेखान लालखान यांस अनुक्रमें 'खानबहादूर' व 'खानसाहेब' अशा पदव्या देण्यांत आल्या आहेत. कधीं कधीं पदवी धारण करणाऱ्या मनुष्या पासून त्या पदवीची खरी थोरवी कळून येते त्या प्रमाणें वरील गृहस्था पैकीं पहिल्या त्रिवर्गांस नवीन पदव्या मिळून त्या राजमान्य पदव्या सार्थ झाल्या ही गोष्ट विशेष अभिनंदनीय होय.

# The Berar Samachar

MONDAY JUNE 11, 1888.

The financial condition of the Nizam's state requires a special study to ascertain whether that Government can offer the grand sum of sixty Lakhs for frontier defence. The prospects of the current year are not, in the main, unsatisfactory. The budget of the year places the revenue at Rs. 3 37,45,650, and the expenditure at Rs.3,28,60,890 so that the surplus left behind is nearly nine lakhs. Though these estimates seem to have been drawn unusually low a surplus of nine lakhs will not go far towards a gift of sixty nor even towards the first annual instalment of twenty lakhs. The surplus, substantial though it seems, will practically prove quite inadequate for a working balance. If the Nizam were to borrow the sum of the sixty Lakhs he offers in a fit of generosity to the Government of India the state would have to undertake a financial responsibility of some lakhs as interest upon the debt until the day of plenty came when the financial resources would be in excess of the contingent liabilities of the state so as to pay off the debt borrowed most probably at nine per cent. But that day is not in sight when the state can of its abudance render financial aid to the Paramount Government. Nearly six months have elapsed since the offer was made. The Governor-General has acknowledged it in terms of warmest appreciation but though no formal refusal has been made the long interval of time through which the offer has been allowed to lapse gives us grounds to suppose that the Government hesitates to accept the munificent gift.

We are profoundly thankful to the Bombay Gazette for his comment upon the above question:—

There is indeed no form in which the Nizam's offer could be accepted at this time without doing detriment to his State. Lord Ripon's solemn adjuration to the Nizam at his installation to look well after his finance would read like a mockery if, in the face of Mr. Mehdi Ali's exposition of the present condition of those finances, the Government of India were to be a party to so costly and embarrassing a pledging of the credit of the State as would inevitably result from the acceptance of the sixty lakhs. We do not for a moment suggest that the native states should be discouraged from sharing, to the extent of their means, in the burden of frontier defence. The work concerns them almost as much as it concerns the Paramount Power, and there are ways and means by which they can be brought into co-operation with us. But there is a kind of help that no great Power can afford to avail itself of, and that is the help which embarrasses those who offer or are persuaded to offer it now.

---

The Governor-General in Council, in exercise of the powers conferred upon him by the Foreign Jurisdiction and Extradition Act, XXI. of 1839, and of all other powers enabling him in this behalf, is pleased to extend the provisions of Act XVI. of 1861 (an Act for licensing and regulating Stage Carriages) to the Hyderabad Assigned Districts, with effect from the first day of June, 1888, with a few modifications:

---

It is most gratifying to find some of our Berar grandees in the list of birth-day honours published in the Gazette of India of 2nd instant:—

KHAN BAHADUR.

Muhammad Salaamoola Khan of Deulghat, Honorary Magistrate at Buldana in the Hyderabad Assigned Districts.

RAO BAHADUR

Mr. Shriram Bhikkaji Jatar, Director of Public Instruction in the Hyderabad Assigned Districts.

Mr. Purshottam Rao Narayen, Extra Assistant Commissioner in the Hyderabad Assigned Districts and Judge of the Small Cause Court at Amraoti.

KHAN SAHIB.

Bhotekhan Lalkhan, Member of the Khamgaon Municipality in the Hyderabad Assigned Districts.

RAO SAHIB.

Deorao Vinayak, Vice-President of the Akola Municipality in the Hydera-

bad Assigned Districts.

Rambillas Pokermull, Member of the Amraoti Municipality in the Hyderabad Assigned Districts.

---

We acknowledge with thanks the receipt of the two annual reports-one on Civil Justice and the other on Criminal Justice for the year 1887.

---

## DESULTORY READING.

(continued from our last issue).

Those who deserve to gain that glorious boon must gain it by effort of their own, or be content to see the prize carried off for more deserving brows.

To conquer the rich plains of knowledge we have referred to, we must perceive the *giagantic* power of Time. Some educated idlers often complain of want of time when they have indeed boundless leisure. It is true that the most absolute master of his own hours still needs thrift if he would turn them to account, and also that too many never learn this thrift whilst others learn it late. To a man of good taste and sober temper there is no danger of wasting too much time so long as the waste is intentional merely for the relief of a break in the habit of his life. The best time-savers are the love of soundness in all we learn or do, and a cheerful acceptance of inevitable limitations. The time spent on unsound accomplishments has been in great measure wasted since the mere labour of trying to learn has been a discipline for the mind but wasted so far as the accomplishments are concerned Let us determine to have soundness *i. e.* accurately organized knowledge in the studies we continue to pursue. We should define each kind of knowledge as an organic whole, and soundness as the complete possession of all the essential parts. Nothing is so favourable to sound culture as the definite fixing of limits. Much time is saved by following pursuits which help each other. The memory easily retains the studies which are auxiliary to the chief pursuit. The secret of order and proportion in our studies is the true secret of economy in time. To have one main pursuit and several auxiliaries but none that are not auxiliary, is the true principle of arrangement. It is the desultory reading which secures this principle of study in all its essential parts. It is deplorable waste of time to leave fortresses untaken in our rear. Whatever has to be mastered ought to be mastered so thoroughly that we shall not have to come back to it when we ought to be carrying the war into the enemy's country. But to study on this sound principle we require not to be hurried.

It is rather tempting at this stage of our observations to open once more the old controversy between the ancients and the moderns and to fight the Battle of the Books over again. But we are unwilling to do it, because our object is not to set one generation or one country against another, but rather to awaken in ourselves an interest in the literature of all time, and to find the points which authors of different ages and nations have in common rather than those on which they may be supposed to be at variance. We may remember that the Battle of the Books began by a demand addressed by the moderns to the ancients that the latter, who were the occupants of the higher of the two summits of Mount Pernassus, should either reign their time honoured occupancy in favour of their younger neighbours, or else should allow the moderns to come and level the hill with their shovels and mattocks to such a height as they might think convenient. This modest proposal was courteously but summarily rejected by the ancients, who, as an alternative, proposed that the modern should rather occupy themselves by raising their own side of the hill than dream of pulling down the other. This was excellent advice applicable perhaps to other cases of rivalry besides that of jealous authors; and looking upon the course of events since Dean Swift's days, we may say that it has on the whole been followed. Assuredly the authors who have arisen both in this country and in others within the last century and a half have done much towards raising the modern standard, while in spite of the changes which modern education has brought about, inspite of the pressure of scientific competition and inspite of the discouragement of quotations, and the banishment of Horace from the house of Commons, ancient learning is still held in high esteem, and year by year fresh exertions are made into its well-known territories and fresh discoveries are reported from its well-troden plains. If modern literature has any competition to dread it is not that of the classical writers, but of the daily, weekly or monthly periodicals, which fall as thickly round us as the leaves in Vallum Brosa and go near to suffocate the poor victim which longing to enjoy his volume in peace whether that volume be of Sophocles, or of Shakespeare, or of Goethe or of Burns.

( to be continued.

---

## (CORRESPONDENCE.)

Jalgaon

To

The Editor Berar Samachar Akola.

Sir

Mr. Dina Baba of Jalgaon is a great Brahmin Merchant in the Akola District. He is very pious and honest and fears a man no less than he fears God in all his dealings. He is loved and respected by all classes of people for his affable manners and benevolence. He commands much respect among the great Government officials. Notwithstanding all this, the chief constable of Jalgaon named Punjaji has, they say, been trying to lower him any how in the estimation of the public and the Government servants. He brought against him a charge of theft and was about to arrest him under that offence as it is cognizable by the Police perhaps on the ground of private animosities.

Can any one suppose that a man of Dina Baba's position is apt of doing such an offensive act as the chief constable seems to think him capable of?

Will the Inspector General of Police who is very just, look into the case and teach the chief constable his lesson if he means to ruin a vitruous and respectable man!

"Justice."

---

Balapur 7-6-88.

To.

The Editor Berar

Berar Samachar

Sir,

The Station-Master and assistant Station-Master of Parus are wrongly involved in a maze of misappropriation of some fire-wood lying within the premises of the station. The manager of the G. I. P. Railway should give them fair trial so that they may get their characters cleared and some Sitaram and his associates should receive a proper return for their insulting conduct. It is a desirable part the manager should play that after he satisfies himself about the honest service of the station-Masters he should bring an action against the accuser in the Government Court.

Yours truly.

A.

---

## वऱ्हाड.

हवामान—मृग नक्षत्रांचे रुहानमोठे एकदोन पाऊस झाले आणि हवेंत थोडा गारवा ही आला आहे. यंदा पावसाळा योग्य वेळीं सुरू झाला हें एक सुचिन्ह होय. सध्यां उष्मा फार होत असतो आणि अभ्रें ही नेंहमीं येतात म्हणून विलक्षण उकाडा होत आहे. रोगराई म्हणण्या सारखी कांहीं विशेष नाहीं.

---

अबदुल हक्क प्रकरणाचा निकाल करण्यासाठीं विलायतेस कमिशन बसलें आहे त्यावेळच्या चालू चौकशींत 'डेकन मायनिंग, कंपनीपैकीं मि. इव्हान्स कंपनीचे शेअर विकणारे दलाल यांनीं प्रांजलपणानें बोलून दाखविलें कीं दलालीचा दर आठ दहा शिलिंग आहे तो हैदराबादेची खरी स्थिती कळली असती तर एक पौंड ही ठेविला असता. साहेबांची नजर चूक मोठ्या मौजेची आहे खरी!

---

मि० जी. सी. सुबराय नायडू मोर्शीचे तहशीलदार यांस १८७८ सालच्या पहिल्या आक्टा प्रमाणें अधिकार देण्यांत आले आहेत.

---

कमिशनर आफिसांतील आनररी अव्वाची मि. रस्तुमजी फरडूनजी यांस वणी जिल्ह्यांत बदललें आहे.

---

उमरावती मुनसिपालिटीच्या सभासदाच्या जागेवा मि. स्टानीक यांनीं राजिनामा दिल्यामुळें त्यांच्या रिकाम्या जागीं क्यापटन आर. व्ही. ग्यारेट असि. कमिशनर वर्ग १ रा यांस नेमिलें आहे.

---

वाशिमचे आकि० डेपुटी कमिशनर क्याप्टन मारिस साहेब यांस क्रिमिनल प्रोसीजरचे १० वे कलमाप्रमाणें अधिकार दिले आहेत.

---

कोळापूरचे आकि० तहशीलदार रा. रा. गोपाळ बळवंत यांस सेकंड माजिस्ट्रेट नेमून त्यांचे कोर्टास १०० रुपयांपर्यंत दावे चाल विण्याचा अधिकार दिला आहे.

---

आकोला मुनसिपालीटीचे सभासद बजावा रामचंद्र, जोरावरखा, व अबाजी खंडेराव हे मरण पावल्या मुळें आणि चौथे सभासद मि. टिकमदास ताराचंद हे आकोल्याहून देशीं गेल्या मुळें चार सभासदांच्या जागा फार दिवसा पासून रिकाम्या होत्या त्या जागीं रा. रा. कृष्णाजी हरी तहशिलदार, कृष्णाजी दिनकर सब असि० इंजिनिअर, सोराबजी माणिकजी ब्रुएल कंपनीचे एजंट आणि गोपाळराव खुशालराव वकील यांस सभासद नेमण्यांत आले आहे.

---

राव बहादूर श्रीराम भिकाजी जठार हे गेल्या सोमवार पासून पंधरा दिवसाच्या रजेवर गेले आहेत, आणि त्यांच्या रजेंत अकोला हायस्कूल हेडमास्तर मि. एटकीन साहेब यांस आफिशिएटींग डायरेक्टर नेमिलें आहे. मि. एटकीन साहेब वेळोवेळ आफि. डायरेक्टर होत आहेत व तेव्हां तेव्हां त्यांनीं आपलें काम चांगलें बजाविलें आहे ही गोष्ट त्यांस भूषणावह असून मागेंपुढें फायदेशीर होण्याचा संभव आहे.

---

सेकंड ग्रेड आपाथिकारी ओ. डब्ल्यू. जोन्स एम. डी. सिव्हिल सर्जन वाशिम यांस ते घेतील त्या तारखे पासून ६० दिवसांची हक्काची रजा मिळाली त्या रजेत मि. डब्ल्यू. जे. मांटगोमरी हैदराबाद कांटींजंट मधील पहिले ग्रेड असि. अपाथिकारी. यास वाशिमास सिव्हिल सर्जनच्या कामीं बदलले असत्याचें गेल्या ग्याझेट वरून समजतें मि. मांटगोमरी सेकंड ग्रेड अपाथिकारीच्या परीक्षेंत गुदस्त साली पसार झाले आहेत.

---

हैदराबाद कांटींजंट मधील चौथ्या पलटणींतले रिसालदार मेजर मुझाफर खान सरदार बहादूर यांस ( कंपानिअन आफ दी इंडियन एम्पायर ) सी. आय, इ. हा किताब राणी सरकारा कडून मिळाला आहे.

---

अपमृत्यु—गेल्या आठवड्यांत येथील मोर्णा नदींत दोघेजण बुडून मेले. त्या पैकीं पहिला रा. रा. रोहिणखेडकर यांचा भाऊ असून दिवेकर घाटावर स्नानास गेला होता. तो पाण्याच्या ओघानें घाटाच्या पायरीजवळील गाळांत फसून बुडाला असावा. दुसरा श्रीधर श्रीपत हा स्टेशनवर जाण्या साठीं मास्तुपशाअलीकडील बंधाऱ्याच्या फळ्यावरून उडी मारून जात असतां बावटळीच्या जोरानें पाण्यांत पडून मरण पावला. अलीकडे पाणी तुंबलेलें फार रहात गेल्यामुळें नदींत सर्व ठिकाणीं या काठा पासून त्या काठा पर्यंत सारखें तंतोतंत पुरुष दीड पुरुष पाणी असतें त्या मुळें सर्व पात्रभर बुडण्याची भिती सारखीच असते. बंधाऱ्या वरून जाणें धोक्याचें असून लोकांची सारखी रहदारी चालू असते. मनुष्यें अनेक वेळीं पडतात झडतात पण दुसरी मनुष्यें साह्यास मिळत असल्या मुळें प्राणहानि पुष्कळ प्रकारें कमी झाली आहे. पोलीसा कडून मुनसिपालिटीस सुचना झालेली आहे शिवाय खुद्द व्हाइस प्रेसिडेंटास ही बंधाऱ्या वरून पडण्याचा थोडाबहूत अनुभव आला आहे परी कमिटी इकडे लक्ष पुरवीत नाहीं म्हणून मोठा आचंबा वाटतो. आतां तरी मुनसिपालिटीनें पाणवठ्याच्या ठिकाणीं चांगला बंदोबस्त ठेवावा आणि बंधाऱ्यावरून जाण्या येण्याचा चांगला मार्ग तयार होईपर्यंत रहदारी बंद ठेवावी अशी आमची मुनसिपालीटीस प्रार्थना आहे.

---

'डेकन स्टांडर्ड वरून समजतें कीं निजाम संस्थानांतील इनस्पेक्टर आफ पोलीस यांचे ट्रांसलेटर मि. मीर अनवर अली यांस वऱ्हाडांत. एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर नेमणार आहेत.

---

## वर्तमानसार.

मुक्तिफौजेचा बोजवारा– क्विनेक येथें मुक्तिफौजेची एक पलटण आहे. तिच्यावर एक फौजदारी खटला चालून फौजेंतील एक टोपडा अपराधी ठरला. व शिवाय न्यायाधिशानें असें ही ठरविलें आहे कीं, मुक्तिफौज हा एक सार्वजनिक रोगच होय. ते०

डा. हंटर यांचा न्याशनल कांग्रेस विषयीं अभिप्राय. लंडन, ता० २३ मेः—

वरील सदरा खालील लंडन टाइम्समध्यें डा. ( सर ) हंटर यांच्या सहीचा एक निबंध प्रसिद्ध झाला आहे. त्यामध्यें त्यांणीं न्याशनल कांग्रेसमध्यें जें काम झालें त्या बद्दल बराच विस्तारानें मजकूर लिहिला आहे. नेटिवांना व्हालंटीअर कोरमध्यें सामील करण्याची न्याशनल कांग्रेसची मागणी अगदीं वाजवी आहे. नेटिव राजे आणि संस्थानिक यांणी आपल्या फौजा इंग्रज सरकारला परचक्रा पासून रक्षण करण्यासाठीं मदतीस देण्यास कबूल केलें आहेच. याचप्रमाणें लोकाना ही सरकारच्या मदतीस येण्यास सवड देणें हें इंग्रज सरकारास भूषणावह आहे. नेटिवांना व्हालंटीअर बनून त्यास सशस्त्र केलें तर माझी खात्री आहे कीं, रशियाची महत्वाकांक्षा आणि तदनुसार त्याच्या चालणाऱ्या इतर गमजा व्यर्थ होतील. ह्या कांग्रेसमध्यें मुसलमान लोक अभिमानपुरःसर व मोठ्या उत्साहानें आले होते. आणि त्यांच्यातील कित्येक चांगले गृहस्थ, सभेचें काम चाललें असतां त्यांतील वक्ते बनले होते. न्याशनल कांग्रेसविषयीं सर सय्यद अहंमद यांचे विरुद्ध भाषण त्यांच्या हेतूचे पराजयास कारण झालें. त्या ज्ञात्या वकृत्याला हें माहीत नाहीं कीं, हिंदुस्थानांत निमे मुसलमान ह्मणजे बंगाल्यांतलेच आहेत आणि ते तर सर्व कांग्रेसचे कामास पूर्णपणें अनुकूल आहेत. कांग्रेसचें महत्व महाराष्ट्रीयापेक्षां बंगाली हिंदुगृहस्थाकडून फार वाढलें आहे. राष्ट्रीय सभेची एकंदर हकीकत वाचली ह्मणजे तिचे विषयीं विरुद्ध मजकूर प्रसिद्ध करून तिचा हेतू सफल होत नाहीं असें ह्मणणारांचे उद्गार सफै खोटे ठरतात. राष्ट्रीय सभेनें हिंदुस्थानच्या एकंदर प्रजेचा वर्तनक्रम समजून तिचे हक्क व अधिकार वस्तुतः कसे आहेत याचा बोध होतो. राष्ट्रीय सभेचें जें काम चाललें आहे त्यावरून न्याशनल कांग्रेस पूर्ण राजनिष्ठ असून त्यांचें मागणें फार विचाराचें आणि बेताचें आहे असें लक्ष्यांत आल्यावांचून राहत नाहीं. फक्त सरकारास अमुक अमुक करा इतक्या सूचना करण्याचें काम तिणें स्वीकारलें आहे आणि ह्या तिच्या कामाकडे बघितलें ह्मणजे तिच्या कडून सरकारचें मोठेंच काम होत आहे असें ह्मणावें लागतें.

महाराणी सकारचे जन्मदिवसा निमित्त भरलेल्या दरबारांत दाक्षिणात्य सरदारांचे एजंट मिस्तर क्यांडी साहेब अध्यक्ष नात्यानें बोलत असतां म्हणाले कीं:—

हल्लींची यूरोपांतली विलक्षण प्रकारची चळवळ व अत्यंत अशाश्वति बघून आपण आपल्या सरकारच्या आश्रयाखालीं ज्या शाश्वत शांति सौख्याचा उपभोग घेत आहांत तें लक्ष्यांत आणलें ह्मणजे, आपण ह्या स्थितीच्या संबंधानें किती कृतज्ञ असलें पाहिजे हें आपल्याला सहज समजतें. गतवर्षी जुबिली संबंधाचे दरबारासाठीं जेव्हां आपण ह्या ठिकाणीं जमलों होतां त्या प्रसंगीं, त्या वेळीं इकडे बसलेल्या पब्लिक सर्व्हिस कमिशनचे संबंधानें कांहीं भाषण करण्यांत आलें होतें. तेंव्हां पासून पुढें त्या कमिशनची काय हकीकत झाली या बदलची माहिती आपल्याला वाचून व ऐकून समजली असेलच. आता त्या माहितींतील प्रत्येक गोष्टीच्या संबधानें सर्वांसच समाधान होईल असें जरी नाहीं, तथापि, पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या एकंदर रिपोर्टावरून, सरकारास, हिंदुस्थानच्या नवीन विद्वान् तरुण, मंडळीला येथील कारभारांत जास्त आणि विस्तृत भाग देणें अवश्य आहे असें खास वाटूं लागलें असून, तसें करण्याचा हिंदुस्थान सरकारचा निश्चय झाला आहे. आणि, ह्या सर्व व इतर उदारपणाच्या कृत्यांनीं जो आपणां सर्वांचा फायदा होणार आहे त्याबद्दल आपण, आतां स्वदेशीं परत जाणाऱ्या आपल्या प्रियव्हाइसरायांचे आभार मानले पाहिजेत. सरदारहो, माझी खात्री आहे कीं, ह्या देशांतील इतर भागांत दुसऱ्या थोर लोकांनीं, ह्या स्वदेशी परत जाणाऱ्या व्हाईसरायांचे मेहनती बद्दल जी आपली सर्व साधारण कृतज्ञता आणि उपकारबुद्धि दाखविली तिला आपण ही सर्व आपली सम्मति आणि कबुली दाखवाल. ज्ञा. च.

सांप्रत गाजत असलेल्या अबदुल हक्क प्रकरणांत हैदराबादचे रेसिडेंट मि. कार्डरी ह्यांची आहुति पडणार, असें इंडियन डेलिन्यूज पत्राच्या समजण्यांत आलें आहे. तोच पत्रकर्ता असें ह्मणतो कीं, तसें झाल्यावर मध्यप्रदेशाचे चीफ कमिशनर मे. मेकंझी साहेब सी. आय. ह्यांची त्या जागीं नेमणूक होणार.

हत्याराचे प्रतिबंधांतून सरकारानें तरवार मोकळी केली आहे. मात्र ती विलायती बनावटीची असली पाहिजे. आणि अशा तरवारी ज्या कोणास वापरण्याची इच्छा असेल त्यांनीं वापराव्यात, असा ठराव झाल्याचें समजतें. तरवारी पासून लोकांस काय उपयोग होणार? दी. बं.

या देशांतील ७५००० गोऱ्या फौजेस दररोज ३७१ जनावरें ह्मणजे सालाची १,३६,९७१ जनावरें लागतात. सोजरांची कुटुंबें, इतर खात्यांतलें गोरे नौकर व व्यापारी वगैरे इतर गोऱ्यांच्या वस्तीस किती जनावरें खपत असतील, ह्याचा हिशेब ह्या गणनेंत मुदलीच आला नाहीं. तो धरला तर खाण्यासाठीं मारल्या जाणाऱ्या जनावरांची सालिना संख्या ३ लक्ष तरी सहज होईल, असें आमचें अनुमान आहे. हर! हर! ना. स.

अमेरिकेंतील एकट्या न्यूयार्क शहरांत ३ लक्ष मुलें १३४ शाळा गृहांतून विद्याभ्यास करीत आहेत. या शाळा गृहांनीं व्यापिलेली जमीन जर शेजारीं शेजारी मांडली तर त्याची एकंदर लांबी सुमारें दोन मैलांहून जास्त होईल! पु. वै.

नामदार हंटर साहेब ह्मणतात बुढ्या सय्यदचीं भाषणेंच राजद्रोही आहेत. आणि ही बिचारी कांग्रेस कांहीं एक गडबड न करितां फक्त कांहीं येडेसें हल्लीं आहेत ह्याजपेक्षां जास्त हक्क मागून सरकाराला आपल्या अडचणी कळविण्याचा प्रयत्न करिते, तर कांहीं लोकांना ती राजद्रोही वाटते हा मोठा चमत्कार आहे.

कर्जाबद्दल तुरुंगांत घालण्याच्या कायद्यांत फेरफार केल्यामुळें सावकार लोकांना बराच धका बसणार यांत संशय नाहीं. परवां मुंबईच्या मारवाडी लोकांनीं हिंदुस्थान सरकारास एक अर्ज करून अशी विनंती केली आहे कीं, कर्जाकरितां संभावित लोकांस कैद नसावी असें ठरविल्यानें स्वतःचे ऐपती वर पैसा देण्याचा आपला व्यापार बुडतो व अमुक मनुष्य संभावित आहे कीं नाहीं हें सिद्ध करणें ही फार कठीण आहे. तसेंच बायकांना तुरुंगाची भीति नाहीं या कलमांत कसाबिणी व दुसऱ्या हलकट स्त्रियांचा ही समावेश केला आहे तो रास्त नाहीं. यास्तव या कायद्याची दुरुस्ती व्हावी. व ती करणेंच नसेल तर मागच्या व्यवहारास तरी निदान हा कायदा लागूं करूं नये. मुंबईकर मारवाडी मंडळीचे हें ह्मणणें रस्त आहे, पण सरकार याचा कसा काय विचार करते पहावें.

बिहार सरकारानें बकऱ्यांची अवलाद मजबूद करण्याचे मनावर घेतलें आहे. कारण, शेतकींत त्यांचा फार उपयोग होतो. पण मनुष्य भक्ष्यांतून उरतील तेव्हांना?

धुमकेतू— आलीकडे सकाळचे तीन चार आणि पांच यांचे दरम्यान पूर्वेकडील बाजूस एक शेंडें नक्षत्र दिसत असतें. तें अंधक आहे. व त्याचा झोंक जरासा दक्षिणेकडे आहे.

डेक्कन कालेजांतील विद्यार्थ्यांचा निरनिराळ्या प्रकारचा पोषाख पाहून त्या कालेजच्या प्रिन्सिपालांनीं सगळ्यांचा एकसारखा पोषाख असावा व सगळ्यांनीं झगे वापरावे असा ठराव केला आहे व तो येत्या जून पासून अमलांत आणणार ह्मणतात. क०

दिवाण बहादुर लक्ष्ममण जगन्नाथ बडो द्याचे दिवाण राजीनामा देणार ह्मणतात.

लिमिंगटन येथील कोर्टांत एक चमत्कारिक फिर्याद आली आहे. फिर्यादी आपलें फिर्यादींत असें ह्मणतो कीं माझ्या दुसऱ्या लग्नाच्या बायकोस पहिल्या बायकोच्या मुलानें फुसलावून बर्मिंगहाम येथें जिनगी सुद्धां पळवून नेली आहे तेव्हां असल्या व्यतिपात कार्ट्यास शिक्षा झालीच पाहिजे. आतां मात्र विलायती सुधारणुकेचा कळस झाला. स्त्री स्वातंत्र्यासाठीं झटणाऱ्या पुढारी मंडळींनीं इकडे चांगलें लक्ष पोचवावें हिंदुलोकांच्या स्त्रिया बुरख्यांत राहतात त्यास स्वातंत्र्य नाहीं ह्मणणाऱ्यास यावरील उदाहरणानें तरी लाज वाटेल काय, “ आपण हसे लोका आणि शेंबुड माझ्या नाका.” म. मि.

प्रचंडवृक्ष— भडोच शहरापासून सुमारें १२ मैलावर एक मोठा वडाचा वृक्ष आहे. हा चार एकर जमिनीवर पसरला असून त्याच्या खालीं १०००० मनुष्यें सहज राहतील असें ह्मणतात.

राजकीय कावा—रशियन धान्य बाजारांत मनस्वी येऊन अगदीं चेंद होतें ह्मणून आपापल्या देशांत येणाऱ्या रशियन धान्यावरील जकात वाढविण्याचा जर्मनीनें व आस्ट्रियानें हा बेत केला आहे असें ह्मणतात. आपल्या हद्दींत येणाऱ्या परकीय मालावर रशियननें जबर जकात बसविली तिचा सूड उगविण्यासाठीं हा योजना असावी.

हा पाऊस कां सोंग! हा जर बडा पाऊस नसला तर बड्या पावसानें आमचें सर्वस्व वाहून जाणार असें सिलोनचा एक पत्रकर्ता ह्मणतो. कारण ता. १९ रोजीं कोलंबो येथें १२ तासांत ७½ इंच पाऊस पडला. शु. सू.


तुह्मास नौकरी पाहिजे काय?

## पुढील परीक्षा द्या.

परीक्षेची जागा–सैतानाचा बंगला.

परीक्षेची वेळ--अमावास्येची ऐनमध्यान्हरात्र

परीक्षक

मि. गिल्ट, प्रोफेसर ऑफ ब्राईबरी ॲन्ड फॉल्सहुड.

मि. गिल्ट, प्रोफेसर ऑफ सेल्फिशनेस ॲन्ड गॉड्लेसनेस.

मि. ब्लाईंड, प्रो० ऑफ् इग्नरन्स ॲन्ड पॉवर्टि.

मि. पार्शालिटी, प्रो० ऑफ क्रूएल्टी— विकेड्नेस्

परीक्षेचे विषय

—राजकीय—

१ गाई मारून वाघ सिंह यांचें संरक्षण कसें करतां येईल?

२ काळा व गोरा न्याय यांत भेदाभेद कसा ठेवावा हें थोडक्यांत लिहा.

३ गरीब लोकांच्या तोंडचे घांस हिसकाकावून चैनी व श्रीमंत लोकांचा खुराक कसा वाढावा त्याचे उपाय सांगा.

४ दिवसानुदिवस इंग्रजांच्या कृपेनें हिंदुस्थान देश श्रीमंत होत चालला आहे व त्याचे पायीं बिचारा इंग्लंड देश भिकेस लागत आहे हें सिद्ध करा.

५ हिंदुस्थानांतून जेणेंकरून पैसा नेतां येईल असे उपाय तुह्मास सुचतील तितके लिहा.

—सामाजिक.—

१ वर्णसंकर व्हावा, कुलभ्रष्टता वाढावी व स्वदेशीय लोक अनार्य बनावे अशा विषयीं एखादी रामबाण युक्ति सांगा.

२ लोकांत आळस, चैन, छाकटेपणा व भ्रष्टता वाढेल असे प्रकार कोणते?

३ हिंदुस्त्रियांचो लज्जा, विनय, पातिव्रत्य यांचा भंग होऊन त्या कोणत्या उपायांनीं स्वच्छंदाचारिणी होतील तें लिहा.

( उमदवारांचे अर्ज हिरण्यकशपु मारला त्या संधीस येऊन पोहोंचले पाहिजेत. नेमलेल्या परीक्षकांवर आमचा पूर्ण भरवसा आहे. नापास झालेल्यांनीं खुशाल रडावें, बोंबलावें, अगर वाटल्यास जीव द्यावा; आह्मा कडून हरकत नाहीं. )

( सही ) घटिंगण

सेक्रेटरी निसबत सत्तेचा जोर. कयास


☞ हें पत्र आकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे “ वऱ्हाडसमाचार ” छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साल भरेर ॥ ७ ॥ १८८
किरकोळ अंकास........................०४
नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु. १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस-........०१

Six monthly...........3
Single copy.........................4 as.

Advertisements.
Below 10 lines...2 Rs
Per line over 10...4as
Repetition perline...3

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

VOLXXII | AKOLA MONDAY 18 JUNE 1888 | NO. 24
वर्ष२२ | अकोला सोमवार तारीख १८ माहे जून सन १८८८ इ० | अंक २४

## पत्रव्यवहार.

ह्या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असेल असें समजूं नये.

मुक्काम वाशीम तारीख ६।६।८८

रा. रा. वऱ्हाड समाचारकर्ते यांसः—

कृतानेक साष्टांग नमस्कार वि० वि० आतांशीं आकाश आभ्राच्छादित असतें. मेघराजाचें आगमन-सूचक सर्व चिन्हें परिपूर्ण झालीं आहेत. आतां लवकरच पर्जन्यवृष्टि सुरू होईल असें वाटतें. आज कांहींसे शितोडे आले. धारण पुनरपि महाग होत चाललें आहे. ऐन पावसाळ्यांत कोठ पर्यंत महरगतेचें मान जाऊन पोहोंचेल तें आजच सांगतां येत नाहीं. मात्र सध्यां गाड्या वगैरे बाहेरून येतात. खेड्यापाड्यांचें धान्य आणण्याचो पंचाईत पडत नाहीं तरी ही असा प्रकार आहे तर ह्या सोई पावसानिमित्त बंद झाल्यावर मग कसें होणार कोण जाणें. ह्या बाजारांत बहुतेक उदमी लोकांपाशीं खोटीं मापें वजनें असतात असा बहुधा कित्येकांस अनुभव आला आहे. ह्या बनियांचें स्वतः लोकांपासून विकत घेण्याचें माप एक व दुसऱ्यांस विकत देण्याचें एक अशीं दोन मापें असतात. अशा पासून कांहीं पदार्थ वजनी अथवा मापी घरीं नेऊन मोजून अथवा मापून पहावा तो आपला कमी येतो. परंतु यास कांहीं उपाय नसून फक्त चुरमुरे खात घरीं बसावें लागतें. ह्या गोष्टी खऱ्या किंवा कसे याची प्रतीती पहाण्या करितां ज्यांच्या हातांत उपाय योजण्याचे ईश्वरानें ठेविलें आहे त्यांनीं बाजारांत अकस्मात् जाऊन वजनें व मापें पकडून त्यांची तपासणी केली पाहिजे व जर यदाकदाचित् असा प्रकार आढळलाच तर तात्काळीच तेथच्या तेथेंच बंदोबस्त झाला पाहिजे. असें चार दोन वेळां झालें ह्मणजे बहुधा अशा लोकांवर एक प्रकारचा धाकच बसेल. व या पासून बहुधा अनाथ लोकांचा बचाव होईल गरिब लोकांना आधींच पैसे मिळण्याची मारामार पडते. तशांत माहागाई तर दिवसानुदिवस मीच ह्मणते. बाजारांत तर ढवळ्या दिवसा मापा वजनांच्या रूपानें लुटण्याचा असा प्रकार तेव्हां व्हावें कसें व गरीबांचा तरणोपाय व्हावा कसा. "बळी तो कान पिळी" मनुष्याच्या हातांत कांहीं सत्ता असल्या शिवाय त्याला कांहीं योग्यता नाहीं व त्याचा कांहीं अंमल चालत नाहीं. तर ग्रामाधिकारी. तालुकाधिकारी व जिल्हाधिकारी या गोष्टींचा तपास करून खऱ्या आढळल्यास बंदोबस्त करितील काय?

मे. सुरज नारायण पंडित साहेबांच्या आगमनानें लोकांचो मुखकमळें प्रफुल्लीत दिसूं लागलीं आहेत. पंडित साहेबांच्या न्यायनीतोला, आचरणाला व त्यांच्या दयार्द्र प्रेमबुद्धीला पाहून सर्व लोक अतिशयित आनंदांत निमग्न झाले आहेत. ईश्वर अशा सत्पुरुषांचा जयजयकार करो अशी प्रार्थना करीत आहों.

मे. डाक्टर जोन्स साहेब बहादूर या जिल्ह्याचे सिविल सर्जन ( वैद्यराज ) हे रजेवर पहिल्या तारखे पासून आपल्या स्वभूमीस गेले. त्यांचे जागीं काम पहाण्यास आलेले आफिसर ही लायक असून या साहेबांचें स्मरण होऊं देणार नाहींत अशी दया यांचे अंगीं आहे. काम करण्यांत निस्पृह व वक्तशीर आहेत. मोठ्या हुद्यावर असून सर्व लोकांच्या उपयोगीं पडणें हें मोठ्या सधनतेचें व उत्तम शील कुलाचें दर्शक होय. मे. जोन्स साहेब आपल्या उत्तम गुणांनीं सर्वांस प्रिय झाले होते त्याच प्रमाणें हे साहेब होतील व आपल्या बदलीच्या मुदतींत सर्वांसप्रिय होतील अशी आशा खरोखरी वाटत आहे.

रा. रा. भाऊराव यादव डे. ए. इन्स्पेक्टरचे क्लार्क रजेवरून परत आले व पुनः बीन पगारी रजा घेऊन रजेवर हैद्राबादे कडे आपल्या कामीं चालते झाले. हे बिचारे येथें असतां भाग्योदया करितां बिचाऱ्यानें अनेक खटपटी केल्या. गाड्यांचे कारखाने केले. शिंप्यांचीं शिवण्याचीं यंत्रें घातलीं. पाटला करितां आंगरखे करून विकले. नाना प्रकारच्या खटपटीस यश ह्मणून कांहींच आलें नाहीं. सर्व व्यर्थ होऊन सरतेशेवटीं दाक्षिणें भागीं प्रयाण केलें. तेथें ईश्वर प्रसन्न होऊन हल्लीं त्यांना तिकडे त्यांच्या योग्यतेप्रमाणें कांहीं नोकरी आहे. व आपल्या नांवालौकिकानें व अब्रूनें पैसे मिळवीत असल्या मुळें आह्मां त्यांच्या मित्र मंडळांस मना पासून आनंद होत आहे. ईश्वर त्यांची भरभराट करो नूतन ठिकाणीं त्यांची कीर्ति होऊन हरएक कामांत त्यांस यश येवो.

त्यांच्या बदली काम करीत असलेले हे बारा रुपयांचे मास्तर होत. ह्यांची योग्यता सहज लक्षांत येते असें असतां त्यांस आतां तीस रुपये मिळणार असें ह्मणतात. हें खरेंच असेल असें कबूल घेतलें तर रंकाला राज्य प्राप्ती होणें त्या सारखेंच आहे. अहो ईश्वरी कृपा झाली ह्मणजे काय नाहीं होणार. असो ही कृपा झाल्यावर वरिष्ठांना तरी तदनुसारच बुद्धी होणार. असो सध्या बढती मिळणें कठीण असें लोक ह्मणतात. तें उगीच. ईश्वरानें दिली ह्मणजे त्यास काळ नको, वेळ नको, योग्यता नको, कोणाचे आर्जव नको, घरीं बसल्या जागीं चालून येते. असो बिचाऱ्यास नशीब फळलें.

ता. ३।६।८८ इ० रोजीं श्री बालासाहेबांच्या मंदिरांत संतर्पण झालें १९०० मनुष्यांचा समुदाय सुमारें जेऊन गेला. हें संतर्पण रिसोडकर प्रसिद्ध धर्मशील पांडे रा. रा. चिमणराव त्र्यंबक ऊर्फ आबा साहेब पांडे यांनीं केलें. या कामीं सुमारें ६०० रुपये खर्च आला. आबा साहेबांनीं प्रत्येकाच्या घरीं जाऊन मोठ्या प्रेम बुद्धीनें प्रत्येकास आमंत्रण केलें. समारंभाचा बेत उत्तम ठेविला होता. समारंभ चांगले प्रकारें सिद्धीस गेला. कळावें हे विनंती.

आपला प्रेमेच्छुचा धाकटा बंधु
"ज्ञ"

मुक्काम मालेगांव तारीख १०।६।८८

रा. रा. वऱ्हाड समाचार कर्ते यांसः--

कृतानेक साष्टांग नमस्कार वि० वि० मालेगांव हा वाशीम तालुक्यांत बऱ्याच मोठ्या गांवांपैकीं एक आहे. येथें चार पांचशे घरांची वस्ती आहे. लोक मध्यम प्रतीचे आहेत. फार श्रीमान् नाहींत व फार कंगालही नाहींत. हा गांव वाशीमकर प्रसिद्ध दाजीसाहेब राणे यांची जाहागीर गांव होय हे जहागीरदार सर्वांवर कृपाच ठेवितात. हे गृहस्थ मोठ्या मनाचे असून फार वजनदार आहेत. या गांवचे पांडे यांचें व दाजी साहेबांचे असावें तसें अंतःकरण शुद्ध नसून सौजन्यही असावें तसें नाहीं. हा गांव पाणी उदकानें बरा असून इंगोलीहून अकोल्यास जाणाऱ्या सडके नजिक असल्या मुळें अकोल्याकडे जाणाऱ्या व अकाल्याहून इंगोलीस जाणाऱ्या गाड्या नेहमी येथें मुक्काम करीत असल्या मुळें रोज शेंकडों गाड्या उतरण्याच्या तळावर असून या गाड्यांच्या योगानें ह्या गांवाला बाह्यात्कारें चमत्कारिक शोभाच येते. ह्या गांवा वरून जाणारी सडक आहे. ही पूर्वींची नागपुरा कडून कलकत्याकडे जाणारी डांकेची सडक होती. परंतु पूर्वींच्या मार्ग व्यस्थेंत बदल होऊन सर्वच निराळें दिसूं लागल्या मुळें ह्या बिचाऱ्या प्रसिद्ध सडकेची साडेसाती आली ती पासून ती सडक बहुतेक जमीनदोस्त झाली. मुंबई, पुणें नगर वगैरे कडून आलेली ही सडक होती. आतां तिचें काम नसल्या मुळें तिची कोणी रिपेरीही धड करीत नाहीं. असो. येथें पूर्वी स्वतंत्र पोष्ट मास्तर असे परंतु पोष्टल खात्यांत नवीन व्यवस्था झाल्या पासून तें काम विद्या गुरू ( शाळा मास्तर ) यांचे कडे दिलें आहे. त्या बदल त्यांना कांहीं remuneration मिळत असतें येथील, शाळा अगदीं गटकल्या खाण्याचे बेतांत आहे पूर्वींचे मास्तर विश्वनाथपंत हे येथें उमरावती कडून आले होते. त्यांचे पूर्वींचे मास्तर येथें असता शाळे कडे लक्ष्य देण्या ऐवजीं वैद्यकी कडे फार लक्ष्य देत असत या मुळें त्यांच्या कारकीर्दींत शाळा फारशी सुधारली नाहीं. वर ध्वनीत केल्या प्रमाणें त्यांची बदली होऊन विश्वनाथ पंत आले त्यांनीं तरी कांहीं सुधारणा करावी तर त्यांनींही कांहीं केलें नाहीं. पोष्टाचे काम करण्यांत त्यांचा सर्व काळ जाऊन शाळेचे सुधारणे कडे अर्थात दुर्लक्ष्य झालें. ती इतकी खराब झाली कीं, गेल्या मार्च महिन्यांत मे. ए. इनस्पेक्टर साहेब बहादूर शाळा खातेंप्रांत वऱ्हाड यांची स्वारी शाळा तपासण्यास आली तेव्हां मुलें फार कमी असल्यामुळें शेरा अर्थात् वाईट आला. व मेच्या पाहिल्या तारखेपासून त्या बिचाऱ्याचे त्रिसांचे बारा होऊन पुढें आपला टिकाव निभत नाहीं असें पाहून त्यानें आपले मोठ्या पगारांचे ( pension ) सरटीफिकीट पाठविले व ह्या शाळा खात्यांतून एकदाचे सुटले त्यांचे जागेवर वीस रुपयांवर कोणी त्र्यंबक महादेव भिडे या नांवाचे इसम आले आहेत. ह्यांच्या आंगीं तरतरी बरी आहे. परंतु करतात काय. येथें प्रमोशनवर येऊन तोंडघशी पडल्या सारखें त्यांना वाटूं लागलें आहे. एकतर ते मंडळीच्या समुदाया मधून ते कुग्राम बस्तींत आल्या मुळें त्यांचें चित्त स्थीर नाहीं दुसरें शाळा नीट स्थितींत नाहीं व पुढें ती चांगली होण्याचे उपाय येथें सध्यां दिसत नाहींत. त्यांनीं नुकताच ह्या शाळेचा चार्ज घेतला. नियमाप्रमाणें पोस्टाचा चार्ज तेव्हांच त्या मास्तरांकडून त्यांना मिळावयाचा परंतु त्यांच्या मनात नुसते पोस्टांचें काम करूनच राहावें असें होते. शिवाय गांवठी शाळा मांडावी. परंतु नवीन आलेले मास्तर यांनीं पोस्टांचें काम मिळण्याबद्दल प्रकर्ण चालवुन त्यांही कामाचा च्यार्ज घेतला. तेव्हां त्यां बिचाऱ्या मास्तराची भेटें बसली. आतां त्यांच्या मनांत गांवठी शाळा घालून सरकारी शाळेला सुधारण्यास अडकाव आणण्याचें घाटत आहे. परंतु नवीन आलेले मास्तर वस्ताद असल्यामुळें हे जुन्याला हार जातील असें कधीही होणार नाहीं. त्यांनीं चार्ज घेतल्यापासून मुलांचीं व लोकांचीं मनें आपल्याकडे आकर्षण कोणत्या उपायांनीं होतील अशा विषयीं विचार करीत आहेत. शाळेंत मुलें तर फारशी येत नाहींत परंतु त्यांनीं येथें आल्यापासून लोखोचा खेळ सुरू केला आहे. पाहण्यासच नुसतो मुलें येतात. हळुहळू अशा उपायांनीं खरोखरी पुष्कळ मुलें शाळेंत येतील यांत संशय नाहीं. अशा उपायांनीं शाळा सुधारण्यास जरी वेळ लागेल व त्वरीत काम दाखविण्यास सांपडणार नाहीं तरी ही गोष्ट मुख्याधिकाऱ्यांस माहीत असल्यामुळें त्याबद्दल मास्तरावर फारसा दोष येईल असें वाटत नाहीं. मास्तरचे स्वकंदर योजनेवरून व हुशारीवरून ही शाळा यांचे कारकीर्दींत चांगल्या स्थितीस येईल अशी सर्वांची खात्री आहे. मात्र ह्या जिल्ह्यांत असा बाणेदार मास्तर आला कीं त्याला ह्या जिल्ह्यातील पाणी बाधतें तसें मात्र न होवो. असो.

.लकत वाटसन

पांच चार दिवसापासून.... व सरदासि बिल्डिहळू सुरू होऊं सरकाराकडे गहाण लावून लोक शेतीची आउंत्र चालूच आहे.

करण्याची तयारी करी

लोक पुढील सालीं कपाशी...

## नसार.

स्वस्त दरानें कपाशी घेण

चे तयारीसाठीं पैश्याच्या तिजोऱ्या उघडण्याचे बेतात आहेत. हल्लीं रोगराई नाहीं. आंब्याची बरीच समृद्धी आहे. पत्रकर्तेराव ओळख नाहीं ह्मणून घ्यालनी कचऱ्याचेपेटींत टाकून द्याल तर तसें मात्र करूं नका हो.

आपला नवीन
मालेगांवचा
" क्ष "

वऱ्हाडसमाचार.

मित्ती ज्येष्ठ शुद्ध ९ शके १८१०.

## दिवाणी न्याय खातें.

( सन १८८७ चा रिपोर्ट )

कर्नेल एच. स्पान्सकी आफिशिएटिंग जुडिशिअल कमिशनर यांजकडून सालाबादप्रमाणें नियमित वेळीं दिवाणी न्यायखात्याचा सन १८८७ सालाबद्दल रिपोर्ट रवाना होऊन अग्निशान रेसिडेंट साहेबांच्या त्यावरील सूचनेसह प्रसिद्ध झाला आहे. ह्या रिपोर्टांतील कांहीं कोष्टकांचीं बेरजेतेरजेचीं पत्रकें चुकली असल्यामुळें या रिपोर्टास विलंब लागला नाहीं तरी फौजदारी न्यायखात्याचा रिपोर्ट योग्य वेळीं तयार होण्यास व्यत्यय आला आहे ह्मणून तो रिपोर्ट पाठविण्यास उशीर होईल असें ध्वनित केलें होतें त्या प्रमाणें एप्रिलच्या ११ वे तारखे पर्यंत फौजदारी न्यायखात्याचा रिपोर्ट लांबणीवर पडला होता. सन १८८७ साल अखेरें दिवाणी मूळ दावे एकंदर १४,४९१ झाले असून मागील सालाच्या मानानें १४७९ कमी झालें परंतु जिल्हा कोर्टांतील दाव्यांची संख्या १८८६ सालांत ४५२९ होती ती ७२६० पर्यंत वाढली. स्माल्कॉज कोर्टें आणि सब डिव्हिजनल कोर्टें या दोन्ही कोर्टांतील कामकाजास सर्व साधारण कमी प्रमाणाच्या धोरणानें अजमासें चार हजारावर दाव्यांची कमतरता पडली आहे. ही कमतरता वास्तवीक पाहूं गेले असतां कमतरता नव्हे कारण तहशिलदारांच्या कोर्टांतील कामें ए० अ० कमिशनरांकडे चालल्या मुळें हा फरक दिसून येत आहे. आकोला, उमरावती व खामगांव या तीन ठिकाणच्या स्मालकाज कोर्टांपैकीं उमरावतीच्या कोर्टांत काम फार थोडे झालें आणि त्याचें कारण असें लिहितात कीं महामारीच्या उपद्रवा मुळें एकें प्रकारें अडथळा येत असे आणि उ-[illegible]च्या ताब्यांतील २९४ खेडीं-[illegible]मुळें काम फार मंद चा-[illegible] बुलठाणा, वणी, [illegible] जिल्हा कोर्टांत दि-[illegible] उभ्या वर्षांत हरकत नाहीं. ह्मणून अन्य कोर्टी-कोर्टांची चांगली सरसी हाल अखेर वरील कामाचा ताळा पाहतां दिवाणी काम इतकें मंदावण्याचें कारण असें आहे कीं जुडिशिअल कमिशनरचे कोडत, दुसरी सहाय्येडचीं कोर्डें आणि स्मालकाज कोडत मिळून गुदस्त सालीं सदतीस कोडतांतून दिवाणी काम चालत असे तेंच या रिपोर्टाच्या वर्षीं फक्त चौतीस कोडतांतून चाललें होतें.

दिवाणी कोडतांत दावे चालतात त्यांत मुख्य प्रकार दोन आहेत. पहिल्या प्रकारांत पैशा संबंधानें दावे गणले ह्मणजे त्यांत निरनिराळे आठ दहा विभाग निघतील. स्थावर किंवा जंगम जिनगी बद्दल, पैशाच्या देवघेवी संबंधानें मग कांहीं स्टाप कागदा वरून आणि कांहीं खाते उताऱ्या वरून, माल विक्रीच्या बाबदींत, पगार, वेतन वगैरे पैशाच्या आदायीच्या प्रकरणांत आणि अशा सारख्या पैशाच्या भिन्न भिन्न व्यवसायांत दावे उभयपक्षीं तोडजोडीच्या वादविवादा पासून होत असतात. दुसरा प्रकार ह्मटला ह्मणजे लग्नाच्या हक्का संबंधानें निर्णय होऊन सोडचिठ्ठी, फारकत, खावटी वगैरे व्यवहारांत दिवाणी कोडतांतून न्याय मनसबी होत असते ह्या दुसऱ्या प्रकारच्या फिर्यादी वर्षानुवर्ष अधिकाधिक होत आहेत या गोष्टीस एक प्रत्यंतर ब्राह्मणेतर ज्ञातींतल्या लोकां मध्यें नवऱ्यांच्या बायकांस किंवा बायकांच्या नवऱ्यांस वर्तमानपत्रांतून वेळोवेळ नोटीसा जाहीर होत आहेत हे होय आणि दुसरें प्रणित शास्त्रप्रमाणें प्रमाण असें आढळतें कीं दुसऱ्या लग्न प्रकरणांच्या दाव्यांची संख्या गेल्या सालपेक्षां सतरानें वाढली आहे ह्मणजे सत्तर झाली आहे. दोन्ही प्रकारचे मिळून २४४९१ दावे झाले आहेत. वेतन, पगार वगैरे बद्दल होणाऱ्या फिर्यादी या सालीं २१३ होत्या आणि त्यांत विशेषेंकरून पुरभय्ये ( हिंदुस्थानी) मजूरदार लोकांनीं आमच्या कुणबी लोकांवर केलेल्या फिर्यादी बहुतेक फार आहेत. पीकपाणी या वर्षी सुमार होतें आणि त्या मुळें आमच्या वऱ्हाडचे साधेभोळे शेतकरी हल्लीं हलाखींत आहेत ह्मणून दिवाणी न्यायाचें हें काम वाढलें असावें. आणखी महत्वाची दुसरी गोष्ट स्थावर जिनगी संबंधानें होय. हे दावे यंदा १२१९ पर्यंत वाढले आहेत.

वऱ्हाड प्रांतांत सन १८८७ सालीं एकंदर २६०१८ दिवाणी दाव्यांचा निकाल झाला; त्या सर्वांची गोळा बेरजेनें ३०,०५,३४६ रुपया एवढी एक मोठी रकम होते. आणि त्या दाव्यांस एकवट कोडत खर्च ४,००,३०८ रुपये झाला. ह्या वरून सरासरीनें प्रत्येक दावा ११८ रुपयांचा पडतो आणि त्यास कोडतखर्च सुमारें १५ रुपये करावा लागतो. मागील साला पेक्षां या सालीं शेकडा–दाव्याच्या रकमेचे आणि खर्चाचें–भारी आहे कारण पुष्कळ दावे मोठमोठ्या रकमेचे होते.

( पुढें चालेल. )

येत्या आक्टोबर महिन्यांत पुणें येथें मुंबईचे गव्हरनर लार्ड रे साहेब यांच्या आश्रयानें एतद्देशीय कलाकौशल्याच्या व कारागिरीच्या पदार्थांचें प्रदर्शन होणार आहे या प्रदर्शना पासून दोन प्रकारचे फायदे व्हावे असा त्याच्या उत्पादक मंडळीचा हेतु आहे.

या हिंदुस्थान देशांत निरनिराळ्या ठिकाणीं ज्या एतद्देशीय कलाकौशल्याच्या जिनसा [illegible]र होतात, त्या सर्व लोकांच्या नजरे [illegible] आणून, त्या तयार करणाऱ्या कारागिरांना उत्तेजन मिळावें, व ह्या सर्व कलाकौशल्याच्या जिनसा एके ठिकाणीं कायमच्या मिळवून, त्या पासून जे शेंकडों कारागीर व व्यापारी आहेत, व जे एतद्देशीय कारागिरीचे व कलाकौशल्याचे पदार्थ तयार करण्याचें उद्योग करीत आहेत त्यांनां शिक्षण मिळावें. या प्रदर्शनास आमच्या वऱ्हाडांतील थोर थोर मंडळी यथाशक्ति साह्य करितील अशी आह्मीं उमेद बाळगतों.

आह्मी मागें लिहिल्याप्रमाणें बरार रूरल बोर्डस् लॉ सन १८८५ चा यांतील कलम ३३ अन्वये रेसिडेंट साहेबांनीं केलेले नियम सर्वांचे माहितीसाठीं व वहिवाटीसाठीं प्रसिद्ध केले आहेत.

बरार रूरल बोर्डस् लॉ सन १८८५ यांतील कलम ३३ अन्वये नियम.

तालुके बोर्ड व जिल्हा बोर्डची रचना ( कायद्यांतील कलम ४ ).

१. तालुके बोरडांत मेंबरांची जी संख्या रहाण्याची ती रेसिडेंट साहेब वेळोवेळीं ठरावतील त्याप्रमाणें राहील. प्रथमतः त्यांत १८ मेंबर्स रहातील त्यांपैकीं ६ पेक्षां जास्त नाहीं असें कामिशनर नेमतील व बाकीचे या पुढें सांगितलेले रितीप्रमाणें निवडले जातील.

२. खा[ली] लिहिलेले लोक बोरडचे मेंबर ह्मणून निवडले जाण्यास योग्य होत.

१. कोणताही जाणता पुरुष जो दर वर्षास चार रुपये किंवा अधिक टाऊन ट्याक्स देत असेल तो.

२. पेढ्या किंवा सार्वजनिक कंपन्या ज्या १० रुपये किंवा अधिक टाऊन ट्याक्स देत असतील त्यांचे गुमास्ते किंवा वहिवाटदार.

३. तालुक्यांत नेहमीं रहाणारा कोणताही जाणता पुरुष ज्या जवळ त्याच तालुक्यांत रुपये १०० पेक्षां जास्त सारा देणारी जमीन असेल तो.

४. कोणताही जाणता पुरुष ज्याकडे तालुक्यांत इनाम किंवा जाहागीर आहे. व जिचा सारा तो खाऊसा असतो तर दर वर्षास रुपये १०० पेक्षां जास्त असता.

५ आनररी माजिस्ट्रेट, व मुलकी आणि पोलीस पाटील ज्यांना तालुक्यांत अधिकार आहे [त]. आणि

६. तालुक्यांत रहाणारे देशमुख देशपांडे यांचे घराण्यांतील मुख्य पुरुष.

परंतु पुढें सांगितलेले लोक निवडणुकीस योग्य नाहींत.

१. ज्यांचें वय २१ वर्षां पेक्षां कमी आहे.

२. ज्यांस सरकारी नौकरींतून वाईट वर्तनामुळें बरतर्फ केलें आहे.

सी. ज्यास कैदेची अशी शिक्षा झाली असेल कीं तेणें करून त्यास वऱ्हाडच्या रूरल बोर्डीस कायद्याचें कलम ९ वरून बरतर्फ करतां येईल असें दिपुटी कमिशनर यांस वाटेल.

डी. जो बोरडाचा नोकर किंवा कारकून असेल,

ई. ज्याचा बोरडाशी किंवा बोरडाच्या हुकमावरून केलेल्या कोणतेही कामांत किंवा बोरडाशी केलेल्या कोणत्याही करारांत हिस्सा किंवा हितसंबंध साक्षात किंवा पर्यायानें असेल

३. जे लोक टाउन फंडास दरसाल [illegible] रुपये देतात आणि जे लोक जागल्या व लोकल सेस बद्दल दरसाल ४ रुपये देतात त्यांस निवडणुकींत मत देण्याचा अधिकार आहे

४. तालुके बोरडाचे मेंबराचे निवडणुकीचे कामांत मत देण्याचा हक्क ज्या लोकांस आहे ते.—

ए. तालुक्यांत अधिकार असणारे आनररी माजिस्त्रेट.

ब. तालुक्यांत अधिकार असणारे मुलकी व पोलीस पाटील, आणि

क. देशमुख व देशपांडे घराण्यांतील मुख्य पुरुष.

५ हे नियम प्रसिद्ध झाल्यावर होईल तितके लवकर जिल्ह्याचे दिपुटी कमिशनर याणीं ज्या इसमास मत देण्यास लायक ह्मणून ते ठरवितील त्यांची यादी तयार केली पाहिजे. ती यादी त्या तारखेपासून तीन वर्षे पर्यंत अमलांत राहील.

६ मत देण्यास लायक ठरलेल्या लोकांच्या यादी प्रत्येक तहसिलींत तयार केल्या पाहिजेत, ठेविल्या पाहिजेत व तपासल्या पाहिजेत आणि त्यांचे खरेपणाबद्दल दिपुटी कमिशनर जबाबदार रहातील.

७- एखाद्या इसमावर असे गुन्ह्याची शाबिती झाली असेल किंवा तो एखादे न्यायाचे प्रकरणांत असे हुकुमास पात्र झाला असेल कीं तेणेंकरून दिपुटी कमिशनर यांचे मतें त्याचे अब्रूत कमीपणा येऊन तो निवडणूक करणारा होण्यास नालायक झाला असेल, त्याचें नांव निवडणूक करणाराचे यादींतून काढून टाकण्या कमिशनर यांची पूर्वीं मंजुरात घेऊन जिल्ह्याचे दिपुटी कमिशनर यांस वेळोवेळीं हुकूम करण्या अधिकार आहे.

८ मेंबरां पैकीं एक त्रितीयांश दर वर्षास पाळी संपतांच कमी केले जातील. पहिले दोन संपतांच कमी होतील त्यांचे जागीं चिठ्ठ्या ( चिठ्या ) टाकून दुसरे नेमले जातील.

९. मेंबरां पैकीं एक त्रितियांशाची निवड प्रत्येक वर्षी एकदा केली जाईल. व ती आक्टोबर महिन्यात होईल. निवड करण्याचे कामांत विलंब झाल्यास नवीन निवड मंजूर होईपर्यंत कमी होणारे मेंबर कामावर राहतील.

( पुढें चालूं )

The Berar Samachar

MONDAY JUNE
18, 1888.

## THE NEW INDUSTRIAL ERA IN INDIA.

The above is the theme of a lecture delivered by Sir William Hunter at a meeting of the Royal Colonial Institute in London. The lecture deserves to be read with care and we are sure it would amply repay perusal. We shall try to give it in substance.

Sir William said that the carrying trade of India has had four eras. The first was the caravan age when goods

were transported by land routes through the agency of large caravans. The second was half-land and half-sea route age, that is right through the Persian-Gulf and the Red Sea. The third was the Cape route age; and the fourth and the most important of all is the present one.

The introduction of railways into India, the extended use of steam-shipping, and cutting of the Suez Canal, inaugurated the fourth and the present era of Indian staples. For the first time in history, India has been unabled to appear to Europe in her true commercial character, not as a dealer in curiosities and trinkets, nor as a maker of art fabrics for the rich, but as a producer of raw materials on an enormous scale. Her old trade in precious hand-made articles has given place to a vast exportation in fibres and foodstuffs; and a new commerce in manufactures by steam machinery is springing up. The essential competition between India and Europe is now the competition between the productive powers of the tropics and of the temperate zone. We shall see here after that the advantages are not all on the side of the sun. What at present we have to deal with is the fact that this competition in heavy and bulky staples has been rendered possible by the new era in the Indian carrying trade, represented by railways, steam navigation, and the Suez Canal.

I have conjoined railways, steam navigation, and the Suez Canal as the three motive powers in the present development of the Indian carrying trade. For it is impossible, without a minute statistical analysis which would here be out of place, to accurately estimate their functions, taken separately, in the reduction of freightens and in expediting the operations of Indian commerce. It is these results, taken together, which are throwing open the agricultural staples of India to Europe. But the joint effect of the three causes may be clearly brought out by a few facts concerning the recent growth of Indian trade. During the first twenty years of the last century the annual imports into England by the East India Company were valued at three-quarters of a million sterling, and consisted of calicoes and other woven goods, silk, diamonds, spices, drugs, and saltpetre. The Company's exports from England to the East slightly exceeded half a million sterling a year, of which value more than 80 per cent were made up of bullion. A century later, when the Company's Indian monopoly had been for many years abolished, and the trade of that country was legally as open to the world as it now is, the exports from India were valued, in 1834, at 9 and a half millions sterling. During the next twenty years the exports of Indian merchandise crept up to an average of 20 millions for the five years ending 1854 The following twenty years mark the introduction of railways into India the development of steam shipping, *via* the Cape, and the opening of the Suez Canal. In that period Indian exports of merchandise expanded to an average of 57 millions for the five years ending 1874. During the next ten years the influences of the Indian railways, of steam navigation, and of the Suez Canal came into full work. Indian trade advanced by rapid strides, until, in 1884, the exports of merchandise had reached the enormous total of 88 millions sterling. The export of bulky commodities, which had formerly been carried from India in smaller quantities, received an immense expansion, while an enormous trade in a new bulky staple had grown up. Wheat, which, before the development of Indian railways and the Suez Canal, held an insignificant place in the list of Indian exports, has become a great staple of Indian commerce. During the ten years ending 1884, its exports increased from about three-quarters of a million sterling to nearly nine millions.

The three permanent factors which Sir william regards as having regulated India's trade with England are the cost of carriage, the comparative cheap ness of production in India, and the comparative value of Silver in the East and West.

The three salient facts as regard the shipping which does the foreign trade of India are: —(1) a considerable decrease in the number of the vessels; (2) an enormous increase in their size and carrying capacity: (3) a vast expansion in the amount of business done by steam vessels, while there is still enough business of another class to enable the sailing ships to hold their own. And shipping to this extent has been only made possible by the new lines of Railways which have opened up the grain districts and made transit cheap enough to increase the exports considerably. The effect of this growth in exports is very well told by Sir William Hunter in the following words.

The growth of this great export trade in agricultural staples has not been an unmixed blessing to India. That country has benefited on the whole, but certain parts of it and certain classes of its population have suffered severely. When the Railway opens up a new food area, local prices rise and the husbandman grows rich. But the artisan and the landless labourer have to pay more for their daily bread. About two-thirds of the people, being agriculturists, benefit by the change, while the struggle for life is made harder for the remaining third, For the landless labourers it is some times made very hard indeed; and the landless labourers now amount to 12 per cent. of the whole population. But wherever the railway comes, wages sooner or later rise. In many cases the rise in wages exceeds the increased cost of living; in others, and especially at a distance from the line, a period of suffering has to be endured before this economic adjustment takes place. The new industrial era has also impaired or ruined many of the old cities and ancient marts of India. The Moghul capitals, Agra and Delhi, lay more than a thousand miles from the mouth of the Ganges, Even the capitals of the seaboard provinces were chosen for military purposes, with small regard to the commercial capabilities of their situation. One of the earliest results of British rule in India was the growth of new mercantile towns. The introduction of railways effected another great series of displacements in the centres of trade. One set of cities after another has been left to stagnation and decay. But here, again, compensating influences are asserting themselves. The more complete development of the railway system is giving new life to the ancient cities, which were for a time left high and dry; and while the modern seats of trade are multiplying, many of the old ones are reviving. Calcutta was for long the type of a commercial capital, created by river carriage; Bombay is a mercantile metropolis developed by railway traffic.

In another place Sir William Hunter says "I believe that during the next few years there will come moments of great temptation to England to deal unfairly with India. For the development of India as a manufacturing and and food-exporting country will involve changes in English production, which, altogether bringing their compensation in the end, must for a time be attended by suffering and loss. We should not forget that in the last century, when Indian cottons competed with English fabrics in England, prohibitive restrictions were laid upon the import of Indian cottons into Great Britain. In the present century when English piece goods are being threatened by the Indian mills, the Indian customs tariff has been more than once dealt with in the interests not of the Indian revenue, but of the English manufacturer. Some of our most injurious mistakes towards India have, indeed, been mistakes of ignorance rather than of injustice. I believe that a fuller knowledge of the facts will create a more steadfast resolve to do right; that the national conscience will become more sensitive as the national intelligence becomes more clearly informed.

## DESULTORY READING

(continued from our last issue).

Or if by chance our would-be student is one who for his sins is engaged in political contests himself, he may recall the position of Walter Scott's Black Knight at the siege of Front De Boeuf's Castle when defeaned by the din which his own blows made upon the gait contributed to raise. How under such circumstances he must wish that he was like Dicoeopolis in the Acharnian and could make a separate peace for himself. But may our good angel preserve us from entering into any thing like a controversy with the great periodical Press. It is a mighty engine with a giant's strength, which can only trust that it may not use like a giant, who is supposed to be given to tyrannous exercise of his powers. Cowper's lines mark well its excellences and its faults:—

"How shall I speak thee, or thy power address,
"Thou God of our idoltory, the Press!
"By thee religion, liberty, and laws
"Exert their influence and advance their cause;
"By thee worse plagues than Pharaoh's land befel,
"Diffuse, make earth the vestibule or hell,
"Thou fountain at which drink the good and wise,
"Thou ever bubbling spring of endless lies,
"Like Eden's dread probationary tree
"Knowledge of good and evil is from thee."

Knowledge of good and evil, yes. What ever may have been the original position of our first parents, we their descendants, have this knowledge forced upon us and we cannot escape from it. Our aim and object must be not to escape or to close our eyes to it, or to keep it out by the method of the wiseacre who shut his park-gates against the crows, but to neutralize the evil by seeking out the good, and to strengthen our minds by sound discipline and purify our taste by the loving study of literature of the nobler type so that we may instinctively reject that which is mean and unworthy. we may leave to ourselves the question of the amount of time we ought to give to the current literature of the day. Much of it is addressed to particular classes of persons and has an interest for them which it does not possess for others. Much on the other hand, consists of popular renderings of subjects, sometimes admirable and useful to all, sometimes, it is to be feared, of little value or interest for any one. Habit and a little trying experience will soon teach you to discern how much of a periodical is worth the expenditure of much time. You will not be long before you acquire some skill in the arts of dipping and of skipping. Of novels I must speak in somewhat the same strain. There is probably no form of idleness so seductive, or so enervating to the mind as indiscriminate novel reading. Let some of the best and most truly instructive works in the world belong to this class. From "Don Ruixate" to "Waverly," from "the Vicar of Wakefield,' to "the Caxtons," from Miss Austen, or Miss Edgeworth, or Miss Ferrier to Charlotte Bronte or George Eliot, you will find what Horace found in those great Homeric pomes— humour and wisdom, and a keen insight into the strength and the weak of the human character. Think what a mine of wealth we possess in the novels o your own great master. What depths he sounds, what humours he makes us acquainted with! From Jeanise Deans sacrificing herself to her sisterly love in all but her incompromising devotion to truth to the picture of the family affection and overmastering grief in the hut of poor steenie Mucklebaskit, or again from the fidelity of Meg Merits to that Caleb Balderstone, you have in these and a hundred other instances, examples of the great of power of discerning genius to seize upon the secrets of the human heart and to reveal the inner meanings of the events which history records upon its surface, but which we do not feel that we really under stand still some finer mind has clothed the dry bones with flesh and blood and presented them to us in appropriate raiment.

## वऱ्हाड.

हवामान — अलीकडे हवेंत उष्मा पुष्कळच आहे. परवां रात्रीं पावसानें तास दोडतासे बरीच बहार करून दिली. उष्णता कमी होण्यास आणखी पुष्कळ पाऊस पाहिजे आहे. रोगराई विशेष ह्मणण्या सारखी नाहीं.

आम्हांस असें समजतें कीं वऱ्हाडांतील कमिशनरचे जागीं मे० क्राऊडन सा० काशमिरचे रेसिडेंट यांस नेमिले.

येथें एक रानें बाकसर प्रसादीक व्यवहार शिकनाटककार मंडळी ता० १६ रोजीं साताऱ्याहून आली आहे. आमच्या अकोल्यातील हौसी लोकांस आपले खिसे मोकळे करण्यास हा संधी बरी आहे. ही मंडळी कांहीं कसरतीचे खेळ ही करीत असते. मुसलमानी स्त्री नाटककार मंडळी ही येथें आहेच.

सर साळरजंग यांस पुन्हा निजामांच्या दिवाणगिरीवर नेमावें अशा बद्दल विलायतेंतल्या कित्येक बड्या मंडळीचा बेत असून त्या बद्दल त्यांचे इलाज चालूं आहेत असें डे. टा. पत्रकर्ता ह्मणतो. निजाम ह्या गोष्टीस कबूल होणार नाहींत असें तोच पत्रकर्ता ह्मणतो. एखाद्या बड्या धेंडाकडून शिफारस पत्र आल्यावर, निजाम विचार काय करणार!

अब्दुलहक्क यानें निजाम सरकारच्या हिशाबद्दल सर्व रकम भरून, ते आपल्या नांवीं करून घेतलें. पैकीं ७,००,००० रुपये रोकड दिले. ४,००,००० हैद्राबाद जमेदाराकडून येणें होतें, तो रोखा निजाम सरकारच्या हवाली केला. व बाकीच्या रकमेबद्दल त्याची मुंबईतील स्थावर मिळकत वाटसन हाटेल, ओल्ड सेक्रेटरीएट व सरदासि बिल्डिंग्ज, हीं निजाम सरकाराकडे गहाण लावून दिलीं. तरी खटला चालूच आहे.

## वर्तमानसार.

एका गुजराथी पत्रकारानें गोवध प्रतिबंधार्थ खालीं लिहिलेले प्रयोग चालूं करण्याची शिफारस केली आहे.

" ऐपतदार मनुष्यांनीं ठिकठिकाणीं भाषणें करवून गोरक्षणासाठीं खटपट करावी. या विषयावर जाहिरपत्रकें किंवा लहान पुस्तकें छापवून त्याचा लोकांत फैलाव करावा— गोरक्षण करणें हें किती अवश्य आहे अशा विषयीं मुसलमान लोकांची चांगली समजूत घालून, त्यांनां त्यांचे काजी किंवा मौलवी यांच्या कडून ऊपदेश करविण्याची तजवीज करावी— कसाई, म्लेंच्छ वगैरेनां कोणिही गाय विकूं नये. अशाबद्दल प्रत्येक जातीनें आपल्यांत सक्त ठराव करावें— जवळ असलेल्या गाईचें पोषण करण्याची कोणास ऐपत नसल्यास त्याची ती गाय जातीनें विकत घेऊन तिचे आपसांत संरक्षण करावें— लोकांनीं दुध, तूप, व दही यांचा आहार वाढवावा. चहाकाफी पिणें किंवा लेमनेड, सोडावाटर घेणें यापेक्षां दुधाचीच रतीब लावावा हें बरें. हल्लीं डाक्टर लोकांच्या पसंतीनें मोठें पुष्टकारक औषध जें कॉड्लिव्हर ऑईल (निव्वळ माशाचें तेल!) त्यापेक्षां दुधच स्वच्छ व श्रेष्ट आहे— प्रत्येकानें आपल्या कमाईचा दशांश गोरक्षणार्थं उभारलेल्या रकमेंत जमा करावा. वर्तमान पत्रकर्त्यांनीं आपलें पत्राचा १० वा भाग या विषयाचीच चर्चा करण्यांत खर्च करावी. वकिलांच्या वकिलीचा १० वा हिस्सा गाईसाठीं बाकिली करण्यांत जावा, वैद्य लोकांनीं सुद्धां गाईगुरानां औषधोपचार फुकट करीत असावें. याचप्रमाणें सर्वांनीं सर्व हिंदुस्थान देशांत दररोज किती गाई मरतात त्याची नक्की संख्या मिळवून ती सर्व लोकांस जाहीर करावी— गोरक्षक मंडळींचा हिशोब व ती करीत असलेली खटपट वरचेवर सर्वांस कळविली जावी— गोरक्षक मंडळींच्या शाखा होतील तितक्या ठिकठिकाणीं वाढवाव्या— आचार्य व धर्मगुरू याविषयीं उदासीनता धारण करतील तर त्यांचीं नांवें बेधडक जाहीर करून ते लोकचर्चेस पात्र व्हावेंत— दुधांत पाणी मिसळून तसेंच तुपांत चरबी मिसळून विकणारास जातीबाहेर टाकावें— देशांतील सर्व लोकांच्या सह्याचे अर्ज सरकाराकडे रवाना व्हावेंत— एतद्देशीय सर्व राजे रजवाडे आणि संस्थानिक यांनीं आपापल्या मुलखांत गोवधनिषेधाचे कडक कायदे करून ते सक्तीनें अमलांत आणावे— गोप्रदान घेऊन गाईचें पालन करण्याची ज्यांना ऐपत नाहीं अशा ब्राह्मणांस तसें गोप्रदान न करतां त्या ऐवजी द्रव्य द्यावें— कसाइखान्यांत किती गाया येतात वे त्या कोणकोणाकडून येतात त्यांची चोख माहिती मिळविण्याची तजवीज करावी— दूध व तूप स्वच्छ आणि निर्मळ विकणारी एक मंडळी उभी करावी. तिच्या व्यवस्थेकरितां लागणारे भांडवल भागीदार मिळवून सामाईक उभें करावें. व तिच्या शाखा ही अनेक कराव्या— या कामाकरितां सरकारची परवानगी घेऊन पाहिल्यानें तर एक कोटि रुपयांची सोडत काढवी. त्यांपैकीं पत्रास १ लक्ष रुपये बक्षिसें वाटण्यांत खर्च करून बाकी पत्रास लक्ष रुपयांमध्यें गोरक्षक मंडळींची व्यवस्था चालवावी— निरनिराळ्या सर्व व्यापारांवर गोरक्षणार्थ उभारलेल्या भर होण्या करितां कांहीं कर बसवावा— लग्नादि कार्याचे वेळीं अमुक एक रक्कम या भांडवला करितां द्यावी असा जातीनें आपल्यांत ठराव करावा बिनवारशी मिळकत सरकारांत जप्त होते किंवा दुसऱ्याच एखाद्यास मिळते अशा वेळीं तिच्यांतील कांहीं हिस्सा या भांडवलास मिळणाऱ्याची सोय व्हावी— जातीनें ठरविलेल्या गुन्हेगारास जो दंड घेतला जातो त्याचा चौथा हिस्सा या भांडवलांत जमा करावा, " या प्रमाणें सदरहु पत्रकर्त्यानें उपाय सुचविलें आहेत, हे व अशाच प्रकारचे आणखी कांहीं उपाय लोकांच्या विचारांत नेहमी खेळत असावेत व शक्य असेल त्याची लागलीच योजना करण्यास सुरवात करावी.

श्री० महाराज सयाजीराव गाईकवाड यांची स्वारी स्विझरलंडच्या हवेवर निघून गेल्याची बातमी टा० पत्रानें दिली. राज्यपदाची भोग भोगणें प्राक्तनाधीन असतें असें जुने लोकांचें ह्मणणें आहे, तें सयाजीरावाच्या स्थितीनें पूर्णत्वास नेलें.

॥ अभाग्याचें घरीं जाना कामधेनू आली ॥
॥ ओढाळ ह्मणूनि त्यानें बाहेर घातली ॥

त्या प्रमाणें सयाजीरावांच्या नशिबीं राज्यपद नसतां मीड साहेबांनीं त्यांस बळेंच सिंव्हासनावर आणून बसविलें. परंतु परान्मुख असल्या कारणानें त्या सिंहासनाचा त्याग करून इंग्लंडच्या लोकांपुढें दैनावस्थेनें उभे रहाण्याचें कबूल केलें तेथें लोकांनीं काय करावें! ! !

बंगलोरचा किल्ला महिसूर दरबारांत देण्याचा हुकूम झाला. हा किल्ला देतेवेळीं सरकारनें कबुलायत करून घेतली आहे कीं, सदरहु किल्ल्यावर लढाऊ सामान हमेषा बाळगून ठेऊ. इंग्रज सरकारास त्याची जरूर लगेल तेव्हां स्वाधीन करूं. परशत्रूंवर गोळा फेकण्याचा वक्त आल्यास इंग्रजी गोलंदाजा शिवाय गोळा ठासण्यांत येणार नाहीं. एवढ्या अटीनें हा बांधून देऊन महिसूर दरबार किल्ला ताब्यांत घेऊन काय उजेड पडणार. न कळे. म०

श्री० तात्या साहेब सांगलीकर यांची स्वारी महाबळेश्वराहून परत संस्थानांत गेली. तात्या साहेबांवर गव्हरनर साहेबांचा राग होऊन त्यांच्या लोकांस महाबळेश्वराहून एकदम खालीं जाण्याचा हुकूम झाला, यांतील इंगित काय आहे तें कळत नाहीं.

लार्ड डफरीन यांनीं एक गुप्त सरक्युलर काढून सर्व इलाख्यांतील सरकारांकडे पाठविलें आहे. त्यांत त्यांनीं प्रत्येक इलाखे सरकारास आपआपले इलाख्यांतील लोकांची स्थिती कशी काय आहे ह्मणजे त्यांस पोटभर अन्न मिळतें कीं नाहीं, मिळत असल्यास किती महिने मिळतें व किती महिने मिळत नाहीं. त्यांची रहाण्याची स्थिति कशी काय आहे, घरेंदारें आहेत कीं नाहींत, पुरेशीं वस्त्रें त्यांस मिळतात कीं नाहीं वगैरे बद्दल सविस्तर व खरी माहिती तारीख १ जूनच्या आंत कळविण्याविषयीं लिहिलें आहे. क० त०

आंबा साखरेला ह्मणतोः—

गर्व मा कुरु शर्करे ! तव गुणान्
जानन्ति राज्ञां गृहे
ये दीना भ्रमर्जिताश्च कृपणाः
स्वप्ने ऽ पि पश्यन्ति नो ॥
आम्रो ऽ हं मधुकुपकर्मधुफलै—
स्तृप्ता हि सर्वे जना
हे रण्डे! तव किं गुणा! ममै फलै—
स्तुल्यं न किंचित् फलम्

" अग साखरे! तूं कांहीं गर्व करू नकोस. तुझा गुण (गोडी) फक्त राजांसारख्या श्रीमान् लोकांसच समजतो. परंतु; जे गरीब गुरीब, द्रव्यहीन किंवा कृपण आहेत ते तर तुला स्वप्नांत ही पहात नाहींत. पण, मी आंबा असून माझी मधासारख्या गोड रसाच्या सांठवणाचीं मधुर फलें सर्वांना मिळून ते संतुष्ट होतात. तर, रांडे, तुझ्यांत कोणते गुण आहेत? माझे फला बरोबर दुसरें कोणतें ही फल तुलना करण्या सारखे नाहीं! " ज्ञा० च०


## अवश्य पहा.

## गजकर्णावर रामबाण औषध.

वऱ्हाड व नागपूर ह्या दोन प्रांतांत हजारों लोकांस गुण येत आहे. गुणा बद्दल खात्री इतकीच कीं, गुण न आल्यास किंमत परत देऊं. गुणाबद्दल पुष्कळ सर्टिफिकिटें आहेत, त्यांपैकीं कांहीं बाटली बरोबर असलेल्या माहितीच्या कागदांत दिलीं आहेत. दर बाटलीची किंमत ०९ आणे.

## खरजेवर मलम.

गुलाबी मुळींच झोंबत नाहीं. पांच चार दिवस लावल्यानें खरूज, फोड, आगपैण हां खात्रीनें बरीं होतात. किंमत दर डबीस ०८ आणे.

## हींव तापावर गोळया.

कितीही दिवसांनीं येणारें हींव असो सुमारें १० अगर १२ गोळ्यांनीं बंद होतें. पर बाटलीची किंमत १२ आणे.

सूचनाः—ही सर्व औषधें अनुभवलेलीं आहेत सबब रोग्यांस अशी विनंती आहे कीं गरज पडेल तेव्हां ह्या औषधांचा अवश्य उपयोग करून पहावा. प्रत्येक औषधास बंगी खर्च ०१ आणा बंगी नाटपेड माहितीचा कागद बरोबर हीं सर्व औषधें वऱ्हाडांत अकोलें येथें आमचे दवाखान्यांत रोख पैशानें अगर व्ह्या. पे. नें मिळतील. कळावें. नारायण चिंतामण डाक्तर.

## जाहिरात.

पुणें " ज्ञानचक्षु " छापखान्यांत विकीस तयार असलेल्या पुस्तकांची यादी.

| मराठी आक्ट. | किंमत ट. | ह. |
|---|---|---|
| क्रिमिनल प्रोसिजर सटिक | ५ | ०८ |
| सिव्हिल प्रोसिजर सटीक | ५ | ०८ |
| पिनलकोड सटीक.... | ७ | ०८ |
| न्यायरत्न........ | १ ०८ | ०२ |
| रेव्हिन्यु कोड......... | ०८ | ०१ |
| सदरची रुळी........ | ०८ | ०१ |
| स्टांप आक्ट........ | ०६ | ०१ |
| कोर्ट फी आक्ट........ | ०६ | ०१ |
| कराराचा आक्ट........ | ०१३ | ०२ |
| पुराव्याचा आक्ट........ | ०८ | ०१ |
| रजिस्टर आक्ट........ | ०६ | ०१ |
| मुदतीचा आक्ट........ | ०६ | ०१ |
| आबकारी आक्ट........ | ०७ | ०१ |
| जंगलसंबंधीं आक्ट........ | ०८ | ०१ |
| विशेष न्यायाचा आक्ट.... | ०८ | ०१ |
| वतनदार आक्ट........ | ०६ | ०१ |
| लोकलबोर्ड आक्ट........ | ०६ | ०१ |
| मनोरंजक पुस्तकें. | किंमत ट. | ह |
| श्री भावार्थरामायण.... | २० | २ |
| विचित्रपुरी........ | १ | ०२ |
| मदनमंजरी ........ | २ | ०२ |
| कामकंदला नाटक.... | १ | ०२ |
| उपयुक्त चमत्कार सं. भा. १ ते १० दर मागास किं. दहाही भा. घेत. ट. हा. माफ. | ०५ | ०१ |
| अलखमेपलख पलखमे दर्याव | ०४ | ०१ |
| सतारीचें १लें पुस्तक.... | १०४ | ०२ |
| संगीत रावविलास नाटक | ०६ | ०१ |
| मदनदहन नाटक........ | ०१२ | ०२ |
| चमत्कारचिंतामणि .... | ०११ | ०२ |
| मल्लविद्याप्रकाश........ | १ | ०२ |
| ऋणसंहार........ | ०४ | ०१ |
| मराठी ह्मणीं........ | ०७ | ०१ |
| गोपीचंद नाटक (हिं.) | ०१२ | ०२ |
| मराठी रघुसर्ग दर भा. | ०१० | ०१ |

भाऊ गोविंद सापकर, ज्ञानचक्षूचे मालक.


नोटीस.

लक्ष्मणदास मारवाडी दुकान आळेगांव यांस नोटीस देणार बाबासा वल्लद मुकुंदसा रहाणार आळेगांव. नोटीशीनें असें कळवितों कीं, तुमचे दुकानीं आमचे देवघेवीचें खातें आज अदमासें १६ वर्षें आहे अलीकडे अदमासें दोन वर्षें जवळ जवळ जाहलीं आपण आमच्या खात्याचा हिशोब करून ४५१ चारशे एकावण रुपये व्याज व मुद्दल मिळून बाकी काढलीत आतां हा हिशोब दाखविण्याच्या अगोदर अदमासें १७ महिने रुपये आपल्या दुकानीं १५४ जमा केले आहेत. आतां सदरील जो आमच्या खात्याचा हिशोब आपण दाखविला तो बरोबर नाहीं. आह्मांस त्या हिशोबाबद्दल संशय वाटतो याजकरितां तुह्मांस ही नोटीस देऊन असें कळवितों कीं नोटीस पावल्यापासून आठ दिवसांत आमच्या खात्याचा सुरू पासून हिशोब दाखवून जे रुपये तुमचे बाजवी वाजवी हिशोबी निघेल ते घेऊन पावती द्यावी आणि निकाल करावा. असें न करिता जर अकसानें काम वगैरे चालविल्यास कोणच्या ही प्रकारचे जबाबदार आह्मी नाहीं. ह्मणून दिली नोटीस कळावें. तारीख १२ माहे एप्रील सन १८८८ इ०

(सही.)
बाबासा वल्लद मुकुंदसा
रंगारी रहाणार आळेगांव ता. बाळापुर दस्तुर खुद्द.

हें पत्र आकोला येथें कै० बा० खंडेराव बाळाजी फडके यांचे " वऱ्हाडसमाचार " छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

किरकोळ अंकास........................०४

नोटिशीबद्दल.

१० ओळींचे आंत रु. १

पुढें दर ओळीस ०१०६

दुसरे खेपेस-........०१

# वऱ्हाडसमाचार.

Advertisements.
Below 10 lines...2 Rs
Per line over 10...4as
Repetition perline...3

THE BERAR SAMACHAR.

VOLXXII | AKOLA MONDAY 25 JUNE 1888 | NO.25

वर्ष२२ | अकोला सोमवार तारीख २५ माहे जून सन १८८८ इ० | अंक २५



## जाहिरात.

पुणें "ज्ञानचक्षु" छापखान्यांत विक्रीस तयार असलेल्या पुस्तकांची यादी.

| मराठी आक्ट. | किंमत | ट. ह. |
|---|---|---|
| क्रिमिनल प्रोसिजर सटिक | ५ | ०८ |
| सिव्हिल प्रोसिजर सटीक | ५ | ०८ |
| पिनलकोड सटीक........ | ७ | ०८ |
| न्यायरत्न.......... | २ ०८ | ०२ |
| रेव्हिन्यु कोड.......... | ०८ | ०१ |
| सदरची रुळी.......... | ०८ | ०१ |
| स्टांप आक्ट.......... | ०६ | ०१ |
| कोर्ट फी आक्ट........ | ०६ | ०१ |
| कराराचा आक्ट........ | ०१३ | ०२ |
| पुराव्याचा आक्ट........ | ०८ | ०१ |
| राजिस्टर आक्ट........ | ०६ | ०१ |
| मुदतीचा आक्ट........ | ०६ | ०१ |
| आबकारी आक्ट........ | ०७ | ०१ |
| जंगलसंबंधी आक्ट........ | ०६ | ०१ |
| विशेष न्यायाचा आक्ट.... | ०८ | ०१ |
| वतनदार आक्ट........ | ०६ | ०१ |
| लोकलबोर्ड आक्ट........ | ०६ | ०१ |
| मनोरंजक पुस्तकें. | किंमत | ट. ह |
| श्री भावार्थरामायण.... | २० | २ |
| विचित्रपुरी.......... | २ | ०२ |
| मदनमंजरी .......... | २ | ०२ |
| कामकंदला नाटक.... | १ | ०२ |
| उपयुक्त चमत्कार सं. भा. १ ते १० दर मागास किं दहाही भा. घेत. ट. हा. माफ. | ०५ | ०१ |
| अलखमेपलख पलखमें दर्याव | ०४ | ०१ |
| सतारीचें १लें पुस्तक.... | १०४ | ०२ |
| संगीत रावाविलास नाटक | ०६ | ०१ |
| मदनजन्म नाटक........ | ०१२ | ०२ |
| चमत्कारचिंतामणि .... | ०१३ | ०२ |
| मल्लविद्याप्रकाश.......... | १ | ०२ |
| ऋणसंहार.......... | ०४ | ०१ |
| मराठी ह्मणी.......... | ०७ | ०१ |
| गोपीचंद नाटक ( हिं. ). | ०१२ | ०२ |
| प्राटी रघुसर्ग दर भा. | ०१० | ०१ |

भाऊ गोविंद सापकर, ज्ञानचक्षुचे मालक.

## अवश्य पहा.

## गजकर्णावररामबाण औषध.

वऱ्हाड व नागपूर ह्या दोन प्रांतांत हजारों लोकांस गुण येत आहे. गुणा बद्दल खात्री इतकीच कीं, गुण न आल्यास किंमत परत देऊं. गुणाबद्दल पुष्कळ सर्टिफिकेटें आहेत, त्यांपैकीं कांहीं बाटली बरो- लेल्या माहितीच्या कागदांत दर बाटलीची किंमत [illegible]


गुरु [illegible]

दिवस [illegible]ष्ठ वद्य ९ शके १८१०.

[illegible] ्च्या कडे 'आर्यन लिफलेट' या नां-


खात्रीनें बरीं होतात. किंमत दर डबीस ०८ आणे.

## हींव तापावर गोळ्या.

कितीही दिवसांनीं येणारें हींव असो सुमारें १० अगर १२ गोळ्यांनीं बंद होतें. पर बाटलीची किंमत १२ आणे.

सूचनाः–ही सर्व औषधें अनुभवलेलीं आहेत सबब रोग्यांस अशी विनंती आहे कीं गरज पडेल तव्हां ह्या औषधांचा अवश्य उपयोग करून पहावा. प्रत्येक औषधास बंगी खर्च ०१ आणा. बंगी नाटपेड माहितीचा कागद बरोबर. हीं सर्व औषधें वऱ्हाडांत अकोलें येथें आमचे दवाखान्यांत रोख पैशानें अगर व्ही. पे. नें मिळतील. कळावें. नारायण चिंतामण डाक्तर.


( नोटीस. )

नोटीस रामप्रताप रघुनाथदासजी दुकान कजबे अकोलें यांस खालीं सही करणार यांज कडून कळविण्यांत येत आहे कीं आबा वलद शामाभोई वस्ती मंगळवारा अकोलें याची मिळकत स्थावर घरें ५ आह्मा जवळ रुपये ३०० तीनशे शिवाय व्याज यास गहाण आहेत तीं तुह्मी खरीद घेतलीं आहेत त्या मिळकतींवर आमचे हक्क राहून हरास व्हावेत असा कोर्टाचा ठराव झाला असून तुह्मी आमचे गहाणाचा निकाल केला नाहीं याज करितां या नोटीशीनें कळवितों कीं सदरील गहाणाबद्दल मुद्दल रुपये ३०० तीनशे व त्याचें व्याज दर शेंकडा १॥ प्रमाणें मिती भाद्रपद शुद्ध १० संमत १९३९ पासून निकाल होई पर्यंत जे हिशोबानें होईल ते असे ही नोटीस पावल्या दिवसापासून आठ दिवसांचे आंत निकाल करावा असें न केल्यास दिवाणी कोडतांत फिर्याद करून फिर्यादीचे खर्चा सुद्धां व नोटीशीचे खर्चा सुद्धां रुपये भरून घेतले जातील कळावें तारीख १९ माहे जून सन १८८८ इसवी.

( सही )

गोंदुलाल परभुदास

दस्तुर खुद

( नोटीस. )

सोमवारगीर गुरू यादवगीर गोसावी भांसाक्षोर हल्लीं वस्ती गोळेगांव यांस खालीं स[illegible]णार इजकडून नोटीस देण्यांत येतें कीं [illegible] होऊन सुमारें १२ वर्षें झालीं. [illegible] दोन वेळां [illegible]न [illegible] हाल केले त्या [illegible] वर्षें [illegible]रखे पावितों तूं [illegible]पले घरीं नेलें नाहींस आजपर्यंत मी आपले बापाचे घरीं कर्ज वगैरे काढून निर्वाह केला परंतु आतां मजला कोणी कर्ज देत नाहीं, करितां तुला या नोटीशीनें असें कळवितें कीं, आजपर्यंत अन्नवस्त्र बद्दलचा खर्च झालेले दरमहा रुपये ४ प्रमाणें ३ वर्षांचे १४८ रुपये देऊन मजला घरीं घेऊन जावें नाहींपेक्षां मी गंधर्वाचा दुसरा नवरा करीन मग तुझा मजवर कोणत्याही प्रकारचा हक्क रहाणार नाहीं सबब ही नोटीस पावल्या पासून ४ दिवसांचे आंत रुपये देऊन मजला घेऊन जावें. तूं पुनर्विवाह केला आहेस. एवढ्या करितांच तूं मला वागविण्याचा तिरस्कार करीत आहेस. कळावें ता० १७ माहे मार्च सन१८८८ इ०

( सही ) बाळजाबाई जवजे सोमवारगीर वस्ती मोरगांव भाकऱ्याचे निशाणी खुद्द हातची बांगडी असे.

(साक्षीदार लोक [illegible] त्या पैकीं १०२९ [illegible] तीन दिवसांपेक्षां जास्त दिवस [illegible] असावी तशी [illegible] लें अकोला स्माल्काज)

नोटीस.

रामजी वलद परशराम व नरसिंग वलद रामजी कुणबी पाटील राहणार वडद तालुके आकोलें यांस

खालीं सही करणार यांजकडून देण्यांत येतें कीं, आह्मी तारीख ३० माहे मार्च सन १८८८ रोजीं वडद येथील सरवे नंबर ३५ एकर १८०८ आकार ३४ यांतील $\frac{1}{2}$ हिस्सा रोडाजी वलद मुकुंदा याजपासोन विकत घेतली त्या हिश्यांत आम्ही आपली वखरें पाठविलीं असतां तुम्ही विनाकारण बेकायदेशीर हरकत केली सबब या नोटीशीनें कळविले जातें कीं, सदरहु नोटीस पावतांच निमे हिस्सा आमचे कबजांत द्यावा व कोणती ही हरकत करूं नये तसे न केल्यास रीता प्रमाणें तजवीज होईल व तुम्हांस त्या बद्दल नुकसानी आणि कोर्ट खर्च सोसावा लागेल कळावें. ता. १९—६—८८ इ०

( सही ) प्रेमसुक केदारनाथ

मालक रोडमन.

वऱ्हाडसमाचार.

मिती ज्येष्ठ वद्य २ शके १८१०.

( मागील अंकावरून पुढें चालूं. )

१०. ज्या तारखेस व ज्या ठिकाणीं निवड करण्याचें काम चालविण्याचें त्याबद्दची निवड करणारांस तीस दिवसांची नोटीस दिली जाईल.

११. निवडी करितां नेमलेले तारखेचे १४ दिवस अगोदर कोणत्याही दोन निवड करणारांनीं नियम २ यांत सांगितलेली लायकी असलेल्या इसमाचें नांव दिपुटी कामिशनर यांस कळवावें. व त्या वरून त्या इसमाचें नांव मेंबरच्या जागे करितां केलें जावें.

१२. निवडीची व्यवस्था दिपुटी कामिशनर अगर तालुक्याचा चार्ज त्या वेळीं असणारे इतर अधिकारी यांजकडे राहील. त्यांचे जवळ सरकलांतील सर्व मतें देणारांची व निवडी करितां उमेदवारांची यादी राहील व त्या निवडणुकी संबंधीं कोणतेही प्रश्नाचा अखेर निकाल करतील.

१३. निवडी करितां नेमलेले दिवशीं निवडणारांचे यादीवरून प्रत्येक निवडणारांचें नांव घेऊन पुकारावें, व तो हजर असेल तर कोणाकरितां तो मत देतो हें त्यास विचारावें. किंवा त्याणें आपले मताचा कागद योग्य प्रकारें सही केलेला दाखल करावा. मग त्याचें मत दाखल झालें पाहिजे, तें मत नेमलेले दिवशींच कबूल करितां येतें. जर निवडणूक करणारानें त्या दिवशीं नेमलेल्या वेळीं आपलें मत लिहून दिलें नाहीं तर त्याचें मत घेतलें जाणार नाहीं.

१४. सर्व मतें लिहून घेतल्या नंतर व्यवस्था करणारे अधिकाऱ्यांनीं प्रत्येक उमेदवारा करितां लिहिलेले मतांचे संख्येची बेरीज घ्यावी. व ज्या उमेदवारा करितां किंवा उमेदवारांकरितां मतांची संख्या सर्वांहून जास्त लिहिली गेली असेल ते निवडले गेले ह्मणून प्रसिद्ध करावें.

१५. जेव्हां मतांचे बरोबरपणामुळें एखादे उमेदवाराची निवड अनिश्चित राहिली असेल तव्हां त्यांची निवड लाट ( चिठ्या ) टाकून केली जावी.

१६. दोन लायक निवडणारांनीं निवडी करितां प्रत्येक उमेदवाराबद्दल सूचना करून अनुमोदन दिलें पाहिजे, एकाच मत देणारानें एका पेक्षां जास्त उमेदवारांकरितां सूचना करूं नये किंवा अनुमोदन देऊं नये.

१७. प्रत्येक निवडणारास त्याचे सरकलांत जितक्या रिकाम्या जागा भरण्याच्या असतील तितक्या उमेदवाराकरितां मत देतां येतें परंतु एखाद्या उमेदवाराकरितां एका पेक्षां जास्त मत त्याणें देऊं नये.

१८. निवडले जाणारे मेंबरांची ठरीव संख्या जर निवडणारे निवडणार नाहींत तर रिकाम्या असलेल्या जागा नेमणुकीनें भरल्या जाव्यात. पण असे नेमलेले मेंबरांची संख्या बोरडांतील एकंदर संख्येच्या निमे पेक्षां जास्त नसावी.

१९. एखादे निवडीचें काम पूर्ण झाल्या वर निवडले गेलेले उमेदवारांचीं नांवें रेसिडेंसी आर्डर्स मध्यें प्रसिद्ध होण्या करितां कमिशनरचे मार्फतीनें रेसिडेंट साहेबांकडे पाठवावीं. व त्या समागमें नेमलेले मेंबरांचीं नांवेही पाठवावीं.

२० रेसिडेंट साहेब निवड मंजूर करी पर्यंत निवडलेले मेंबरांस कामावर रुजूं होतां येणार नाहीं.

२१ निवडलेले इसमांचीं नांवें रेसिडेंसी आर्डर्समध्यें प्रसिद्ध झाल्यावर होईल तितके लौकर डिपूटी कमिशनर यांणी त्यांपैकीं, कोणास रुरल बोर्डसला यांतील कलम १९ या अन्वयें जरूर असलेला चेअरमन व व्हाईस चेअरमन निवडावयाची याजकरितां नवीन बनविलेले बोर्डाची सभा भरवावी.

( पुढें चालूं.)

## मुंबई इलाख्यांतील दोन कमेट्यांची हकीकत.

लार्ड रिपन साहेब यांनीं स्थानिक स्वराज्याचा पाया घालून दिल्यापासून चोंहोंकडे म्युनिसिपल कमेट्या व लोकल बोर्ड स्थापन झाले आहेत. वऱ्हाडांत कमेट्या स्थापन होण्याचा ही कायदा झाला आहे परंतु अद्याप त्या कायद्या अन्वयें पोटनियम वगैरे व्हाव याचे असल्यामुळें आजपर्यंत तो कायदा अमलांत आला नाहीं. लोकल बोर्डाचे नियम नुकतेच आले आहेत, मुंबई इलाख्यांत मात्र कितीएक ठिकाणीं कमेट्या स्थापन होऊन त्या कशा चालतात याचा थोडासा अदमास करण्या पुरता वेळ ही झाला आहे. हल्लींचे प्रसंगीं आमदाबाद व भैमराबाद एथील कमेट्यांची हकीकत देण्याचे आमचे मनांत येण्याचें कारण असें आहे कीं त्या दोन ठिकाणीं कमट्यांची जी स्थिति झाली तीच स्थिति वऱ्हाडांतील कमेट्या स्थापन होऊन काम करूं लागल्या म्हणजे कधीं तरी येणारी आहेच. भैमराबाद येथील म्युनिसिपल कमेटीची हकीकत अशी झाली कीं, तेथील कमेटीनें आकट्राय डयूटी ह्मणजे बाहेरून येणारे मालावर जकात बसविली अर्थात् कमेटीस कोणत्या तरी रीतीनें उत्पन्न केलेंच पाहिजे कारण खर्च तर कसा तरी निभला पाहिजे. व या साठीं लोकांस होता होईल तों पर्यंत गैरसोय कमी होऊन जर एखादी जकात अगर एखादा कर बसवितां येईल तर तो बरा. हा विचार मनांत आणून नवीन कमेटीनें प्रथम बाहेरील मालावर जकात बसविली. बाहेरील मालावर जकात घेतल्यानें लोकांवर बोजा तर पडतोच पण तो बोजा पडलासा वाटत नाहीं. कारण ती जकात बहुतेक जिनसांवर वाटली जाऊन सर्वांवर थोडथोड्या प्रमाणानें बसतें व ती बसलीशी वाटत नाहीं. ही मालावरील जकात मुंबई सरकारास नापसंत झाल्यामुळें त्यांनीं कमेटीस सुचविलें कीं दुसरा एखादा कर बसवावा; कारण मुंबई सरकारचें ह्मणणें असें पडलें कीं या जकाती पासून बाहेरील माल आणणारांस माल येण्यास प्रतिबंध होतो व एकंदर व्यापाराची पायमल्ली केल्या सारखे होतें. असें झाल्या नंतर कमेटीनें आकट्राय काढून टाकून एक कर बसविला परंतु त्या करासंबंधानें दिवाणी कोर्टांत फिर्याद होऊन असें ठरलें कीं तो कर अन्याय आहे. यामुळें कमेटीचा निरुपाय होऊन पुन्हा आकट्राय डयुटी बसविणें भाग पडलें. त्या मुळें मुंबई सरकारची इतराजी होऊन त्यांनीं कमेटीस शिक्षा दिली ती अशी कीं एक वर्ष पर्यंत कमेटी बंद करून तेथील लोकांचे अधिकार एक वर्ष पर्यंत काढून घेतले.

आकट्राय डयूटी ह्मणजे बाहेरून येणारे मालावर जकात व इतर प्रकारचे कर याजमध्यें भेद वर सांगितल्या प्रमाणें असा आहे कीं जकात लोकांस प्रत्यक्ष दिलेशी वाटत नाहीं. व दुसऱ्या कराचा मात्र बोजा वाटतो ह्मणून अर्थशास्त्रांत पहिल्या प्रकारास अप्रत्यक्ष कर ह्मणतात व दुसऱ्यास प्रत्यक्ष कर ह्मणतात. मालावर जकात बसविली ह्मणजे खरोखर व्यापारास प्रतिबंध केल्या सारखे होतें कीं काय याचा विचार केलातर असें दिसून येईल कीं, व्यापारास कोणत्याही तऱ्हेनें बाध येत नाहीं जो माल बाहेरून गांवांत विकरीसाठीं येतो. ह्मणजे गांवांत येऊन तेथल्या तेथेंच खपतो त्यामालावर हा कर पडतो. ह्मणजे प्रथम व्यापाऱ्यास हा कर द्यावा लागतो खरा परंतु शेवटीं तो गिऱ्हाईकासच द्यावा लागतो; कारण ज्या प्रमाणानें जकात असते त्या प्रमाणानें सर्व वस्तूंची किंमत थोडथोडी वाढते. व असें केल्यानें तो जकातीचा बोजा शेवटीं सर्वांवर थोडथोडा वाटला जातो. बाहेरून माल गांवांत येऊन दुसरिकडे पुन्हा बाहेर गांवीं गेला तर त्याजवर ही जकात घेतली जात नाहीं. उदाहरणार्थ खामगांवाहून कांहीं माल आकोल्यास आला तर प्रथमतः अकोल्यांत येतांना त्याजवर जकात द्यावयाची परंतु तोच माल पुन्हा उमरावतीस पाठवून दिला तर त्याजवर घेतलेली जकात परत दिली जाते ह्मणजे अकोल्यास मात्र जो माल खपतो अथवा अकोल्याचे अकोल्यांत जो माल जिरतो त्या मालावर मात्र जकातीचा बोजा पडतो. यावरून उघड आहे कीं, एकंदरीनें चोहोंकडेच व्यापारावर बोजा न पडतां एका ठिकाणीं खपणाऱ्या मालावर मात्र जकात पडून सर्व मालावर वाटली जाते. व वर सांगितल्या प्रमाणें ही जकात व्यापाऱ्यांस परत येते कारण मालाची किंमत जकातीच्या मानानें ते जास्ती चढवितात. असल्या प्रकारची ही जकात असून मुंबई सरकारनें या जकातीस काय कारणानें प्रतिबंध केला हें समजत नाहीं. उमरावतीचे कमेटींत कांहीं दिवसापूर्वीं ही जकात सुरूं करण्या बद्दल बाटाघाट चालली होती परंतु शेवटीं त्यांनीं ही जकात बसविली नाहीं. परंतु मागें पुढें ही जकात बसविण्याचा प्रसंग खचित् येईल कारण या जकातीनें पैसा उत्पन्न ठीक रीतीनें होऊन लोकांस त्याचा बोजो फारच थोडा वाटतो.

( पुढें चालेल.)

## हिंदुस्थानचे भावी व्हाइसराय

( लार्ड लांसडाऊन )

लार्ड डफरिन मागून होणारे हिंदुस्थानचे व्हाइसराय लार्ड लांसडाऊन हे कानडा देशांतील आपली गव्हरनर जनरलची कारकीर्द संपल्यावरून गेल्या मे महिन्यांत कानड्याहून निघाले आहेत. त्यांच्या अलौकिक राज्यकर्तृत्वाबद्दल कानडा देशांतील लोक लाट साहेबांस फार फार चहातात आणि साहेब कानडा देश सोडून जात आहेत ह्मणून ते मनस्वी दिलगीर आहेत. सन १८८३ तील आक्टोबर पासून सरासरी पांच वर्षे लार्ड लांस डाऊन कानड्याचे गव्हरनर जनरल आहेत. ह्या वर्षांत आपल्या अंगच्या गुणांनीं इतके लोकप्रिय झाले आहेत हे त्यांस अत्यंत भूषणावह आहे. कानड्यांतील पार्लमेंटामध्यें बलाढ्य पक्ष प्रतिपक्ष असून ही कानड्याचा राज्यकारभार सुयंत्र चालला आणि उत्तरोत्तर तो देश ऐश्वर्याच्या वैभवास चढला हे साहेब बहादुरांच्या राज्यकरण्याच्या शैलीचें फल होय. वेळोवेळ भिन्नभिन्न प्रकरणांत मतभेद पडत असे तेव्हां त्यांस समतोल न्यायबुद्धी ठेवून प्रतिस्पर्धे न मोडतां अनेक प्रकारें राज्यकारभारांत येणारे व्यत्यय नाहींसे करावे लागत असत. साहेबांची उत्साहयुक्त मुद्रा व शांत मनोवृत्ति ही त्यांच्या फार उपयोगी पडत असत असें सांगतात. ह्यांच्या कारकीर्दींत कानडा– पासिफिक रेल्वे सुरू झाली आहे तिजपासून जगांतील त्या भागांत कानडा देशांत विलक्षण महत्व आलें आहे. हे लाट साहेब अमुक अमुक प्रसंगीं लोकांनीं काय काय करावे याविषयीं आपलें मत प्रत्यक्षपणें निर्दिष्ट करीत नसत तरी लोकमताचा कल पाहून त्या धोरणानें पार्लमेंटास सल्लामसलत देत असत व तो लोकांस ही पसंत पडे. साहेब आपण होऊन कांहीं करीत नसत तरी लोकांस आपल्या ह्मणण्याप्रमाणें करण्यास लावीत. ही साहेबांची लोकोत्तर दक्षता व दूरदृष्टी आश्चर्य करण्या सारखी आहे.

कानडा देशांत नांवाजलेले विद्वान आणि लोकप्रिय साहेब लार्ड लांसडाऊन हे हिंदुस्थानचे व्हाइसराय होणार आहेत ह्मणून आह्मास मोठा आनंद वाटतो. प्रस्तुतचे व्हाइसराय लार्ड डफरिन हे ही सन १८७२ पासून १८७८ पर्यंत कानड्याचे गव्हरनर जनरल होते. कांहीं वर्षांनीं असा नियम होण्याचा संभव आहे कीं हिंदुस्थानच्या व्हाइसरायचे जाग्याला लायक ठरण्यासाठीं कानडा देशाचे गव्हरनर जनरल होणें जरूर आहे मध्यंतरी अशी पायरी ठेवण्यापासून आमच्या देशाचा अनेक प्रकारें फायदा होईल असा तिकडील राज्यव्यवस्थेच्या ठोकळ ठोकळ माहितीवरून अनुमान करितां येईल. कानड्या कडील राज्यकारभार पार्लमेंटच्या धर्तीवर चालतो आणि तसा हिंदुस्थानांत हे चालूं व्हावा ह्मणून कित्येक वर्षांपासून सरकारापाशीं मागणें आहे.

इंडियाचे व्हाइसराय झाले ह्मणजे लाट साहेब केवळ नबाब किंवा बादशाहा बनतात. ते करतील ती पूर्वदिशा अशी पूर्वापार चाल पडत आली आहे. लोकमताला अनुसरण्याचा नैसर्गिक अंकूर लाट साहेबांच्या मनांतल्या मनांत हिंदुस्थानांत पाय टाकल्या बरोबर खुडला जातो हें मोठें आश्चर्य आहे. ह्या आमच्या ह्मणण्यास बळकटी आणण्यासाठीं ... डे डफरिनची कारकीर्द चांगलें मासले... उदाहरण आहे. लार्ड डफरिन यांनीं ... देशांत चांगला लौकीक संपादला ... हिंदुस्थानांत त्यांनीं बहुतेक आस... काबीज करण्यामध्यें वर्षे खर्ची... हेबांची कारकीर्द हिंदुस्थाना... लाभली नाहीं असें कांहीं ...ा झाली ...त्वा नेमलेला असेल ... ...नें किंवा नेमणुकीनें भरल्या जा...

...vind ...al in the ...vilege leave for with effect from such ...al himself of it.

Mr. Ramrao Narayan, Clerk of the Deputy Commissioner's Court, Wun District, is appointed to officiate as Tah... ...r of Yeotmal during the absence on ... Mr. Govind Raz Moodliar, or ...ders.

...स्यांचें मत आहे. तें खरें असो किंवा नसो त्या संबंधानें चर्चा करण्याचे सध्यां कांहीं प्रयोजन नाहीं. हिंदुस्थानचे भावी व्हाइसराय लार्ड लांसडाऊन यांस आमची विज्ञप्ती एवढीच आहे कीं त्यांनीं हिंदुस्थानच्या प्रजेस निव्वळ पादाक्रांत केलेल्या लोकांप्रमाणें न वागवितां नेटिव लोकांस थोडथोडे राज्यकारभारांत हक्क देऊन नवीन सुरूं केलेली स्थानिक स्वराज्याची रीत पूर्ण विकसास न्यावी. कानडादेश आणि हिंदुस्थान देश यामधील राज्यपद्धतींत जमीन अस्मानाचे अंतर दिसून येते तें होईल तितके नाहींसें करून टाकण्यास एक साधी व सोपी युक्ति आहे ती हीच कीं हिंदुस्थानचीं राज्यसूत्रें हातीं घेतल्यावर कानड्याकडील लोकमान्य वर्तनक्रम न बदलतां तो पूर्ववत् चालूं ठेवणें ही होय.

## दिवाणी न्यायखातें.

( सन १८८७ सालाबद्दल )

( मागील अंकावरून पुढें चालूं )

सन १८८६ सालांतल्या शिल्लक राहिलेल्या २८३४ दाव्या सुद्धा या वर्षी एकंदर ३०,६२७ दावे निकाला साठीं होते त्यापैकीं शेंकडा ८४-९ प्रमाणें ह्मणजे २६०१८ दाव्यांचा निकाल झाला आणि बाकीचे ४६०९ दावे पुढील सालाकरितां तुंबून राहिले आहेत. सालोसाल दिवाणी काम अधिकाधिक शिल्लक रहात जात आहे या वरून दिवाणी कामांत निरनिराळ्या न्यायाधिशाकडून हयगय होत असावी किंवा कामाच्या मानानें असावे तितके न्यायाधीश व कोर्टें नसावीं. वऱ्हाड प्रांतांतील दिवाणी खात्याकडील आफिसर मंडळी आपापल्या कामांत दक्ष न सल्याविषयीं आह्माकडे कधीं बोभाटा नाहीं. उलटें ठोकळ अनुमान एवढें करितां येईल कीं सर्व आफिसर लोक यथाशक्ति आपलें काम चांगलें बजावतात इतकेच नव्हे तर कांहीं कांहीं या खात्यांतील अधिकारी आपल्या नियमित वेळा पलिकडे काम करून सरकारच्या पसंतीस उतरले आहेत. ह्यावरून हें उघड आहे कीं साही जिल्ह्यांतून एकंदर दिवाणी काम निघतें त्या प्रमाणानें दिवाणी कोर्टांची संख्या फार कमी आहे. ही गोष्ट पूर्णपणें रेसिडेंट साहेबांनीं लक्ष्यांत वागवून त्याप्रमाणें दिवाणी कामाचा निकाल वेळच्यावेळीं होण्यासाठीं व्यवस्था केल्यास आह्मीं साहेबांचे फारफार आभार मानूं. पक्षकार लोक हजर नसतांना निकाल झालेल्या दाव्यांची संख्या बुलढाणा आणि अकोला जिल्ह्यांत फार मोठी आहे. ह्याचें कारण असें दर्शविलें आहे कीं समन्सें बजाविली असून ही प्रतिवादीस आपला पक्ष कमी आहे असें ठाऊक असल्यामुळें ते खटल्याच्या नेमलेल्या तारखेस हजर राहत नाहींत या संबंधानें आणखी विशेष खुलासा ...णें इष्ट होतें पण तसें कांहीं १८८७ च्या ...लें नाहीं तरी पुढील वर्षी सविस्त... ...न जास्त खबरदारी घेतली ...े साधारण दाव्याचा ...नानें प्रत्येकीं ... पडले- ...लागेल.

हें दिवसाचें प्रमाण मागील वर्षांपेक्षां किंचित कमी आहे तरी एकंदरीनें हें मान फार मोठें आहे. दिवाणी कोर्टावरील अंमलदार वेळोवेळ बदलतात आणि दिवाणी कोर्ट इतर कोर्टांपासून निराळें असावें तसें नाहीं ह्मणून दाव्यांचा निकाल लागण्यास बरेच दिवस लागतात. शिवाय तिसरें कारण हें आहे कीं वऱ्हाडांतील दिवाणी कोर्टांचे अधिकार नियमित नाहींत आणि हे अधिकार त्या त्या कोर्टावरील अंमलदार गृहस्थाच्या ग्रेड प्रमाणें बदलतात यामुळें दिवाणी कामास अनेक व्यत्यय येतात आणि वरचेवर बदल्या होत असल्यामुळें कोडताचे काम सुयंत्र चालण्यास फार मुष्कील पडतें.

( पुढें चालूं. )

## The Berar Samachar

MONDAY JUNE 25, 1888.

### THE CONGRESS MOVEMENTS IN N. W. P.

Our friends in the N. W. P. are having their battles over the National Congress movement. We have already said in one of our latest issues that certain interested persons have been busy in spreading an opinion that the true interests of Hindus and Mohamedans the two chief factors of the community in India, are antagonistic and the leaders of the latter community will do good to abstain altogether from the National Congress movement. This or almost akin to this is the opinion of Sir Ahmed and his following; while an equally good section of the Mohamedan community holds the contrary. It is absolutey necessary that all misconceptions about the Congress movement in India should be dissipated and to do this it will always have to be borne in mind and reiterated to the masses that the only legitimate object with which the Congress has been established is to make common cause in representing our national grievances to the British public and to the Government of India. The resolutions hitherto adopted by the Congress must have already made it clear to those whose consciences have not been warped by party feeling and prejudice that the avowed object of the Congress is as stated above, the affirmance of the national grievances by perfectly constitutional means. Those who doubt wish well of the Congress try to make the ignorant public believe that it is acting against the interest of the British Government to co-operate in this way to make manifest the various evils we are suffering under. There are some who from want of real know... the ...biect are taken up by अपरिचित "क्ष" Sircar w... they show... Congress... ation of... stated th... not a sm... the libe... चार. cannot b... but a... like the... trying... Englis... the (... and... day... य ९ शके १८१०. Ind... an 'आर्यन लिफलेट' या नां-

ठरल ...ap

नुष्याच्या स... तरी त्याचा अर्थ... घेण्याचा लोकांचा ... गोष्ट विशेष आनंद ... आहे.

साक्षीदार लोकांस तीन दि... जास्त दिवस राहणें भाग पडूं नये ह्म... असावी तशी अद्याप व्यवस्था झाली नाहीं. साक्षीदार लोक एकंदर ४४३७१ होते. त्या पेकीं १०२९ गृहस्थांस तीन किंवा तीन दिवसांपेक्षां जास्त दिवस रहावें लागलें अकोला स्मालकाज कोडतांत साक्षीदार

seas.

There has, it would appear, been something of overzeal in the matter of the Congress campaigns in the N. W. P. and it would be well if our leaders in Berars take some note of it before entering upon the arduous task of giving political education to their brother citizens. No gentleman Hindu or Mohamedan need necessarily rouse party feeling by any mischievous references to the religion of either community. It is not to be expected that the people of any caste or creed have so ever enlarged sympathies and capacious views as to disregard any kind of criticism upon the religion of either the Hindus or the Mohamedans.

A perfect indifference will have to be observed in the lectures to be hereafter delivered in Berar regarding the Congress movement. The Campaigns in the N. W. P. have shown that party feeling might be raised to a point when it would be impossible to expect any further mutual aid or even when active opposition from the offended side might be expected. This is to be avoided with very great caution and we confidently hope that the N. W. P. meetings and countermeetings will be an ample warning to our leaders to guide themselves.

We are not persuaded to believe that Government or at any rate some of its influential members have an interest in, and do actually promote, disunion among the Hindu and Mohamedan communities. That there may be some officials who view the movement with disfavour and would try to check it if it lay in their power so to do, is a fact which may readily be admitted; but we cannot bring ourselves to believe without any facts tending to prove it that it is really some high Government officials who have found this new convenient way of setting the two communities by the ears. We hold that no person official or non official, who has really the genuine interests of the British Government at heart can think unfavourably of the National Congress movement or can affect to disregard its political significance.

We will conclude by reasserting the fact that no kind of fiction exists here between the two communities; and that there never has been felt anything like a divergence of interest between them. We are under a foreign rule and as such eqally happy or equally miserable. It would be idle to say that Government are favoring the Mohamedans as against the Hindus, simply because the fact that preference is sometimes shown to Mohamedans when applicants of the public service. The Government have recognized that the Mohamedans are a backward class and need encouragement. It is silly to make much of a policy which may have very good motives indeed. The Hindus might be more advanced socially or they may have by their especial aptitude occupied the avenues to public service; but the one fact to be remembered by Hindus and Mohamed-... like is that we have definite com-... common to both of them and ...ll-wisher of either persuasion ... make a common cause in ... movement of the NATION-... ESS.

forward to the Native Princes copies of a circular asking for contributions. By the Viceroy's order the request was refused, the following explanation being given:—

"The Native Chiefs of India have lately subscribed largely to various institutions in England more especially to the Imperial Institute. The charity for which you now ask support appears to be altogether beyond legitimate sphere of their benevolence. They would be unlikely to take interest in it while the fact that their names would be associated with the Prince and Princess of Wales and the additional fact of your request being forwarded by the Government of India, would make them feel that illegitimate influence was being brought to bear."

"The Governor-General is of opinion that in presence of the many claims upon them in their country, the Princes of India ought not to be solicited to contribute to English charities with which neither they nor their states have any connection."

Under Section 12, Act X of 1882, the Resident is pleased to appoint Mr. Madho Rao Balwant, Acting Tahsildar of Khamgaon in the Akola District, to be a Magistrate of the 3rd Class in that District.

Under Section 12, Act X of 1882, the Resident is pleased to appoint Mr. Manicksha Rattonji Dastur, Extra Assistant Commissioner and Officiating Judge of the Small Cause Court at Khamgaon in the Akola District, to be a Magistrate of the 1st Class in that district.

Mr. G. H. Wittenbaker, appointed to be a sub-Assistant Conservator of Forests in the Hyderabad Assigned Districts, having reported his arrival, is posted as District Forrest Officer, Buldana. He assumed charge of his duties on the 19th April 1888.

Mr. Rasul Khan, Sub Assistant Conservator, is, on making over charge of the Buldana Forest Division to Mr. Wittenbaker, transferred to Amraoti and posted as District Forest Officer of the Amraoti District.

Mr. Krishna Rao Anant, Tahsildar of Pusad in the Basim District, is granted privilege leave for three months with effect from the 1st July 1888 or from such subsequent date as he may avail himself of it.

Mr. Balaji Rajaram, Clerk of the Deputy Commissioner's Court, Basim District, and at present Officiating Tahsildar of the Basim Taluk, will, on his being relieved at Basim by the permanent incumbent, officiate as Tahsildar of the Pusad Taluk during the absence of leave of Mr. Krishna Rao Anant, or until further orders.

Under Section 15 of Act X1 of 1865, Mr. Manicksha Rattonji Dastur, Extra Assistant Commissioner, is empowered to hear and determine Small Cause Court cases at Khamgaon until further orders.

Mr. Govind Raz Moodliar, Tahsildar of Yeotmal in the Wun District, is granted privilege leave for 1 month and 15 days with effect from such date as he may avail himself of it.

Mr. Ramrao Narayan, Clerk of the Deputy Commissioner's Court, Wun District, is appointed to officiate as Tah-...r of Yeotmal during the absence on ... Mr. Govind Raz Moodliar, or ...ders.

Lord Duffe-... ...nces in

जागा खा... गा खालीं झाली ... ल किंवा नेमलेला असेल ... कीनें किंवा नेमणुकीनें भरल्या जा...

## वऱ्हाड.

हवामानः—गेल्या आठवड्यांत पाऊस चांगला पडला. अद्याप हवेत उष्णता आहेच. रोगराई ह्मणण्या सारखी नाहीं.

रा. रा. माधवराव बळवंत, खामगांव येथील नायब तहशिलदार, यांस तिसरे वर्ग माजिस्त्रेटचे अधिकार मिळाले.

मि. माणिकशा रतनजी ए. अ. क. यांस खामगांवास स्मलकाज जड्जाचे अधिकार मिळाले.

वऱ्हाडचे कमिशनरचे जागीं मि. डी. जे. ड्डैडन, सी. एस्. काश्मीरचे रेसिडेंट यांस नेमिले याबद्दल आह्मी मागील अंकीं लिहिलेंच आहेंचे. व ते आतां थोडीशी रजा घेउन नंतर आपल्या नवीन कामीं रुजू होण्या करितां येणार ह्मणून ह्मणतात.

येथील हायस्कुलांतील फोथ असिस्टन्ट मास्तर रा. रा. चिंतामण गणश पांडे यांनीं दोन महिन्यांची सिक रजा घेतली.

यवतमाळचे तहशिलदार रा. रा. गोविंदराज आया यांनीं १॥ महिन्याची रजा घेतली व त्यांचे जागीं रा. रा. रामचंद्र नारायण देशपांडे बी. ए. तेथील क्लार्क आफ कोर्ट यांस नेमले.

मि. म्याकगिल एकस्ट्रा असिस्टंट कमि. उमरावती यांनीं पोलिस खात्यांत जागा मिळण्याविषयीं अर्ज केला व त्या प्रमाणें असि. पो. सुपरिंटेंडेंटच्या जागीं त्यांची नेमणूक लवकरच होईल असें ह्मणतात.

रा. रा. दामोदर गणाजी शिंदकर येथील स्माल्काज कोर्टाचे क्लार्क आफ कोर्ट यांची बदली खामगांवाच्या क्लार्क आफ कोर्टाच्या जागीं होऊन तेथील रा. रा. शंकरराव रामचंद्र येथें येणार अशी वदंता आहे.

मोर्शीचे तहशिलदार रा. रा. सुबराव अय्या यांनीं तीन महिन्यांची रजा घेतली. त्यांचे जागीं उमरावती डेपुटि कमिशनरचे क्लार्क आफ कोर्ट रा. रा. कृष्णाजी महादेव यांस नेमणार अशी वदंता आहे.

( नोटीस. )

रामु वल्लद पांडुसा सोनार रहाणार सांगळूद तालुके आकोलें यांस.

खालीं सही करणार यांजकडून देण्यांत येतें कीं तुह्मी नामदेव वल्लद जैराम सा याचे इस्टेटीचे व त्याचे शरीराचें पालन पोषण करण्याचें सरटीफिकीट मिळविलें असून त्याचे जे पैसे मजकडे हिशोबानें निघतात ती रक्कम मी तुह्मास देण्यास तयार आहे. अशाबद्दल गांवांत पंचाईत करून रक्कम देत असतां घेतली नाहीं असो त्याजबद्दल कांहीं हरकत नाहीं. परतु विनाकारण तुह्मी मजवर फिर्याद कराल तर त्या बदल खर्चाचा जबाबदार मी होणार नाहीं. हें लक्षांत ठेवा. व माझा खर्च तुह्मास द्यावा लागेल. अजून ही तुह्मी आपली रक्कम स्वतः घेऊन जावें. अगर सांगाल त्या मनुष्यास मी देण्यास तयार आहे. तुह्मी अज्ञानानें पैसे व्यर्थ खराब करतां हें चांगलें नाहीं. याचा सर्व बोजा तुमचेवर आहे हे लक्ष्यांत ठेवा. कळावें. ता. १७-६—८८ इ०

( सही. )

बापुन्या सोनसा सोनार दस्तुर खुद्द.

## वर्तमानसार.

आमचे सरकार जे नवीन कर्ज काढणार आहे त्यांतील बरीच रक्कम त्यास एतद्देशीय संस्थानिकाकडून मिळणार आहे असें कळतें त्या रकमेपैकीं बराच भाग होळकरसरकाराकडून मिळणार आहे.

अद्भुत चमत्कार– हैद्राबाद इलाख्यांत कसबे धारूर येथें एका गृहस्थास एकदोन वर्षांच्या वयाची एक मुलगी आहे ती फार हट्टी आहे. आपला हट्ट पुरवून घेण्याची तिला एक खाशी युक्ति सांपडली आहे. ती ही कीं, तिनें मागितलेली वस्तु जर तिजला कोणी दिली नाहीं, तर ती तात्काळ मरून पडते. त्यावेळीं तिची स्थिति अशी होत कीं मोठमोठे हकीम सुद्धां ती मेलीच आहे असें निदान करितात. कारण त्यावेळीं तिच्या नाडीचें चलनवलन अगदीं बंद पडून सर्वपरी प्रेतकळा तिचे शरीरावर पाहण्यांत येते. परंतु तिचा हट्ट पुरविल्याबरोबर ती तात्काळ उठून बसते! काय हा चमत्कार! याचा शोध कोणी शोधक लावतील काय?

आह्माला भरवसा ठेवण्या सारख्या आधारावरून असें समजतें कीं, सबार्डीनेट जज्जांनीं मद्रास ११ वाजल्यापासून अस्तमानीं ५ वाजे पर्यंत कोर्टांत बसलेच पाहिजे. आणि ज्यज्य मेंटें वगैरे तेथेंच लिहिलीं पाहिजेत. बरीं कांहीं एक काम करितां कामा नये, असें ठरविण्याचे बेतात हायकोर्ट आहे.

कोल्हापूर– मराठे जातीची एक न्हातीधुती मुलगी शाळेंत जात असतां तिच्या नवऱ्यानें तिला आपल्या घरीं नेली. हें पण शाळा अधिकाऱ्यास न खपून तिच्या नवऱ्याला चावडीवर बोलाविलें होतें असें समजतें. नवऱ्यानें मोठा अन्यायच केला! ठीक, स्त्री शिक्षण चांगलें मिळतें! असें जर स्त्री शिक्षण मिळूं लागलें तर हिंदुस्थानांतल्या बायकांची वाटच लागणार आहे.

भयंकर अपघात–– अमेरिकेमध्यें गेल्या मे महिन्यांत फिलाडेल्फिआ व रिडिंग कोल रेल्वेनांवाच्या आगगाडीच्या रस्त्यावर गाडीस भयंकर अपघात झाला. त्या गाडीस पाउणशें गाड्या जोडल्या होत्या. मध्यें गाड्या सुटून दोन भाग झाले व पाहिला भाग उतरत्या जमिनीच्या पायथ्याशीं दुसऱ्या भागाची वाट पहात असतां दुसऱ्या भागाचा वेग अवरेनासा होऊन गाड्या मोठ्या झपाट्यानें वरून उतरून पहिल्या भागाच्या गाड्यावर मोठ्या जोरानें आदळल्या त्या गाड्यांपैकीं एका गाडींत डिनामैट भरलेलें होतें, ती गाडी उडाली त्याजमुळें रिडिंग कोल कंपनीच्या नोकरांचा व त्यांच्या कुटुंबाच्या २१ घराचा अगदीं फडशा उडाला आणि सामानास आग लागली आठ मनुष्यें जळून मेलीं व तीस असामीस इजा झाली. आगगाडीच्या खालीं ५० फूट व्यासाचा मोठा खड्डा पडला आणि एक मैल भर सामान अस्ताव्यस्त होऊन उडालें. एका गाडीचें चाक व आख ५० फुटावर लांब एका घरावर उडून जाऊन पडला व दोन मैलावरच्या घरांच्या खिडक्या फुटल्या असा भयंकर अनर्थ उडाला.

बातमी पाठविण्याचें नवें यंत्र–– अमेरिकेंत इलिनोइस प्रांतांत, हायलंडपार्क येथें राहणारे प्रोफेसर एलिशाग्रे यांनीं "टेलाटोग्राफ नामक फोनप्रमाणें यास तारेचें साधन असतेंच. बातमी घेण्याच्या व देण्याच्या या दोन्ही ठिकाणीं तारेच्या शेवटास पेनसली जोडलेल्या असतात. तसेंच दोन्ही शेवटांस बटन असतात. जेव्हां बातमी पाठवणारानें बटन हलवावा ह्मणजे दुसऱ्या बाजूस घणघण अवाज होतो. अवाज झाल्याबरोबर बातमी घेणारानें दुसऱ्या शेवटाची पेनसील लिहिण्याच्या झोकानें हातीं धरून, पुढें कागद घेऊन त्यावर पेनसील टेकावी. मग बातमी पाठविणारा आपल्या कागदावर जीं जीं अक्षरें अगर निशाण्या लिहितो, त्या त्या निशाण्या अगर अक्षरें बातमी घेणाराच्या हातची पेनसील वठविते. धांदल नाहीं, गोंधळ नाहीं, चूक नाहीं बाक नाहीं. ह्या यंत्रानें चित्रें, देखावे पाहिजे ते हुबेहुब पाठवितां येतें. शिवाय चमत्कार हा कीं, १०० मैल पल्ल्यावरचें १० मैल पल्ल्यावरच्या कामाइतकें झटपट होतें. तारेप्रमाणें पुष्कळ लांबीच्या पल्ल्यावरचें काम ह्या यंत्रानें होऊं लागलें ह्मणजे बातमी पाठवण्याच्या प्रकारांत मोठीच क्रांति होऊन जाईल असें मानण्यास कांहींच हरकत नाहीं. ह्या यंत्रानें पाहिजे त्या भाषेंत बातमी पाठवितां येतें. हें वरील बातमीवरून स्पष्ट समजेल. पु. वै.

बलगेरिया प्रांतांतून प्रसंग विशेषीं ३ लक्ष उत्तम कवाईत शिकलेली अशी फौज लढाईस येऊं शकेल असा अजमास आहे.

कालवे, रस्ते, वगैरे ह्मैसूरच्या सरकारनें लोकोपयोगीं कामां करितां सन १८८८ सालीं २८,७४,००० रु० खर्चण्याचा आजमास केला आहे असें समजतें.

अहमदाबाद येथें एका महिन्यांत महामारीच्या उपद्रवानें ७१४ मनुष्यें मेलीं असें समजतें.

फ्रेंच लोकांनीं बीलैट ह्मणून एक नवीन उडविणारा पदार्थ शोधून काढला आहे. तो डिनामैट व मिलीनैटपेक्षां भयंकर आहे व नेण्या आणण्याच्या कामांत मुळींच उडण्याची भीति नाहीं असा आहे.

शिकंदराबाद येथें ३ ऱ्या मद्रास स्वारांच्या पलटणीचा एक मुसलमान शिपाई कांहीं कारणामुळें अटकेंत ठेविला होता. तो तेथून पळाला आणि एक बंदुक व दहा काडतुसें घेऊन बराकींत गेला. तेथें त्यानें अलिखान नांवाच्या सुभेदारास गोळी घालून मारलें. नंतर पळून जात असतां वाटेंत एक नाईक भेटला त्यास ही गोळी घालून मारलें. पुढें त्याचा पत्ता नाहींसा झाला.

काश्मीर मध्यें वाघ्याचा उपद्रव कमी होत चालला आहे असें श्री. च्या त. १३ च्या तारेवरून समजतें.

होपकर्त्यांनीं पृथ्वीतील बारा श्रीमंत गृहस्थांच्या संपत्तीचे आकडे दिले आहेत ते येणेंप्रमाणें:–जेम्स गौल्ड ५५ कोटी रु. जे. डब्ल्यू. म्याके, ५० कोटी, राथ्सचैल्ड, ४० कोटी, सी. वांडरबिल्ट, २५ कोटी जे. पॉ. जोन्स, २० कोटी ड्यूक आफ वेस्ट मिन्स्टर १६ कोटी, जे. जे. आस्टर १० कोटी, डब्ल्यू. स्टिवर्ट, ८ कोटी, जे. गार्डन बेनेट ६ ड्यूक आफ संदरलंड, ६, ड्यूक आफ नार्थबरलंड ५, मार्किस आफ ब्यूट, ४ कोटी. यांतील पहिल्या गृहस्थांचे प्रत्येक तासास ३००० रुपयांच उत्पन्न आहे असें समजतें. वीस वर्षांं पूर्वीं ते अगदीं गरीब होते वरील मंडळींत बहुतेक गृहस्थ अमेरिकेचे आहेत.

शिकंदराबाद येथें रेसिडेंटांस जाणाऱ्या तारांची बातमी अगोदर मिळविण्याच्या खटपटीच्या संबंधानें कांहीं गृहस्थांस कैद केलें असें समजतें. सु. प.

जर्मनीचे बादशहा दुसरा फ्रेडरिक हे ता. १५ जिनहू रोजीं सकाळीं ११ वाजतां मरण पावले. हे बादशहा महाराणी साहेबांचे जावई होते. ह्मणून त्याबद्दल हिंदुस्थानांतील लोकांनींही दुःख मानले पाहिजे.

आमच्या फौजेची तयारी कडेकोट असल्या मुळें रशियानें आमच्यावर हल्ला करण्याची तयारी करावी किंवा हल्लीं जी स्थिति आहे तीच कबूल करावी असें बलगेरियाच्या कर्नलनें बोलून दाखविलें.

आपण मध्यएशियांत गेलों असतां इंग्लंडांत बरीच हालचाल होईल अशा भीतीनें रशियाच्या झारानें मध्यएशियांत येण्याचें नाकारलें.

ब्रह्मदेशांत पुनः बंडाळी सुरू झाली, गेल्याच्या मागील रविवारीं बंडखोरांनीं जेनागांव नांवाच्या शहरावर हल्ला करून सुमारें १०० घरें जाळलीं आणि दोघा चावडेकऱ्यांस ठार मारलें.

रशियाचा झार प्रथम दक्षिण रशियांत प्रवास करून नंतर काकेसस प्रांतांत येणार आहे. नंतर मध्यएशियांत येऊन ट्रान्सकास्पियन रेल्वेची तपासणी करणार आहे.

मंगळावरची वस्ती–पारिसचे ज्योतिषी एस. फेई यांणीं अकडेमी आफ सायन्स पुढें नाईस येथील वेधशाळेवरचे कामगार एस. पेरिटन यांच्याकडून आलेला पत्रव्यवहार वाचला त्यांत पेरिटन लिहितो कीं मी एक अती मोठी दुर्बिण घेऊन मंगळाचा वेध घेतला त्यावरून भूलोकांप्रमाणें मंगळावर मनुष्य वस्ती आहे, एवढेंच नाहीं तर तीं मनुष्यें अत्यंत कुशल व अवाढव्य इंजनेरी कामें करण्यांत मोठींच तरबेज आहेत असें आपल्यास समजेल असें तो ह्मणतो. एम. डी. लिसप्स सारखे जाडे इंजनेर त्यांच्या पासांगासही पुरावयाचे नाहींत. त्यांनीं ह्या समुद्रापासून त्या समुद्रापर्यंत अवाढव्य कालवे खोदले आहेत. पानामा कालव्या सारखे कित्येक अपुरेही कालवे त्यावर दिसतात. चंद्रलोकावरच्या वस्तीच्या संबंधानें मागें जसें एक बंड पिकलें होतें त्या पैकींच ही एक बाड असेल कीं काय असा मोठा संशय वाटतो.

रुपयास देखील मिळेना. आमच्या किर्लोसकर संगीत करांना ८०० रुपये मिळाले तर त्यांची हल्लीं अशी स्थिति झाली आहे. वरच्या प्रमाणें पैसे मिळूं लागल्यास काय स्थिति होईल कोण जाणें!!

सरकाराचा ठराव–– हत्याराचे प्रतिबंधांतून तरवार मोकळी केली आहे. मात्र ती विलायती बनावटीची असली पाहिजे आणि अशा तरवारी ज्या कोणास वापरण्याची इच्छा असेल त्यांणीं त्या वापराव्यात असा सरकारनें ठराव केल्याचें कळतें,

—विंचवाच्या दंशावर जांभळीच्या पानांचा रस लावावा.

अहमदनगर एका मारवाडणीनें एका पद्म साळयाच्या सात आठ वर्षांचे मुलीला फूसलावून तिला पारनेर तालुक्यांतील एका खेडगांवीं नेऊन तिजला मारवाडी पेहराव घातला. नंतर तिजला एका मारवाड्यास देण्याचें कबूल करून त्याज पासून ९०० नऊशें रुपये मोजून घेण्याचें ठरविलें. पैकीं त्याज पासून पांचशे रुपये रोख घेतले. इतक्यांत मुलीचा बाप तिचा शोध करीत त्या गांवीं आला तेव्हां हें तिचें सर्व कपट बाहेर पडलें. त्याबद्दल खटला झाल्याचें एकतों. द्रव्यांशैन कोण काय करील याचा कांहीं नेम नाहीं.

न्या० सिं०

गहूं, कापूस आणि ऊंस–हीं उत्पन्नें करण्याचें आमच्या शेतकऱ्यांस असें वेड लागलें आहे कीं, त्या वेडाच्या भरांत स्वतःचें व देशाचें हितही त्यांस दिसेनासें झालें आहे. गहूं आणि कापूस हा माल विलायत वगैरे देशीं जातो. त्याची चांगली किंमत मिळते, उंसाच्या पिकांत फार मोठा फायदा आहे, ह्या खुळानें जोंधळे, बाजरी वगैरे धान्यांचीं पिकें लोक कमी करूं लागले आहेत. जोंधळे बाजरी, मका वगैरे धान्यें गोरगरीबांच्या फार सोईचीं आहेत. तीं धान्यें हें लोकांचें मुख्य अन्न आहे. शिवाय कडबा, सरम, मकवण जनावरांच्या उपयोगीं पडतें, असा दुहेरी फायदा तीं धान्यें करण्यांत असतो. अती हव्यासानें हीं पिकें लोक कमी करूं लागल्या मुळें तीं धान्यें फार महाग झालीं आहेत, व कडबा, सरम ह्या चाऱ्यास तर सोन्या इतकें मोल देण्याची वेळ येऊन ठेपली आहे. दूध दुभतें नाहींसें झाल्यामुळें आमचे लोक निवळ काडी जवान बनले आहेत. त्यांत ज्यांच्या पाशीं एकाद दुसरें शेंपूट अवशिष्ट आहे त्यांस ह्या चाऱ्याच्या अपूर्व महागाईनें तीं पाळण्यास मोठेंच सकट वाटूं लागलें आहे, हा केवढा अनर्थ!!! दूध दुभतें चांगलें ह्मणून शहरांत ज्यांनीं एका ... बाल्...

...: (... पुढें चालूं.)

८ (५!) यांत सांगितले

संगीताची अभिरुची––इंग्लंडच्या सालीं निवड केली गेली सिद्ध गाणारीण प्याटी इन साल्चे एप्रिल महिन्याचे १ ले नास आयरीज येथें थोड्या द्रुन मोजर्ली जातील. मध्यंतरी ज्या एटर मध्यें गाणें केलें।गा खाली होतील त्या ज्या मेंबराची जागा खाली झाली असेल तो निवडलेला असेल किंवा नेमलेला असेल त्याप्रमाणें निवडणुकीनें किंवा नेमणुकीनें भरल्या जातील. नर

ज्यावर ४ ... किंवा

स... रहावें लाग-

...न कोडतांत साक्षीदार

नि...

...

तां दु...

जवीन करावीं.

१०. जिल्हा बोरड कि...